मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचं मुखपत्र



युगवाणी



ती देशपांडे
शेवडे
. कोलते
चोरघडे
बेडेकर

र देशपांडे
देशपांडे
. गोरे

ढे
पाडगांवकर
रंदीकर
नाथ
. शास्त्री
. पंडित
भावे

मा. नी. गलगलीकर
म. म. देशपांडे
वसंत वऱ्हाडपांडे
श्री. गं. कावळे
प्रभाकर माचवे
वसंत निनावे
राम शेवाळकर
द. चिं. सोमण
शं. बा. शास्त्री
पां. कृ. सावळापूरकर
केशव केळकर
ग. त्र्यं. देशपांडे
शरच्चंद्र टोंगो
अ. म. जोशी
अमरेंद्र
नाना जोग
संघवार्ता वगैरे



व्हेंबर १९५२

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक—पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] नोव्हेंबर १९५३ [अंक ८ वा

अनुक्रमणिका

यु ग वा णी

वर्ष ८ वें   नोव्हेंबर १९५३   अंक ८ वा

सं पा द की य

ता- ५–८–५३ रोजीं वि. सा. संघाच्या शिष्ट मंडळाला दिलेल्या मुलाखतींत मुख्यमंत्री पं. शुक्ल यांनी दोन राजभाषांच्या अंमलबजावणीच्या बाबतींत त्यांना स्वत:ला वाटणाऱ्या व्यवहार्य अडचणींचे कांही मुद्दे शिष्टमंडळापुढे मांडले होते व अनेक राजभाषा असलेल्या इतर देशांत त्यांची अंमलबजावणी कशा प्रकारें होते यासंबंधी माहिती पुरविण्याची सूचना शिष्ट-मंडळाला केली होती. तदनुसार राजभाषा अधिनियम समितीचे आमंत्रक श्री. माडखोलकर यांनी स्वित्झर्लंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन देशांतील अनेक राज भाषांच्या अंमलबजावणीची माहिती अधिकृतरीत्या मिळवून ती मुख्यमंत्र्यांकडे पाठविली. या संबंधांत ता. १४–१०–५३ रोजीं श्री. माडखोलकर यांनी स्वित्सर्लंडच्या हिंदुस्थानांतील वकालतीकडून आपल्याला आलेलें जें पत्र मुख्यमंत्र्यांकडे पाठविलें तें महत्त्वाचें असल्यामुळे मराठी अनुवादासह संपूर्ण खाली दिलें आहे—

New Delhi,
September 21 st. I953

Dear Mr. Madkholkar,

I should like to thank you for your letter, dated the 16th of September, concerning information about the language question in Switzerland.

Immediately after the phone talk I had with Shri P. K. Deshmukh, Education Minister, Madhya Pradesh I wrote to the competent authorities of my country in order to get the information asked for. I shall not fail to forward the particulars about the administrative aspect of the official languages in my country also to you as soon as I receive them. For the present I reply to your 3 questions as follows:—

(1) When introducing any bill in the Federal Assembly the Minister concerned moves the bill in his own mothertongue whether it be German, French or Italian.

(2) Any bill is introduced in the Assembly in the 3 official languages simultaneously.

(3) The official authoritative text of the bill is in all 3 languages.

Hoping that in the meantime this information may prove useful to you, I remain,

Yours sincerely
Sd/-*Illegible*
For the Minister of Switzerland

मराठी अनुवाद

नवी दिल्ली, सप्टेंबर २१, १९५३

प्रिय श्री. माडखोलकर,

स्वित्झर्लंडमधील भाषिक प्रश्नाबाबतच्या माहिती-संबंधी आपण ता. १६ सप्टेंबर रोजीं लिहिलेल्या पत्राबद्दल आपले आभार मानतों.

मध्यप्रदेशाचे शिक्षणमंत्री श्री. पी. के. देशमुख यांच्याशीं फोनवरून बोलणें झाल्यानंतर लगेच मी माझ्या देशांतील सुयोग्य अधिकारी व्यक्तींना पत्रें लिहून हवी असलेली माहिती मागविली आहे. राज-भाषांच्या शासनात्मक अंगासंबंधीचा तपशील हातीं आल्याबरोबर मी तो आपणाकडे तावडतोब रवाना करण्यास विसरणार नाही. सध्या आपल्या तीन प्रश्नांना माझीं खालीलप्रमाणे उत्तरें आहेत.

(१) फेडरल असेंब्लींत एखादें बिल मांडतांना संबंधित मंत्री आपल्या मातृभाषेंत भाषण करतो, मग ती भाषा जर्मन, फ्रेंच व इटालियन यांपैकी कोणतीहि असो.

(२) कोणतेंहि बिल असेंब्लींत तिन्ही राजभाषांत एकदमच सादर केलें जातें.

(३) बिलाचा अधिकृत नमुदा तिन्ही भाषांत असतो.

सध्या ही माहिती आपणाला उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

आपला सही–दुर्बोध
फॉर मिनिस्टर, तर्फे स्वित्झर्लंड

र स ग्र ह ण

न वा शि पा ई

प्रा. कुसुमावती देशपांडे

मराठी कविता हें महाराष्ट्राचें एक फार मोठें वैभव आहे. ज्ञानेश्वरांच्या काळापासून मराठी कवितेनें महाराष्ट्रांतील जनतेच्या कल्याणाची चिंता वाहिली. कधी तिने सर्वसाधारण जनतेच्या आकांक्षांना वळण लावण्याचें कार्य अंगावर घेतलें, कधी त्या आकांक्षा समरसतेने व्यक्त केल्या. महाराष्ट्रीय जीवनाच्या—कोणत्या ना कोणत्या भागाची तिने आपुलकीने साथ केली. केशवसुतांची कविता नव्या महाराष्ट्राने मोठ्या आदराने गावी अशी तिची थोरवी आहे. समाजांतील दुबळेपणाचा वीमोड करण्याची शक्ति कवितेमध्ये असते, असा त्यांचा विश्वास होता. काव्य हें प्रगतीचें एक प्रमुख साधन आहे, असें त्यांचें मत होतें. 'कविता आणि कवि', 'कवितेचें प्रयोजन' इ० त्यांच्या कवितांत त्यांनी आपला हा दृष्टिकोन पुनः पुनः व्यक्त केला आहे. कवितेमुळे केवळ भावनोद्रेकाला वाव मिळतो असें नाही, तर मानवी वृत्तीचें संस्करण व विनयन करणाऱ्या ज्या कांही शक्ति आहेत, त्यांमध्ये कवितेला प्रमुख स्थान आहे, हें मान्य केल्यास केशवसुतांच्या कित्येक कविता नव्या महाराष्ट्राला तरी मुखोद्गत असावयास पाहिजेत. 'नवा शिपाई' ही यांपैकी एक आहे.

जगांतील अनेक देशांत व अनेक युगांत वेगवेगळ्या संस्कृति होऊन गेल्या. त्या सर्व मानवनिर्मित होत्या व आहेत. पण मानव व त्यानेंच निर्मिलेल्या या संस्कृति यांचे परस्पर संबंध मोठे मजेशीर आहेत. मानवाच्या सामाजिक कल्याणाच्या व सुव्यवस्थेच्या विचारांतून एक विशिष्ट संस्कृति निर्माण होते. ती कांही काळ त्या समाजाला सुखावह होते,—कल्याणप्रद ठरते. परंतु पुढे ती साचेबंद होते, त्रासदायक, बंधनकारक होते. परिस्थितीमुळे वा वाढत्या ज्ञानामुळे नैसर्गिक उत्पातांमुळे वा निसर्गावरील मानवाच्या वाढत्या स्वामित्वामुळे मानवाचें व्यावहारिक जीवन बदलून जातें. परंतु पूर्व युगांतील त्या साचेबंद संस्कृतीमुळे त्याचें सामाजिक वा धार्मिक वा वैचारिक जीवन बांधलेलें राहतें. अशा प्रकारें—आपण निर्मिलेल्या संस्कृतीचा मानव स्वतःच गुलाम होऊन बसतो. मृतवत् झालेल्या कोणत्याहि संस्कृतीमध्ये अशीं कांही मूलभूत तत्त्वें असतातच की जीं सदैव सत्य व श्रेयस्कर ठरावीं. परंतु अशा तत्त्वांना देखील अनेकदा युगानुयुगांच्या गैरसमजुतीमुळे किंवा अपुऱ्या समजामुळे विकृत स्वरूप प्राप्त होतें. अशा विकृत सांस्कृतिक कल्पनांचा मानवाला फारच जाच होतो. मानवजात जणू भ्रष्ट होऊं लागते. ही एक प्रकारची 'धर्मग्लानी'च. अशावेळीं कोणी तरी विचारवंतांनी, धैर्यशाली प्रतिभावंतांनी पुढे होऊन त्या मृतवत् कल्पनांचा नायनाट करणें अवश्य असतें, त्या संस्कृतींतील जो कांही सत्य व श्रेयस्कर असा भाग असेल, त्याला पुनरुज्जीवित करून त्याचें सम्यग्दर्शन घडविणें निकडीचें असतें. अनेक कारणांनी बदललेल्या परिस्थितीची नीट जाणीव करून घेऊन त्या दृष्टीनें योग्य तीं जीवनमूल्यें प्रस्थापित करावीं लागतात. मानवजातीला पुनः स्वतंत्र, सुसंस्कृत बनवावें लागतें.

केशवसुतांच्या दृष्टीसमोर स्वतंत्र मानवतेचें स्वप्न नित्य तरळत असे. या स्वतंत्रतेच्या मार्गांत काय अडचणी आहेत. मानवी व्यक्तित्वाला कोणत्या अडसरांमागे कोंडून ठेवण्यांत येतें याची त्यांना जाणीव होती. कोणत्या दुष्प्रवृत्तींनी मानवतेची शक्ति पोखरली जाते व तिला विकलता प्राप्त होते, याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. आधुनिक मराठी कवितेच्या प्रारंभकालींहि त्यांनी द्रष्टयाच्या सामर्थ्यानें अनुभूति घेतली होती. ही निर्भयता व वृत्तीची विशालता त्यांनी 'नवा शिपाई' या कवितेंत व्यक्त केली आहे. त्यांचा नवा शिपाई या सर्व गुणांचें मूर्तिमंत प्रतीक आहे.

नवचैतन्यानें उत्स्फूर्त झालेला त्यांचा हा नवा शिपाई कोणापुढेहि हार खाणारा नाही. तो धर्मभेदांनी बांधला जात नाही, कोणत्याहि संकुचित मतप्रणालीनें बद्ध होऊन तो मानवतेकडे पाठ फिरवीत नाही. तो निर्भय आहे, कारण तो उदार आहे, सर्वांचा आहे. जो सर्वांचा झाला त्याला भीति उरत नाही. भेदाभेदाचे तट पाडून मानवतेचे तुकडे करणें हें त्यांच्या दृष्टीनें महत्पाप ठरतें. हें सत्य कवीला मनोमन पटल्यामुळे त्याच्या अभिव्यक्तींत केवढा नीटसपणा आला !

तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा-

या ओळींत एखाद्या ब्रीदवाक्याचें पूर्णत्व व परिणामकारकता उतरली. आपल्या जीवनक्षेत्राला कसलेंहि कुंपण पडलेलें या शिपायाला सहन होत नाही. एखाद्या टीचभर विहिरींत डुबक्या मारणाऱ्या मंडूकाच्या जीवनाचें त्याला आकर्षण वाटत नाही. संपूर्ण जीवनाचा आस्वाद घेण्याची त्याला आकांक्षा आहे.

नव्या शिपायाच्या या सर्वंकष जीवनाकांक्षेमध्यें फुलांची कोमलता व नाजूक सौंदर्यदृष्टीहि आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लढणारा हा योद्धा हृदयशून्य तिस्मारखां नसतो. हडेलहप्पीच्या शिक्षणामुळे तो केवळ एक यांत्रिक ठोकळा बनलेला नसतो. बलहीन पण निष्पाप जीवांच्या रक्षणासाठी तो आपलें शस्त्र झिजवतो. मानवाविषयी प्रेम, बंधुभाव ही त्याच्या शस्त्रामागील शक्ति असते विश्वकुटुंबी वृत्तीनें त्याच्या शौर्याला धार येते. त्याला सगळीकडे स्वतःच्या गेहाची मंगलता दिसत असते, तशीच आपुलकी त्याला सर्वत्र आढळून येते. त्याची ही सरळ भावना तितक्याच साध्या शब्दांत व्यक्त झाली आहे.

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत.

या मानव प्रेमाबरोबरच भूलोकींच्या सौंदर्याचीहि त्याला जाणीव असते, आकाशांतील नीलिम्याची उदात्तता त्याला प्रतीत झाली असते. तृणावृत भू व डोईवरचें नीलांबर हीं जणू सर्वत्र जीवनाचा आधार व सर्वत्र जीवनाला वेष्टून राहणारी, सर्वांचा सारख्या वत्सलतेनें सांभाळ करणारी शक्ति. रस्किन नांवाच्या एका इंग्रज तत्त्वज्ञानें म्हटलें की आकाशाच्या नीलिम्याचें दर्शन गरिबांतल्या गरीब व्यक्तीलाहि लाभतें. उंच पर्वतश्रेणी, अफाट सागराचा विस्तार, सृष्टींतील अनेक नवलपूर्ण दृश्यें पहायला जाण्यास प्रवास करावा लागतो. पण आकाशाचा नीलिमा ! एखाद्या शहरांतल्या गल्ली-बोळींतल्या खुराड्यांत जन्मभर राहण्याचें तुमच्या नशीबीं आलें असलें तरीहि तुमच्या त्या गल्लीच्या माथ्यावर परमेश्वरी कृपेप्रमाणे पसरलेल्या आकाशाच्या निळ्या-निळ्या पट्टीचें दर्शन तुम्हाला नित्य होईल. देशदेशांतरांचे भेदभाव उल्लंघून मानवजातीची एकात्मता दर्शविणारी ही हरितश्यामल धरणी आणि डोईवरचें नीलांबर ! त्यांच्याप्रमाणेच, कोणत्याहि देशांतलीं असोत, लोभस व लडिवाळ वाटणारीं मुलें, प्रसन्नपणें डोलणारीं फुलें. त्यांच्या या समतेशीं, एकात्मतेशीं केशवसुतांचा नवा शिपाई समरस होतो. तो मुलांत मूल होतो व सूर्यप्रकाशांत डोलणारीं फुलें पाहून त्याचें मन हर्षानें डोलतें. शौर्य व सौंदर्यप्रीति शौर्य व स्नेहाळपणा यांचा त्याच्या ठिकाणीं संगम होतो. लहानथोरांच्या एकात्मतेच्या जाणीवेनें त्याची जीवनगंगा भरून गेलेली असते.

या सौंदर्यप्रेमी शूराला बाह्य पूजास्थानाची आवश्यकता असते. आत्मसन्मानाची भावना त्याच्या रोमरोमांत भिनलेली नसते. परंतु हा आत्मसन्मान म्हणजे एखाद्या गर्विष्ठ, आत्मसंतुष्ट आणसाच्या वृत्ती-सारखा नसतो. क्षुद्र प्रौढीचा लवलेशहि त्याला शिवलेला नसतो.त्याचा आत्मसन्मान त्याच्या विश्वाळलेल्या वृत्तींतून

स्फुरतो. आपल्या ठायीं 'विश्वात्मक देवा'ला तो पाहतो. केशवसुतांनी दुसरीकडे म्हटल्याप्रमाणे

तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजीं

अशी या नव्या शिपायाची वृत्ति असते. म्हणून त्याला 'मी–तूं' पणाचे बंध बांधूं शकत नाहीत. व्यक्तीच्या मीपणाला नसत्या मर्यादा घालून, 'मी' या शब्दाचा आशय आकुंचित करून लोक त्याचे देव्हारे माजवतात व जगांत निष्कारण अनर्थ होतात, अशी त्याची भावना आहे. या संबंधांत

मी हा शब्दच नलगे मजला, संपुष्टीं हे लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख !

या ओळींत 'संपुष्टीं' हा किती अर्थपूर्ण शब्द—केशवसुतांनी वापरला आहे. संस्कृतांत 'संपुट' म्हणजे दोन हात मिटवून त्यांच्यामध्ये जी पोकळी होते ती. त्यावरून संपुट म्हणजे करंडा हा अर्थ आला व मराठींत संपुष्ट म्हणजे देव ठेवण्याचें पात्र असा अर्थ आला. याच अर्थाने तुकारामांनी म्हटलें

न माये ब्रम्हांडीं तो संपुष्टासनीं ।

क्षुद्र व्यावहारिक जन आपल्या 'मी'पणाचा आकुंचित अर्थ घेऊन त्या एवढ्याशा 'मी' चे देव्हारे माजवितात. उभ्या जीवनांत त्याचीच देवासारखी प्रतिष्ठापना व उपासना करतात. मानवाच्या या अहंपूजनामुळेच जगांत कित्येक अनर्थ उद्भवतात. केशवसुतांच्या या नव्या शिपायाला असा

'मी हा शब्दच नलगे···'

लहानथोर, साधु–असाधु असे भेदभाव त्याच्याजवळ उरत नाहीत. या सर्वांत तो अंशभागी असतो, ते सर्व त्याचे असतात व या आपुलकीमुळे त्याला निर्भयता लाभते.

शेवटच्या कडव्यांत केशवसुतांनी भारतीय तत्त्वज्ञानांतील मूलभूत तत्त्वाचा आश्रय घेतला आहे तें तत्त्व म्हणजे 'तत्त्वमसि।'—तूं तेंच आहेस, तूं परब्रह्म आहेस. प्रत्येक व्यक्तीचा आत्मा हा ब्रह्माचा अंश आहे. त्या अंशाभोवती त्याचा देह म्हणजे जडाचें आवरण आहे. माझा देह म्हणजे मी नव्हे, खरा मी म्हणजे आत्मा, 'तें' किंवा ब्रह्म याची जाणीव होणें, यांत भारतीय तत्त्वज्ञानाची व भारतीय योगसाधनेची परिणति आहे कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर श्रीकृष्णांनी अर्जुनाला हेंच तत्त्व पटवून दिलें. केशवसुतांनी या शेवटच्या कडव्यांत तिळाच्या हलव्याचा दृष्टान्त घेऊन हें तत्त्व विशद केलें आहे व मानवी समता प्रस्थापित करण्याकरिता त्याचा उपयोग केला आहे.

हलवा करतांना, एका लहानशा तिळावर साखरेचीं पुटें चढतात. पुटावर पुटें चढून मग काटे फुटतात. वास्तविक तीळ सर्व सारखे; त्यांच्यावरील पाकहि एकाच नमुन्याचा. परंतु त्यांचे काटे एकमेकांना बोचूं लागतात. मानवी समाजांतहि हीच अवस्था होते. प्रत्येक व्यक्ति म्हणजे आत्मा व देह. प्रत्येकाचा आत्मा हा एकाच ब्रह्माचा अंश. प्रत्येक व्यक्तीमध्ये आत्मस्वरूपाची आंतरिक जाणीव असते. परंतु त्या जाणीवेवर जडाचीं आवरणें वसूं लागतात. निर्गुण अशा आत्मस्वरूपाची जाणीव लोपत जाऊन हा सगुण देह म्हणजे मी, या देहाचें सुख तें माझें सुख, या देहाचें वैभवं तेंच माझें खरें वैभव अशी भावना बळावत जाते. ही जडवादी वृत्ति. ती जसजशी बळावत जाते तसतसा मानवांत कलह पसरतो. वैराचें राज्य फैलावतें. मानव मानवाला बोचूं लागतो, धिक्कारूं लागतो. या कलहाचा अंत कसा होईल, मानवामानवाचे काटे कसे झडून जातील याची या नव्या शिपायाला सदैव काळजी असते. एकमेकांच्या आंतरिक एकात्मतेची जाणीव कशी उदयास येईल, त्या चित्कणाच्या वरच्या जडाचें सादृश्यहि कसें लक्षांत येईल व मानवामानवांत सलोखा नांदेल याची चिंता तो मनांत नित्य वागवीत असतो. भविष्यकाळीं शांतीचें साम्राज्य प्रस्थापित होणार आहे, हें त्याने जाणलें आहे. काळच त्याची अधिष्ठापना करीत आहे, मानवी जीवनाचा ओघ अशा शांतीच्या साम्राज्याकडे वहात आहे, याची त्याला ग्वाही मिळाली आहे. त्या शांतीच्या साम्राज्याची ललकारी देण्यासाठी, त्याची पूर्वतयारी करण्यासाठी त्याचा स्वतःचा अवतार आहे, याचीहि जाणीव त्याला आहे व म्हणूनच तो भिणार नाही.

केशवसुतांच्या नव्या शिपायाचें स्वरूप हें असें आहे. भविष्यकाळीं प्रस्थापित होणाऱ्या शांतीच्या साम्राज्याचा हा दूत जीवनप्रेमी, विशाल अंतःकरणाचा

विश्वकुटुंबी वृत्तीचा, द्यावापृथिवीवरील उदात्त तशाच कोमळ सौंदर्याने भारलेला आहे. १८९८ साली केशवसुतांनी हें शांति व स्वातंत्र्य यांच्या अधिराज्याचें स्वप्न पाहिलें. केशवसुतांच्या कवितेवर इंग्रजी काव्याचा बराच परिणाम झाला असल्याचें मराठी टीकाकार नेहमी सांगत असतात. त्यांनी इंग्रजी काव्य वेताचेंच वाचलें पण तें मननपूर्वक वाचलें, मनांत जिरवून टाकलें. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं उदयास आलेल्या समता, स्वातंत्र्य व बंधुता या त्रिपुटीचा इंग्रजी काव्यांत जो प्रतिध्वनि दुमदुमत असतो, त्याने केशवसुतांचें हृदयाकाशहि दुमदुमून गेलें असावें. परंतु म्हणून त्या कल्पना केवळ प्रतिध्वनि स्वरूपाच्या राहिल्या, असें नव्हे. केशवसुतांचा नवा शिपाई केवळ परदेशी कल्पनांची पोपटपंची करीत नाही, हें या कवितेंतच उघड होतें. त्यांच्या शब्दाशब्दांत जोर आहे. जाणिवेचा जोम आहे. त्यांची प्रत्येक कल्पना स्वाभाविक आहे, भारतीय जीवनांतून उद्भवलेली आहे

ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा

किंवा,

चतकोराने मला न सुख
कूपांतिल मी नच मंडूक

इत्यादि साध्या साध्या कल्पनांतील स्वाभाविकता व जोम हेच त्यांच्या सच्चेपणाचे साक्षी आहेत. आणि या कवितेचा जसजसा विकास होतो, तसतसा तिचा हा भारतीयत्वाचा पाया अधिकाधिक पक्का होतो. केशवसुतांचा पिंड ज्या तत्त्वज्ञानावर पोसला गेला होता त्या तत्त्वज्ञानाचा व समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वांचा समन्वय ते घालून देतात—नव्हे, या दोहोंची मूलभूत एकात्मता त्यांना प्रतीत होते. या प्रतीतीच्या प्रभेने त्यांच्या कवितेंत चैतन्य ओतलें आहे.

केशवसुतांना शब्दसौंदर्य किंवा रचनाकौशल्य यांची देणगी लाभली नव्हती, असें अनेकांचें मत आहे. त्यांची कविता कित्येकदा नीरस व ओबडधोबड होते असेंहि मत आहे. या आक्षेपांत थोडेंबहुत तथ्य आहे, असें म्हणतां येईल. गोविंदाग्रजांसारखी शब्दसंपत्ति त्यांना लाभली नाही, किंवा बालकवींच्या शब्दांतील व रचनेंतील नाजुकपणाहि त्यांना साधला नाही. परंतु याचें मुख्य कारण हेंच की त्यांच्या कवितेची मूळ प्रकृति भिन्न आहे. ती मुख्यतः ओजस्वी आहे, विचारशील आहे. वैचारिक क्रांतीचें वाण तिने घेतलें आहे. गोड व नाजुक शब्दांचा वेष तिला मानवला नसता व शोभलाहि नसता. प्रस्तुत कवितेचेंच उदाहरण घ्यावयाचें तर हें उघड आहे की 'नव्या शिपाया'चें हें गाणें शिपाईबाण्याप्रमाणे धीट, सरळ, स्पष्ट हवें; व तें तसेंच आहे. परंतु त्याबरोबरच हेंहि आढळून येतें की जसा शिपायाच्या मनांतहि प्रेमाचा, कोमलपणाचा, नाजुक भावनेचा झरा असतो, तशी येथेहि योग्यस्थळीं कोमलता येते. तृणावृता भू, डोईवर तें नीलांबर,

सांवलींत गोजरीं मुलें
उन्हांत दिसतीं गोड फुलें

इत्यादि छटांमध्ये हा नाजुकपणा आढळून येतो. केशवसुतांच्या उपमा–उत्प्रेक्षांविषयीहि हेंच म्हणतां येईल. त्या अनेकदा क्लिष्ट होतात. त्यांत ओढून ताणून अर्थ बसवल्यासारखें होतें. येथील शेवटच्या कडव्यांतील हलव्याच्या उपमेमध्ये कांहीसें असें झालें आहे. परंतु त्याबरोबरच सूक्ष्म भावाविष्कार जेथे सहजपणें केला जातो अशाहि कितीतरी उपमा केशवसुतांच्या कवितेंत सापडतील. त्यांची कविता शब्दनिष्ठ नाही; अलंकारनिष्ठ नाही. केवळ मधुमधुर शब्दकलेचा वा नाजुक संगीतमयतेचा तिला हव्यास नाही. समाजांतील रूढिप्रियता, संकुचितपणा घालवून तेथे उदार मानवप्रेमाची स्थापना करण्याच्या प्रयत्नांत या कवीची प्रतिभा गुंतली होती. समाजांतील दोषांमुळे त्यांना जशी चीड येई, तशीच मानवाच्या उदात्त सामर्थ्याच्या जाणिवेने त्यांचें मन उत्स्फूर्त होई. प्रस्तुत कविता अशा स्फूर्तीतून उद्भवली आहे. ज्यावेळीं आमच्या या देशांत समता, स्वातंत्र्य व बंधुता यांचा उच्चारहि नव्हता, किंवा त्यांना पोकळ कल्पना समजण्यांत येत होतें, त्यावेळीं त्यांच्या अधिराज्याची ललकारी केशवसुतांच्या प्रतिभेने दिली, ही गोष्ट मराठी कवितेच्या अभिमान्यांना संस्मरणीय वाटावी.

अनुक्रमणिका

लघुकथा

अपमानित

सौ. इंदुमती शेवडे

शुक्राची चांदणी खाली घसरली नि आजूबाजूच्या भुरकट प्रकाशांत मिसळली त्यावेळीं सीतेला आठवलं की आपण सारी रात्र पलंगावर बसून काढली. पण त्याचं काय मोठंसं ? मागच्या एकोणीस वर्षांच्या एकोणीस गुणिले पासष्ट रात्रींपैकी किती रात्री तिनं जागून काढल्या याचा गुणाकारसुद्धा तिला करतां आला नसता. आजपर्यंत जीवनाची अशीं उलटींच गणितं तिला सोडवावीं लागलीं होतीं.

पण आजची रात्र वेगळी होती. एरवी रात्रीचा सगळा अंधार तिच्या मनांत जाऊन बसला की मग तिच्या रात्रीचा दिवस होई. उभी रात्र ती बिछान्याला पाठ लावीत नसे. पलंगाजवळच्या त्याच खिडकीशीं, त्याच ठिकाणीं बसून ती बाहेर पहात बसली राही. स्थलकालाच्या जाणीवेपलीकडे जाऊन, मग मनांतल्या काळोखांत कोणकोणत्या विचारांनी धावपळ केली हेंहि तिला समजत नसे. सर्वत्र नुसता काळोख...

पण आज तिच्या मनांत काळोख नव्हता. रिकामेपणा नव्हता. विचाराचं द्वंद्व होतं. उलटसुलट विचारांचा गुंता होता. उद्याच्या सुखाचा केविलवाणा मोह नि गेल्या एकोणीस वर्षांचं दुःख...त्याची प्रतिक्रिया...उत्कंठेनं नि अपेक्षेनं तिचं मन अधीर झालं होतं...उद्याचा दिवस कधी उजाडेल असं होऊन गेलं होतं. पण दुसरेक्षणीं साऱ्या जुन्या आठवणी तिच्या मनाला झोंबून जात नि वाटे कशाला उगवला हा दिवस ? त्यापेक्षा बिछान्याला पाठ लावावी...नि पुन्हा कधीच उठू नये.

आकाश काळोखांतून उमटून बाहेर पडत होतं, पण अजून पक्षांनी चोची धुतल्या नव्हत्या. कोंबडा आरवला नव्हता. बाहेर रस्त्यावर वर्तमानपत्रांच्या आरोळ्या नव्हत्या. दूधवाल्यांच्या सायकलींची खडखड नव्हती. दूर स्टेशनवर कुठून कुठेतरी जाणाऱ्या गाडीची भकभक ऐकूं येत होती. तिला एकदम वाटलं, अजून दहा तास आहेत... दुपारीं अडीच वाजतां कानपूरची गाडी अशीच येईल. तिनं भावोजी येतील...नि त्यांच्यावरोबर...

हव्या असलेल्या चेहऱ्याची जुळवाजुळव करूं लागलं तिचं मन. एकोणीस वर्षात कुठल्याहि चित्राच्या रेषा पुसट होतील. कुठल्याहि प्रतिमेचे अवयव मोडून पडतील...रंग उडून जाईल. पण माणसाचं मन मोठं चिवट असतं...फोटोच्या नेगेटिव्ह सारखं. त्याच्या मनावर माणसाचे ठसे कायम रहातात. तिच्या आठवणी साकार झाल्या. ती सोळा वर्षांची होती. त्यावेळीं तिनं पाहिलेला तो चेहरा त्यानंतर पुन्हा दिसला नाही.... एवढ्या अवधींत तो किती बदलला असेल ? कसा दिसत असेल ? आज आपल्याला त्याची ओळख तरी पटेल की नाही कोण जाणे !

...पण...पण आता पसतिशी उलटल्यानंतर आज त्या चेहऱ्याची कसली मातब्बरी ? कडकडून भूक लागली असतां हवं असलेलं ताट भूक मेल्यावर मिळावं तशी गत. जो चेहरा एकदा तरी दिसावा म्हणून सारं तारुण्य अश्रूंच्या पुरांत विरघळून वाहवून टाकलं...त्याचं आता काय ? तिचं मन कटु विचारांनी भरून गेलं.

ती बिछान्यावरून उठुन उभी राहिली. तों एकदम अंगांतून चमक निघाल्याचा भास झाला. डोकं जड असल्यासारखं वाटलं. बिछान्याकडे पाहून त्यावर पडून रहावसं तिला वाटलं. पण तेवढ्यांत...

अनुक्रमणिका

"कहो मिठ्ठू रामराम..." "राधेकृष्ण..." "गोपीकृष्ण..." बाहेर पोपटाची भूपाळी सुरू झाली. दुसरेक्षणीं गोठ्यांतून गाईची हाक ऐकूं आली. अंमळशानं गवळी दोहायला येईल. सावित्री भांड्याला येईल. ती उठली. बिछान्याची वळकटी कोपऱ्यांत उभी करून तिनं बाहेरच्या दाराची कडी काढली. चूळ भरून तिनं गाईच्या पुढ्यांत गवताचा पुळा टाकला. पोपटाला पुचकारलं...नि चुलींत विस्तव टाकून चहाचं आधण चढवलं.

हळूहळू एकेक करून मुलं उठलीं. तिनं कुणाचीं तोंडं पुसलीं, कुणाचे दात घासले, कुणाला मोरीवर नेलं, कुणाला कपडे चढवले...कोको पाजला...हीं तिचीं मुलं नव्हतीं. पण गेल्या एकोणीस वर्षांपासून ती घरांतल्या सर्व मुलांची आई होती. मरण येत नव्हतं म्हणून तिनं मुलांत विरंगुळा शोधला होता.

आंघोळीच्या वेळीं नेहमीप्रमाणे अंगावर थंड पाणी घेतांना तिला हुडहुडी भरली...पण तिनं लक्ष दिलं नाही. आंघोळीनंतर तिनं कुंकू लावण्यासाठी समोर आरसा धरला तेव्हा रोजप्रमाणे तिचा हात थरथरला नाही. तिला वाटलं एकोणीस वर्षं कुंकवाचा भार वाहिला. त्याचा संभाळ केला. आज मात्र ह्याला खरोखरीच अस्तित्वाचा हक्क आहे.

आठ वाजतां रोजसारखी बेबी हातांत फणी घेऊन आली.

"काकू, वेणी घालून देना."

वेणी घालतांना बेबीचं ग्रेंड सुरू झालं

"सीताकाकू, काल बाबा कुठे गेले ग ?"

"आईला विचार."

"आई म्हणते, बाबा एक नव्या काकांना आणायला गेले. खरं ना हें ?"

"हं"...

"अन् काकू, आई म्हणत होती हे नवे काका तुझे आहेत म्हणून."

"हं."...

"मग इतके दिवस सांगितलं नाहीस तूं आम्हाला ? आम्हाला कधी दाखविले नाहीस ?... कुठे होते ग ते ?"

"हं, नीट बैस, वेणी वाकडी येईल..."

"येऊं दे वाकडी आली तर...पण सांग ना, तुला खूप आनंद झाला असेल नाही ?"

बेबी तिला झोंबली...नि एकदम ओरडली, "आई, काकूचं आंग बघ किती गरम आहे तें."

दोघी जावा धावून आल्या. तिला ताप चढला होता...जावांच्या आग्रहाने ती पलंगावर पडली. पण बेबीचे ते शब्द मनाला जाऊन चिकटले.

"काकू, तुला खूप आनंद झाला असेल नाही ?"

अन् नेमकं तेंच तिला समजत नव्हतं. ज्या दिवसासाठी ती देवाची रोज करुणा भाकीत असे तो दिवस आज उजाडला होता...पण किती उशीरा ? कालाच्या सीमेंत मर्यादित असलेल्या माणसाच्या आयुष्यांत कालाचं किती महत्त्व आहे ? आज तिचं तारुण्य संपलं होतं...तिनं अपमान गिळला होता—लोकनिंदेनं हृदयाला पडलेलीं भगदाडं बुजवलीं होतीं. नि पुढच्या जन्मांत सुखाची आशा धरीत एका थकलेल्या प्रवाशाप्रमाणे ती आयुष्याची वाट चालत होती. आता सुखाच्या लालुचीनं तोंडाला पाणी सुटण्याचं तिचं वय राहिलं नव्हतं...सुखदुःख दोन्ही तिच्या लेखीं सारखींच होतीं. पाठवायचं होतं तर इतक्या उशीरा तिच्या आयुष्यांत सुख पाठवून दैवाला काय साधायचं होतं ? अन् आता तिनं त्याकडे पाठ फेरली तर ? खरंच कां फेरूं नये ? दुःखानं हृदयाला एवढी घरं पाडलीं की, तें मधाच्या पोळ्याप्रमाणे झालं... सारं सुख अश्रूंच्या वाटे वाहून गेलं. त्या अश्रूंची काय किंमत ? ती कुणी द्यायची ?

* * *

पुढे येणाऱ्या आनंदाच्या क्षणाकडे ती निर्भयतेनं पहात होती. तरीपण तिचं स्त्रीचं मन मेलं नव्हतं. तिचे डोळे घड्याळावर नि कान रस्त्याकडे होते मधूनच एखाद्या टांग्याची चाहूल लागली की तिचे डोळे खिडकीबाहेर पाहात. घड्याळाचे काटे शाळेंत जाणाऱ्या लहान मुलाप्रमाणे मधूनच थबकून उभे

अनुक्रमणिका

राहिल्याचा तिला भास होई. ती पलंगावर स्वस्थ पडून होती...पण स्वप्नांत वावरावं त्याप्रमाणे तिचं मन घरांतल्या हालचालींकडे अर्धजागृत अवस्थेंत वावरत होतं.

पलीकडे स्वयंपाकघरांतून कसला तरी खमंग वास येत होता. माजघरांत छोटचा जाऊबाई बन्या नि चंदूला कसलीशी लांबलचक यादी सांगत होत्या. माडीवर अडगळीच्या खोलींत रखमा नि विठोबा सामानाची उचलठेव करीत होते. एकोणीस वर्षांपूर्वी ती खोली तिची होती. पण लग्नानंतर फक्त दोन महिने. त्यानंतर पहिल्या मंगळागौरीला ती माहेरीं गेली नि तिथंच भावोजींचं पत्र आलं.

"रामचंद्र एकाएकी घरांतून नाहीसा झाला आहे. त्याचा तपास काढण्यासाठी मी बनारसला जात आहें. सीतेचं सांत्वन करा."

भाऊजी गेले. पुष्कळ शोध केला. परंतु सारं व्यर्थ...अन् मग ती अशी अळणी बनली. जुन्या आठवणींनी तिचं मंग शहारलं. ती त्यांना विस्मृतींत फेकण्याचा प्रयत्न करीत होती. तिचा ताप वाढत होता. दुपारीं एक वाजतां जेवणींखाणीं आटोपून तिच्या पलंगावर मोठी जाऊ येऊन बसली नि म्हणाली, "आज एवढा आनंदाचा दिवस...कशी भलत्या दिवशीं आजारी पडलीस? आता भावोजी आले म्हणजे म्हणतील...मा त्यामागून तुम्ही हिला धड संभाळलीसुद्धा नाही!"

"जातांना तुम्हाला संभाळायला सांगून गेले होते का?" तिनं खोचून विचारलं.

"असं काय बोलतेस? इतक्या वर्षांनंतर भाऊजी घरीं येताहेत...आता तरी सुखानं नांदा." जाऊ म्हणाली.

ती विमनस्कपणें हसली, तिचा ताप एकसारखा वाढत होता. घशाला कोरड पडत होती. तिनं डोळे मिटून घेतले.

घड्याळानं तीनचे ठोके दिले,..नि तेव्हांपासून तिची नजर घड्याळावर जाऊन खिळली. रस्त्यावरून गडगडत जाणाऱ्या प्रत्येक टांग्यावरोबर तिचं हृदय वरखाली होऊं लागे.

मोठीं मुलं अंगणांत खेळत होतीं. छोट्यांना बेबी व बिंदू कडेवर घेऊन उभ्या होत्या बाहेरच्या दाराशीं. बया नि चंदू स्टेशनवर केव्हाच पसार झाले होते. काका गाडींतून उतरतांच एकानं एकदम तसंच पुढे सांगायला यायचं म्हणून जाऊबाईंनी बजावलं होतं.

पण तीन वाजले तरी गाडीचा पत्ता नव्हता नि साडेतीन वाजतां बन्या नि चंदू स्टेशनवरून तसेच परतले. "गाडी आली पण बाबा आले नाही." त्यांनी सांगितलं. सर्वांचीं तोंड काळजीनं सुकून खारकेसारखीं झालीं. सहस्र शंकाकुशंकांनी वातावरण भरून गेलं.

चार वाजतां तारेचा शिपाई आला. तारेंत मज-कूर होता. "गाडी चुकली. मी नि रामचंद्र रात्रीच्या गाडीनं येत आहोंत..."

"म्हणजे भाईजी नक्कीं सापडले म्हणायचे." धाकटचा जाऊबाई आनंदून म्हणाल्या. सर्वांना हायसं वाटलं.

सीतेनं निश्वास सोडला. "देवा अजून आठ तास आहेत. मी निर्णय घ्यावा म्हणून तर तुझी ही सोय नसेल ना?"

* * *

तासाभरानं ती उठली. आजूबाजूला कुणी नव्हतं. धाकटी जाऊ स्वयंपाकघरांत मुलांचीं खाणींपिणीं करण्यांत गुंतली होती....मोठी देवाजवळ तेलवात करीत होती. सीता गेली नि आपल्या पेटीशीं बराच वेळ खुडबुड करीत बसली. थोडचा वेळानं तिनं उठून पेटीला कुलूप घातलं...भिंतीवर टांगलेल्या रामचंद्राच्या फोटोकडे एकदा डोळे भरून पाहिलं...नि येऊन पलंगावर अंग टाकलं.

* * *

रात्रीं बराचवेळपर्यंत मुलं जागीं होतीं. त्यानंतर "नवेकाका येतांच तुम्हांला उठवूं" असं आईकडून वचन घेऊन झोपीं गेलीं. बन्या नि चंदू अजून जागे होते. मोठ्या जाऊबाईंनी तिच्या अंगाला हात लावून पाहिला त्यावेळीं ताप तसाच होता. ती अर्धवट झोपेंत होती.

"किती वाजले?" तिनं क्षीणपणें विचारलं.

"नऊ. अजून दोन तास आहेत गाडीला यायला."

"दोन तास ?"

"हो. लवकर निघून जाईल हा वेळ. इतकीं वर्षं थांबलीस. आता दोन तासांचं काय ? "

ती विचित्रपणे हसली.

"कसं वाटतंय आता ? " जावेनं ममतेनं विचारलं.

"फार बरं. "

"थोडी झोप घे तूं...म्हणजे आणखी बरं वाटेल. भावोजींची गाडी आली की उठवीन तुला..."

तिनं हळू हळू डोळे मिटले.

जागृति नि विस्मृतीच्या सीमारेषेवर मनुष्य स्वप्नं पाहतो म्हणतात. तिचं मन ह्यावेळीं त्याच रेषेवर घुटमळत होतं...एकाद्या अफाट वाळवंटांत चारपांच पावलांचे अस्पष्ट ठसे उमटावे तसं होत होतं. पुन्हा पुन्हा तेच दोन तीन ठसे तिच्या मनःश्चक्षूंसमोरून रेंगाळत जात होते.

"बारा वर्षांची एक चुणचुणीत मुलगी...लख-लखत्या विजेचे डोळे...खळखळ वाहणाऱ्या ओढ्याचं हास्य...जलतरंगावर धावणारं स्वरसप्तक...ही खळ-खळ फार वाढली की आई नेहमी म्हणे, "मुलीच्या जातीनं फार हसूं नये..."

"काय होतं ग ? "

" फार हसलं की फार रडावं लागतं."

प्रत्युतरादाखल पुन्हा ओढ्याची खळखळ... असं कां असावं ? तिला कधीच उलगडा झाला नाही. पण तिनं तेच अनुभवलं पुढे.

× × ×

सुखाचीं उंच शिखरं...हवेंत तरंगणाऱ्या धुळीच्या कणाप्रमाणे तिचं मन तरंगत होतं. डोळ्यांत तीच लखलखती वीज...ओठावर तेच खळखळणारे ओढे.... पण फक्त चार महिने...शिखरावरून ती खाली आपटली. ओठावरची खळखळ डोळ्यावाटे वाहूं लागली.... डोळ्यांतली वीज डोक्यावर आदळली...

रामचंद्रानं सीतेचा त्याग केला होता. तिला अपमान वाटला. एका शब्दाची विचारपूस नाही. वीटभर चिठ्ठी नाही. खुलासा नाही. कशाची ही शिक्षा ? अन् अपराध ? असं हें अपमानित जीवनाचं जूं घेऊन ती आयुष्याचा गाडा ओढीत राहिली. नि मरण आलं नाही म्हणून जगली....

वीस वर्षं...रखरखीत उन्हाचं लांबचलांब वाळवंट ...हिरवळीचं नांव नाही...आशा नाही. पण त्या वाळवंटापलीकडे मृत्यूचा काळाकुट्ट किनारा...अन् त्यापलीकडे अनंताचा अफाट दर्या. त्या दर्याची मंद, भीषण, गंभीर घरघर तिला ऐकूं येत आहे. एका थकलेल्या जीर्ण, शीर्ण प्रवाशाप्रमाणे ती त्या दर्याच्या काठानं चालत जात आहे. तिच्यांत चालण्याचं त्राण नाही...इच्छा नाही. अगदी शांत, गाढ झोपेसाठी तिचं मन आसुसलेलं आहे. तेवढ्यांत एकाएकी अकल्पितपणे जोराचं वादळ उठतं...अचानक एके दिवशीं एक कागदाचं चिटोरं सोसाट्याच्या वाऱ्यानं उडून येतं. त्यांतलीं अक्षरं तिच्या डोळ्यासमोर नाचूं लागतात.

"सुखाचा शोध करायला निघालों होतों. इतकीं वर्षं संसाराचा त्याग केला, घरदार सोडलं, सीतेला सोडलं, भगवीं वस्त्रं धारण केलीं...पण मनःशांति मिळाली नाही. आज वाटतं माझा मार्गच चुकीचा होता. उशीरा का होईना, केलेली चूक सुधारीत आहें. सीतेला सांग मला क्षमा कर. मी परवा येत आहें."

* * *

विचाराचं चक्र गरगर फिरत आहे. एकाने केलेल्या चुकीची शिक्षा दुसऱ्याला ? कां म्हणून ? नि ती त्यानं निमूटपणे जन्मभर सोसायची ? स्त्रीची हीच भूमिका ? स्त्री म्हणजे अंगांतला कपडा ? की वाटेल तेव्हा घातला, नाही तर फेकून दिला ? असं कां ? ह्याच प्रश्नाशीं तिचं मन प्रत्येक वेळीं अडखळे.

* * *

तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वहात होते. मोठ्या जाऊबाई तिचा खांदा हलवीत उभ्या होत्या.

"सीते...ऊठ... अकरा वाजले..."

विस्मृतीच्या खोलच खोल थरांतून तिचं मन कांही काळ वर आलं. शुद्धीवर येत तिनं विचारलं,

"गाडी आली ?"

"हो. नुकतीच स्टेशनवर आलीय. अजून टांगा घरीं पोचायचाय...ऊठ ! जागी झालीस का ? "

"हो...हो..." तिनं हळू हळू पुन्हा डोळे मिटले. विलक्षण झापड होती तिच्या डोळयांवर. जाऊबाईंनी कपाळाला हात लावला...

"सीते ! शुद्धीवर आहेस ना ? रामचंद्र भाउजी येताहेत..."

"हं..." खोल आवाजांत ती म्हणाली. पण तिचे डोळे मिटलेलेच होते. मन स्मृतिविस्मृतीच्या दरम्यान हेलकावे खात होतं. अंमळशानं तिला वाटलं...दूर कुठे तरी दिवसभर ऐकलेल्या टांग्याची खडखड पुन्हा कानांत भरत आहे. घोड्याच्या टापा ऐकूं येत आहेत. त्यांच्या गळयांतल्या घुंगरांची किणकिण कानांत निनादत आहे.

कोपऱ्यावर टांगा वळला...दाराशीं थांबला... अंगणांत पावलं वाजलीं. दोनचार बोलण्यांचे मिश्रित आवाज...मुलांची गडबड...मधूनच ओसरींत ट्रंकेचा आवाज होतोय. जाऊबाई कांहीतरी सांगत होत्या... त्यानंतर कुणाचे तरी शब्द कानावर पडताहेत. एकोणीस वर्षांपूर्वीचे सुप्त मनाचे पापुद्रे सरकून त्याखाली ते शब्द घुमतात...नि त्यांची तिला ओळख पटते...ओळखीचा आवाज वाटतो...भाऊजी कांहीतरी सांगताहेत...जाऊबाईंचा जड आवाज...आता पावलं अगदी जवळ तिच्या जवळ पडताहेत ..अंमळशानं हळुच कुणाचा तरी हळुवार स्पर्श तिच्या हाताला होतो...सुखाच्या संवेदनेनं तिचं मन लहरलं. पाठोपाठ कानांत शब्द उमटले..." सीते ! मी आलोंय... "

पण दुसरे क्षणीं ते विरले...व एका अफाट पोकळींत त्या शब्दलहरींची दूरदूर लांबलांब वलयं पसरलीं. त्या वलयांवर बसून ती स्वैरपणे उडत होती...आता तें रखरखीत वाळवंट मागे राहिलं होतं...इतक्या वर्षांनंतर पुन्हा तेंच ओढयाचं खळखळणारं हास्य...विजेचे लखलखणारे डोळे.

श्रीराम जवळ येतांच अपमानित सीता पृथ्वीच्या पोटांत गडप झाली होती. रामचंद्रानं शोक केला, भावोजींचं मन खचलं...जावा हळहळल्या...सर्वांनी नियतीला दोष दिला.

रामचंद्रानं सुमारें एक महिन्यानंतर तिची पेटी उघडली. तींत कसलीशी एक पुडी त्याला सापडली. पण कसली सुद्धा शंका त्याच्या मनांत डोकावली नाही.

सभासदांना नम्र सूचना

वि. सा. संघाच्या ज्या सभासदांना घटनेंत कांही बदल अथवा दुरुस्त्या सुचवायच्या असतील त्या त्यांनी नोव्हेंबर १९६३ अखेरपर्यंत केन्द्रीय कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी अशी घटनाविषयक प्रश्न समितीची सभासदांना विनंती आहे.

सरचिटणीस
वि. सा. संघ

दि. ६९-१०-६३

व्यक्तिपरिचय

कै. पंडित श्री. बाळकृष्णशास्त्री महानुभाव*

प्रा. विष्णु भिकाजी कोलते

त्रेपन वर्षांपूर्वी—

सुमारे ५३ वर्षांपूर्वी नागपूरच्या इतवारीतील लाडपुऱ्यातून एक जैन अगरवाल वाणी संसाराला कंटाळून बाहेर पडला आणि पाय नेतील तिकडे जाऊ लागला. त्याच्या बरोबर दोन अडीच वर्षांचा एक लहान मुलगा होता. त्याचे शरीर बुटके होते. डोळे बारीक होते. हातापायाच्या काडया दिसत होत्या. पण चेहरा मात्र गोंडस होता. दोन वर्षांच्या त्या मुलाला-संसाराविषयीची आसक्ति किंवा विरक्ति याची काय कल्पना असणार? तथापि, वडिलांच्या बरोबर का होईना पण तो बालपणीच अभावितपणे विरक्तीची वाट चालू लागला होता. आपले स्वतःचे घर सोडून ईश्वराच्या घराचा मार्ग त्याने स्वीकारला होता.

आणि गेल्या महिन्यात

—आणि गेल्या महिन्यात तोच मुलगा निराळयाच अर्थाने 'ईश्वरदर्शना'ला निघाला होता. पण आता तो मुलगा नव्हता तर वयाची पन्नाशी उलटून गेलेला तो एक प्रौढ संन्यासी होता. त्याच्या अंगावर तांबूस रंगाची वस्त्रे होती. डोक्यात मोतीया रंगाचा फेटा होता. त्याच्या डोळयाला चष्मा होता. डोळे बंद होते. चेहऱ्यावर शांतता पसरलेली होती. त्रेपन वर्षांपूर्वी तो पायी रडत चालत चालला होता; आज त्याला माडात बसवून चार जण खांद्यावर होऊन जात होते. पूर्वी त्याचे वडिलच काय ते त्याच्या बरोबर होते; आज त्याच्या मागेपुढे अनेक स्त्रीपुरुषांचा घोळका होता. पण...पण... पूर्वी त्या मुलात जे चैतन्य होते ते चैतन्य आज त्याच्या शरीरातून निघून गेले होते. तो निष्प्राण बनलेला होता. त्याच्या पार्थिव शरिराची ती मिरवणूक होती. त्याची ती प्रेतयात्रा निघालेली होती.

हा संन्यासी पुरुष म्हणजेच पंडित बाळकृष्ण शास्त्री होत. सप्टेंबर महिन्याच्या १५ तारखेला नागपूर येथील मेडिकल कॉलेजच्या इस्पितळात त्यांचा आकस्मिक रीतीने मृत्यू झाला. त्यांचा मूत्रावरोधाचा त्रास दूर करण्यासाठी त्यांच्यावर एक लहानशी शस्त्रक्रिया करणें डॉक्टरांना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यांना शस्त्रक्रियागारात नेण्यात आले. पण तेथील तो एकंदर देखावा पाहूनच शास्त्रीबुवा घाबरून मूर्छित झाले. त्यांचे हृदय एकदम बंद झाले. प्रसंगावधान राखून त्यांची छाती फाडून डॉक्टरने ते हृदय ताबडतोब चालू केले; आणि त्यांना ऑक्सिजनवर ठेवले. पण शास्त्रीबुवांचे देहभान जे एकदा नाहीसे झाले ते परत आले नाही. जवळ जवळ चोवीस तास त्यांनी ऑक्सिजनवर काढले; आणि शेवटी सकाळीच सुमारे दहा साडेदहा वाजता त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या या आकस्मिक मृत्यूची बातमी मी ऐकली त्यावेळेस तिच्यावर माझा विश्वास बसेना. नुकतेच दोन तीन दिवसांपूर्वी मोठया पहाटे ते माझ्या घरी आले. अर्धापाऊण तास आम्ही मोकळया मनाने गप्पागोष्टी केल्या. त्यांच्यावरोबर काही बाबतीत मला विचारविनिमय करायचा होता. दोन दिवसांनी दिल्लीस जाऊन तेथून परत आल्यानंतर माझ्या कामासाठी त्यांनी

---

* या लेखाचें शुद्धलेखन मुद्दाम लेखकांच्या आग्रहामुळे त्यांनी लिहिलें तसें ठेवलें आहे. —संपादक

अनुक्रमणिका

नागपूरला तीनचार दिवस मुक्काम करण्याचे कबूल केले. नाही नाही म्हणत असतांना आम्ही त्यांना आग्रहाने दूध प्यायला लावले...त्यावेळचा त्यांचा तो खेळकरपणा, नेहमीची घाई, बोलतांना उडणारी तारांबळ, त्यावरून मी केलेली थट्टा—हे सर्व दोन तीन दिवसापूर्वी घडले आणि आता शास्त्रीबुवा 'गेले' हे ऐकतांना त्यावर विश्वास बसणार कसा ?...

पण ते सर्व खरे होते–अगदी खरे होते ! कारण अर्ध्या तासाच्या अवधीत तीच ती बातमी मला तीनचार जणांनी येऊन सांगितली. त्यांच्या अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी सांगितली. त्यामुळे मला अतिशय उदास उदास वाटू लागले ! शास्त्रीबुवांच्या शिष्यमंडळींनी त्यांचे प्रेत मेडीकल कॉलेजच्या इस्पितळातून मंगळवारीतील महानुभाव मंदिरांत आणले. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी नागपुरातील अनेक स्त्रीपुरुष गोळा झाले. श्री. हरीभाऊ नेने यांना घेऊन मीहि पाचसाडेपाचच्या सुमारास तेथे जाऊन पोचलो. शास्त्रीबुवांचा फार मोठा मित्रपरिवार व शिष्यवर्ग नागपुरात आहे. त्यांनी 'माड' रचला; त्यांचा पूजापुरस्कार आटोपला आणि मग रात्री सुमारे ८ च्या सुमारास त्यांची प्रेतयात्रा काढली. नेमका त्याचवेळी जोराचा पाऊस सुरू झाला. मी व हरीभाऊ नेने मधूनच परत फिरलो. प्रेतयात्रा उमरेड रस्त्याने जाऊन जवळच्या एका शेतात थांबली. तेथेच शास्त्रीबुवांच्या पार्थिव शरीराला सन्मानपूर्वक 'भूमिडाग' देण्यांत आला. आणि अशा रीतीने शास्त्रीबुवांची इहलोकाची यात्रा संपली.

जीवनाचे गूढ

कै. शास्त्रीबुवांचे आयुष्य म्हणजे एक गूढ होय असे मला नेहमीच वाटत आले. " यावज्जीवहि 'काय मी ' न कळलें आप्तांप्रती नीटसें। मित्रांतेंहि कळे न गूढ— न कळे माझें मलाही तसें ॥ "...हे गडकऱ्यांचे शब्द शास्त्रीबुवांच्या तोंडी यथार्थ शोभून दिसतील. आपण नक्की कोण, आपले आईवडील कोण, आपले आप्तेष्ट कोण याची त्यांना काहीच माहिती असू नये हे एक गूढच नाही तर काय ? आपल्या आईवडिलांच्या नावाचा शोध घेण्याचा शास्त्रीबुवांनी पुष्कळ प्रयत्न केला पण तो शोध त्यांना शेवटपर्यंत लागला नाही. अनेक जण त्यांना 'पंजाबी ' समजतात पण महानुभाव वृद्ध मंडळीकडून मिळालेल्या माहितीवरून ते खरे नाही असे समजते. आपण 'जन्माने वैदर्भीय ' असून आपली 'मराठी मातृभाषा ' आहे हे शास्त्रीबुवांना नक्की ठाऊक होते. डॉ. य. खु. देशपांडे यांनी 'महाविदर्भातील एक होतकरू ब्राम्हणेतर व्यक्ति', म्हणून त्यांचा उल्लेख 'महानुभाव पंथा'च्या प्रस्तावनेत केलेला आहे. विदर्भ किंवा महाविदर्भातील नागपूर हेच त्यांचे जन्मस्थळ. त्यांचे आईवडील स्वत: जैनधर्मी वाणी होते असे म्हणतात. शास्त्रीबुवांचा जन्म झाल्यावर प्लेगच्या तडाक्यात सापडून प्रथम त्यांची वडील बहीण मृत्युमुखी पडली; आणि पाठोपाठ त्यांच्या आईनेहि तोच मार्ग धरला. या आकस्मिक आपत्तीमुळे ज्यांचा संसार सर्वस्वी उध्वस्त झाला होता असे शास्त्रीबुवांचे वडील विरक्त होऊन नागपूर सोडून निघाले व वाट सापडेल तिकडे जाऊ लागले तर आश्चर्य काय ? बरोबर त्यांनी आपल्या मुलाला घेतले होते. उभयता बापलेक योगायोगाने माहूरला जाऊन पोचले. आश्रयाची याचना करताच गावातील ब्राह्मणांनी त्यांना देवदेवेश्वर संस्थानचे महंत श्री. लक्षराज महानुभाव यांच्याकडे जाण्याला सांगितले. वडिलांनी आपल्या लहानग्या मुलाला श्री. लक्षराज महंतांच्या पायावर वाहिले. बोबडे बोलणाऱ्या त्या गोजिरवाण्या बालकाला आपल्या मांडीवर घेऊन लक्षराजांनी त्याचे नाव बाळकृष्ण ठेवले. त्याचे वडील महानुभाव पंथ स्वीकारून तेथेच राहिले. लौकरच त्यांचा अंत झाला. बाळकृष्णावर श्री लक्षराजांचे फार प्रेम जडले. त्याच्या संगोपन—संवर्धनाची ते विशेष काळजी घेत. बाळकृष्ण थोडा मोठा झाल्यावर श्री लक्षराजबाबांनी त्याला समारंभपूर्वक महानुभाव पंथाची दीक्षा दिली व पुढील शिक्षणासाठी पेशावरला पाठविले.

बालपण व विद्याभ्यास

माहूरकर महंत श्री लक्षराज यांचे पट्टशिष्य श्री दत्तराज महानुभाव हे त्यावेळी पेशावरलाच राहत. त्यांच्याजवळ बाळकृष्णाने काही वर्षे लौकिक विद्याभ्यासात घालवली. तेथे असतानाच उर्दू व पंजाबी भाषांचे संस्कार त्यांच्यावर चांगले झाले. साधारणपणे त्यांच्या वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षी ब्रम्हविद्येचे आणि महानुभाव तत्त्वज्ञानाचे व आचारधर्माचे शिक्षण

मिळावे म्हणून त्यांना महाराष्ट्रात परत पाठविण्यात आले. इकडे त्यांनी सहासात वर्षे घालविली. या कालातील बहुतांश भाग त्यांनी बेलापूर (जि. अहमदनगर) येथे श्री वैरागी बुवा नावाच्या महंताजवळ काढला. तेथेच त्यांनी महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले.

वैरागीबुवांच्या आणि इतर महात्म्यांच्या सहवासात त्यांच्या अंगी विरक्तिहि चांगली बाणली. त्यावेळी, उत्कट अंतःकरणाने श्रीचक्रवरप्रभूला आळवितांना आपले डोळे पाण्याने कसे भरून येत आणि आपले देहभान कसे नाहीसे होई याच्या अनेक आठवणी शास्त्रीबुवांनी मला सांगितल्या आहेत.

याच सुमारास अमरावती जिल्ह्यातील चांदुरबाजारजवळ सिरसगावबंड येथे महंत श्री विद्वांस बुवा महानुभाव यांनी एक संस्कृत विद्यालय स्थापन केले होते. बाळकृष्णाची रवानगी तेथे करण्यात आली. या संस्कृत विद्यालयात बाळकृष्णाने दोन वर्षेपर्यंत संस्कृतचा अभ्यास केल्यानंतर व पुढील अभ्यासासाठी त्यांना पुन्हा पंजाबात पाठविण्यात आले. हरिपुर हजारा येथील संस्कृत विद्यालयात त्यांचे संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण होऊन सुमारे १९२५ मध्ये पंजाब विद्यापीठाची 'शास्त्री' ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले. 'बाळकृष्ण' आता 'बाळकृष्ण शास्त्री' बनला. अशा रीतीने संस्कृतविद्यापारंगत होऊन श्री बाळकृष्ण शास्त्री इ.स. १९२५ मध्ये पुन्हा महाराष्ट्रात आले आणि माहूर येथे राहू लागले.

महानुभाव पंथ आणि महाराष्ट्र

यापूर्वी महानुभावपंथाच्या बाबतीत महाराष्ट्रात अनेक महत्त्वाच्या घटना घडून आल्या होत्या. माहुरकर महंत श्री लक्षराज बाबा केव्हाच निवर्तले होते. व त्यांच्या जागी श्री दत्तलक्षराजाची स्थापना झाली होती. श्रीलक्षराजाच्या मृत्युनंतर त्यांचे देवदेश्वर संस्थान तेथील पुजारी मंडळींनी बळकावण्याचा प्रयत्न केला. पण श्री दत्तराजांनी तो असीम धैर्याने आणि आपल्या पंजाबी चातुर्याने हाणून पाडला. त्यासाठी त्यांना अविश्रांत खटपट करावी लागली. ती करीत असतांनाच महानुभावपंथाविषयी महाराष्ट्रात पसरलेल्या अज्ञानजन्य गैरसमजुतींचा त्यांना अत्यंत कटु अनुभव आला. संस्थानावरील या संकटातून ते बाहेर पडतात न पडतात तोच एणगाव (पू. खा.) येथीळ आपल्या कीर्तनात सुप्रसिद्ध वारकरी संत श्रीविष्णुबुवा जोग यांनी इ. स. १९०७ च्या सुमारास महानुभाव पंथाविषयी काढलेल्या अनुदार उद्‌गारामुळे महानुभावाविरुद्ध नवीनच वादळ निर्माण झाले. त्याला तोंड देण्याची जबाबदारी ज्या महानुभाव पंडितांनी आपल्या अंगावर घेतली त्यात श्री माहुरकर महंत श्रीदत्तलक्ष हे प्रमुख होते. इंपीरिअल गॅझेटीअरमधील माहितीचा हवाला देऊन श्री विष्णुबुवा यातून निर्दोष सुटले; कोर्टातील दाव्याचा निकाल महानुभावांच्या विरुद्ध लागला. त्यामुळे श्रीदत्तलक्षराजादि महानुभाव महंत मंडळीवर विशेषच जबाबदारी येऊन पडली. महानुभावांचे ग्रंथ सांकेतिक लिपीत असल्यामुळे इतरांना ते वाचता येत नाहीत. त्यामुळे वस्तुस्थितीचा विपर्यास होऊन पंथीयेतरात गैरसमज पसरण्याला मदत झाली ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. हे गैरसमज नाहीसे करावयाचे असल्यास मूळ ग्रंथांचे प्रकाशन होणे त्यांना अवश्य वाटले. पण त्यापूर्वी पंथीयेतराकडून, इंपीरीअल गॅझेटीअर आणि अन्य ग्रंथ यातील माहिती दुरुस्त करून घेणे अवश्य होते. त्यासाठी महंत श्री विद्वांस महानुभाव व दत्तलक्षराज महानुभाव आदि महंतांनी आपल्या मूळ पोथ्या डॉ. भांडारकरासारख्या विद्वानांना दाखविल्या आणि त्यांच्याकडून महानुभाव पंथाचे वास्तव स्वरूप जनतेसमोर मांडले. श्रीदत्तलक्षराज व श्रीगोपीराज उर्फ महात्मा मुसाफीर हे दोघे जण कै. वि. ल. भावे यांच्या घरी पाचसहा महिने जाऊन राहिले. महानुभावांच्या मूळ पोथ्या त्यांनी त्यांना दाखविल्या आणि महाराष्ट्र सारस्वतात महानुभावाविषयीचा मजकूर लिहिण्याला मदत केली. अशा वातावरणातच भक्तिवैराग्यसंपन्न श्री. बाळकृष्ण शास्त्री पंजाबातून कृतविद्य होऊन महाराष्ट्रात माहूरला येऊन पोचले. गुरुतुल्य असलेले आपले गुरुबंधु महंत श्रीदत्तलक्षराज महानुभाव, महंत श्री विद्वांस महानुभाव, श्री. गोपीराज महानुभाव इत्यादींच्या परमार्गसेवेच्या प्रयत्नांचा महान आदर्श श्री. बाळकृष्ण शास्त्री यांच्यासमोर होता. त्यातूनच त्यांना ग्रंथलेखनाची स्फूर्ति मिळाली. आपल्या अध्ययनाचा योग्य तो उपयोग करून आपल्या महानुभाव

अनुक्रमणिका

पंथाची वाणीने व लेखणीने सेवा करण्याचे त्यांनी ठरविले. संस्कारित वाणी त्यांच्याजवळ होती पण तीत तोतरेपणाचे व्यंग होते. त्यामुळे शास्त्रीबुवांना स्पष्ट व अस्खलित बोलता येत नसे. या आपल्या शारीरिक वैगुण्याबद्दल त्याना अनेकदा वाईट वाटे. तरीहि, मोठ्या श्रोतृसमुदायासमोर जरी नाही तरी मोजक्याच श्रोत्यासमोर ते बोलत असत. वाणीतील व्यंगामुळे त्यांनी व्याख्याने दिली नाहीत; पण आपल्या जिज्ञासू शिष्यासमोर अनेक परिणामकारक प्रवचने मात्र पुष्कळ केली. तथापि आपले नैसर्गिक व्यंग लक्ष्यात घेता वाणीपेक्षा लेखणीनेच आपल्याला अधिक सेवा करता येईल हे त्यांनी ओळखले व म्हणून ते लेखनाकडे वळले.

'श्रीचक्रधरचरित्र' —भूमिकापर ऐतिहासिक दृष्टि

शास्त्रीबुवांचे लक्ष पहिल्याप्रथम वेधले गेले तें त्यावेळी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या महंत मुकुंदराज आराध्य यांच्या श्रीचक्रधरचरित्राच्या भूमिकेकडे. मुकुंदराज आराध्यांनी लीळाचरित्रांतील आख्यायिका हिंदीत अनुवादित करून आपला ग्रंथ इ. स. १९३० मधे प्रसिद्ध केला. त्याला लिहिलेल्या विस्तृत भूमिकेत त्यांनी असे प्रतिपादन केले की श्रीचक्रधरस्वामी हे गुजराथेतील अन्हिलवाडा येथील सोळंकीवंशोद्भव विशालदेवाचे पुत्र होते, अर्थात ते क्षत्रिय होते. हे सिद्ध करण्यासाठी कालाच्याही बाबतीत त्यांना बरेच परिवर्तन करावे लागले. श्री. बाळकृष्ण शास्त्री यांना हे सर्व अनैतिहासिक वाटले म्हणून महंतजीचे खंडन करण्यासाठी त्यांनी 'श्रीचक्रधरचरित्र—भूमिकापर ऐतिहासिक दृष्टि' हा विस्तृत प्रबंध लिहिला. मुकुंदराजाचा मूळ ग्रंथ हिंदींत असल्यामुळे शास्त्रीजींनाहि आपला प्रबंध हिंदीत लिहावा लागला. तो विविधज्ञानविस्ताराच्या १९३१ व १९३२ मधील अंकातून प्रसिद्ध झालेला आहे. पुढे त्यांनी तो स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपानेही प्रसिद्ध केला. प्रस्तुत प्रबंधात शास्त्रीबुवांनी श्री. चक्रधर स्वामी हे नागर ब्राह्मण असून सोळंकी कुलोद्भव विशाळदेव व चक्रधराचे वडील विशालदेव ह्या भिन्न व्यक्ति असल्याचे दाखविले आहे. आपल्या समर्थनासाठी ताम्रपट व शिलालेख; संस्कृत, हिंदी, मराठी आणि इंग्रजी संशोधनात्मक ग्रंथ इत्यादि अनेक साधनांचा त्यांनी मोठया कुशलतेने उपयोग करून घेतला. शास्त्रीबोवांच्या चिकित्सक बुद्धीचा त्यावरून उत्तम परिचय होतो. श्रीचक्रधराच्या कालावर 'ऐतिहासिक दृष्टि' टाकतांना सिंहस्थयात्रेच्या निमित्ताने स्वामी मेहकरहून पैठणला गेले तो काळ सांप्रदायिक दृष्ट्या शके ११८६ मानण्यात येत असला तरी ऐतिहासिक दृष्ट्या त्यांनी तो शके ११९० ठरविला हे योग्यच झाले. पण याचमुळे पुढे लौकरच महंत श्री दत्तलक्षराजांच्या रोषाला पात्र होण्याचा प्रसंग त्यांच्यावर ओढवला. त्याचे असे झाले की, शास्त्रीबुवांचा हा प्रबंध मी वाचला त्यावेळी कालनिर्णयाकडे माझे लक्ष वेधले गेले. हा कालनिर्णय करतांना ऐतिहासिक दृष्ट्या शके ११९० मधे स्वामीकडून नागांबिकेला प्रेमदान (अर्थात् स्वामींचा दीक्षास्वीकार व पूर्वार्ध प्रारंभकाळ) त्यांनी निश्चित केला. त्यावरूनच मला कल्पना सुचली की स्वामीच्या पूर्वार्ध चरित्राचा प्रारंभकाळ जर शके ११९० असेल तर त्यांचा प्रयाणकाळ शके ११९४ असणे शक्य नाही. कारण, त्यांचा पूर्वार्ध व उत्तरार्धकाळ साधारणपणे ८ वर्षांचा समजला जातो. तेव्हा प्रयाणकाळ शके ११९४ ऐवजी शके ११९८ असला पाहिजे. आणि शके ११९८ हा जर त्यांचा प्रयाणकाळ असेल तर शके ११९५ मधे भास्करभट्ट बोरीकराचे शिशुपालवध काव्य लिहिले जाणे अशक्य ! ही शंका मी त्यांना माझ्या पहिल्याच भेटीत बोलून दाखवली. त्यावेळी शास्त्रीबुवांनी मौन धारण केले. कालांतराने ही शंका मी प्रथम 'महाराष्ट्र'तील माझ्या एका लेखात व नंतर 'भास्करभट्ट बोरीकर' या माझ्या पुस्तकात मांडली. त्यातून निर्माण झालेल्या वादळामुळे शास्त्रीबुवा आणि मी एकत्रित आलो. आमचे स्नेहसंबंध दृढावले व उत्तरोत्तर ते घनिष्ठ होत गेले.

'ऐतिहासिक दृष्टी'ने उठवलेले वादळ !

या निमित्ताने त्यांच्या सत्यप्रियतेचा, ऐतिहासिक दृष्टीचा व धैर्याचा मला जो अनुभव आला तो मी कधीहि विसरणार नाही. श्रीचक्रधरस्वामींचा प्रयाणकाळ शके ११९४ नसून ११९८ असावा, तसे असेल तर शिशुपालवध ११९५ मधे लिहिले जाणे अशक्य, अर्थात

शिशुपालवध काव्याच्या शेवटची शकनिर्दशक ओवी प्रक्षिप्त म्हणजे बनावट असली पाहिजे, इत्यादि प्रमेये २८ जुलै १९३५ च्या महाराष्ट्रातून मी मांडताच आपली 'नजरचूक' कबूल करून चक्रधरांचा प्रयाणकाल ११९७–११९८ म्हणून शास्त्रीबुवांनी प्रगट रीतीने ता. १८ ऑगस्ट १९३५ च्या महाराष्ट्रात लेख लिहून मान्य केला. इतकेच नाही तर 'शिशुपालवध शके ११९५ मध्ये लिहिलेले नसून ते नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर केव्हा तरी म्हणजे शके १२२८ नंतर लिहिले गेले असावे' या माझ्या मताच्या पुढे एक पाऊल टाकून 'ऐतिहासिक दृष्टचा 'शिशुपालवध' हे काव्य शके १२३१ च्या नंतरच केव्हा तरी लिहिले गेले असावे असे मानणे भाग पडते' असे आपले मत त्यांनी स्पष्टपणे मांडले. असे लिहिण्यात शास्त्रीबुवांची 'ऐतिहासिक दृष्टि सांप्रदायिक मताने कलुषित झालेली' नव्हती याचे चांगले प्रत्यंतर येते. यामुळेच शास्त्रीबुवांनी आपले गुरुतुल्य गुरुबंधु श्री दत्तलक्षराज व पंथातील श्रीयक्षदेवादि ज्येष्ठ व श्रेष्ठ महंत यांचा रोष आपणावर ओढवून घेतला. श्रीदत्तलक्षराजांनी तर त्यांना त्यांच्या या सांप्रदाय–विरोधामुळे माहूर संस्थानची गादी न देण्याचा निश्चय केला असे म्हणतात. अनेक वर्षेपर्यंत या दोघा गुरुबंधूमध्ये अबोला राहिला. या काळात शास्त्रीबुवांना अतिशय त्रास सहन करावा लागला. पण त्यांनी आपली संशोधकाची सत्यान्वेषणाची भूमिका मात्र सोडली नाही आणि गुरुजींविषयी अनुदार शब्दहि कधी कुणाजवळ काढला नाही. त्यांच्या स्वभावतःच सत्यप्रिय, शांत आणि सात्त्विक वृत्तीच्या परीक्षेचा तो काल होता, म्हणा ना. या परीक्षेत ते पूर्णपणे कसाला उतरले. आणि म्हणूनच आपल्या मृत्युसमयी का होईना पण श्रीदत्तलक्षराजांनी त्यांना माहूरच्या गादीवर बसवून त्यांच्या विद्वत्तेचा, शालीनतेचा आणि परमार्गसेवेचा यथोचित गौरव केला.

'महानुभावपंथावरील आक्षेप व त्यांचे निरसन'

शिशुपालवधाच्या कालाविषयीच्या या वादाला तोंड लागण्यापूर्वी शास्त्रीबुवांनी आपल्या संशोधनकार्यात पुष्कळच प्रगति केली होती. 'श्रीचक्रधरचरित्र भूमिकापर ऐतिहासिक दृष्टि' टाकल्यानंतर ते महानुभावपंथावरील आक्षेपकाकडे वळले. राजवाडे–चांदोरकर–जोग आदि मंडळी महानुभावपंथावरील जुन्या आक्षेपकात मोडतात. त्याच परंपरेतून तयार झालेले नवीन आक्षेपक म्हणजे प्रा. पेंडसे, प्रा. दांडेकर व श्री. का. आ. पाध्ये होत. यांनी आपापल्या पुस्तकातून उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी श्री. बाळकृष्ण शास्त्रींनी नागपूर येथील 'विहंगम' मासिकातून इ. स. १९३४ साली 'महानुभावपंथावरील आक्षेप व त्यांचे निरसन' या मथळ्याखाली एक विस्तृत लेखमाला लिहिली. 'चक्रधराने नवीन पंथ कां स्थापिला' 'महानुभावपंथ हा अवैदिक, पाखंडी, चातुर्वर्ण्यविरोधक, यादवराज्यविघातक आहे' 'या पंथात मूर्तिपूजा आरंभापासून संमत नव्हती, ती मागाहून प्रचलित झाली' 'महानुभावपंथाचा स्त्रीसंन्यास' इत्यादि आक्षेपांचे शास्त्रीबुवांनी या लेखमालेत साधार खंडन केलेले आहे. त्यात त्यांचा मराठी व संस्कृत व्यासंगाचा उत्तम प्रत्यय येतो. ही लेखमाला देखील शास्त्रीबुवांनी एका स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपाने लागलीच प्रसिद्ध केली.

बाळकृष्ण आणि प्रौढ-कृष्ण

याच सुमारास आणखी एका नवीन वादाला सुरवात झाली होती. इ. स. १९३१ मध्ये श्री. नेने–भवाळकर यांनी 'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रें' या नावाचा ग्रंथ संपादून प्रसिद्ध केला. त्याचे परीक्षण करतांना (वागीश्वरी, वर्ष ३ रे, मार्गशीर्ष व पौष–जोड अंक) विद्याभूषण कै. कृष्णशास्त्री घुले यांनी 'चक्रधर खरोखरच ज्ञानेश्वरपूर्वकालीन होते काय' व 'चक्रधरसिद्धांतसूत्रे ही खरोखरच चक्रधराच्या पूर्वीची आहेत काय' असे दोन महत्वाचे प्रश्न उपस्थित केले होते व त्यासंबंधी आपला निर्णय विरुद्ध बाजूने दिला होता. महानुभाव पंथाच्या व वाङ्मयाच्या प्राचीनत्वावर हा फार मोठा आघात होता. त्याचे खंडन करण्यासाठी श्री. बाळकृष्ण शास्त्री यांनी आपली लेखणी उचलली. वागीश्वरी १९५३ च्या सप्टेंबर–नोव्हेंबरच्या अंकातून त्यांनी एक विस्तृत लेख लिहून श्री घुले शास्त्री यांना अत्यंत समर्पक उत्तर दिले खरे; पण 'गोपाळपंडित आणि केशवव्यास या दोन भावांनी ज्या अर्थी अगदी निरनिराळे पाठ तयार केले त्या अर्थी त्यातील मते ताताा

तोंडची असणे शक्य नाही ' या श्री घुले शास्त्री यांच्या युक्तिवादाला उत्तर देतांना गोपाळपंडितांचा पारिमांडल्य पाठ त्यांनी प्रक्षिप्त ठरविला. त्यामुळे पंथातील पारिमांडल्य महंतांची मने दुखली. या प्रश्नाचा निर्णय करण्याकरिता श्री. बाळकृष्ण शास्त्री यांनी पंथातील सर्व महंतांना पत्रे लिहून त्यांची मते मागविण्यात जी संशोधनप्रियता व सत्यप्रियता दाखवली ती खरोखरच प्रशंसनीय आहे ! या प्रश्नाचा समारोप करतांना पारिमांडल्य (तळेगावकर) मंडळीची क्षमा मागण्यात त्यांच्या अंतःकरणाचा उदारपणा दिसून येतो. 'श्रीचक्रधरस्वामीस साक्षी ठेवून सांगतो की माझ्या मनात पक्षपात मुळीच नाही. माझी मनोभूमिका अजून कोरीच आहे. त्यात कोणीहि सत्याचे बीजारोपण केले तर ते उगवण्यासारखे आहे. पण ते सत्य सप्रमाण असले पाहिजे ! ' हे त्यावेळी त्यांनी काढलेले उद्‌गार त्यांचा ऋजुतेचे, शालीनतेचे पण सत्यप्रियतेचे द्योतक नाहीत काय ?

सारांश, अशा रीतीने महानुभाव पंथाविषयीचे आक्षेप व गैरसमज दूर करण्याच्या कामी श्री. बाळकृष्ण शास्त्री यांनी आपली लेखणी सतत झिजवली. ' महानुभाव पंथ आणि कै. राजवाडे व चांदोरकर ' हा त्यांनी धुळे येथील राजवाडे मंदिरात वाचलेला निबंधहि या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतून (वर्ष ९ अंक ३) श्री. वा. ना. देशपांडे यांनी 'वृद्धाचार' प्रसिद्ध करताच त्यातील वाचनदोष दाखवून ते शुद्ध करण्यात शास्त्रीबुवांचा साक्षेप चांगला दिसून येतो. 'पंढरपूरचा विठोबा आणि महानुभाव पंथ' हा छोटया पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध झालेला त्यांचा लेख पंथीय व पंथीयेतरांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल. 'एकमुखी दत्तात्रेय' 'एकभक्ति' इत्यादि छोटीमोठी पुस्तकेहि अत्यंत वाचनीय झालेली आहेत.

महानुभाव पंथाविषयीचे गैरसमज नाहीसे व्हावे या हेतूने त्यांनी संग्रहित केलेले 'महानुभाव पंथ व त्याचे वाङ्मय यासंबंधी कांही पंथीयेतर विद्वानांचे अभिप्राय' हे पुस्तक त्यांच्या पंथसेवेची तळमळ व्यक्त करते. यात त्याकाळपर्यंत प्रसिद्ध झालेल्या महानुभाव पंथावरील लेखांचे जे विस्तृत टिपण शास्त्रीबुवांनी दिले आहे त्यावरून त्यांचा साक्षेप दिसून येतो.

महानुभाव पंथ

शास्त्रीबुवांच्या या सर्व प्रयत्नांचा मेरुमणि म्हणून त्यांच्या 'महानुभाव पंथ' या ग्रंथाकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल. इ. स. १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथात पंडित बाळकृष्ण शास्त्र्यांच्या सर्व संशोधनाचे सार उतरले आहे. महानुभाव पंथाची भूमिका स्पष्ट करण्याच्या हेतूने त्यांनी 'प्रस्तुत पुस्तक पंथीयांसाठी' लिहिलेले 'असले तरी पंथीयेतर जिज्ञासु वाचकासहि त्यात ग्राह्य असा भाग पुष्कळच आढळेल. ...पंथाविषयी वेळोवेळी झालेल्या वादांचे पडसाद या पुस्तकात उमटलेले आहेत. तेवढयासाठी तरी पंथीयेतर विद्वानास हे पुस्तक अवलोकनीय वाटेल. पंथाविषयी जे निष्कारण गैरसमज पसरलेले आहेत ते नाहीसे होण्यास' या पुस्तकाने फार चांगली मदत होते यात शंका नाही. शास्त्रीजींचे दीर्घ परिश्रम, सूक्ष्म वाचन व मनन, महानुभाव पंथाविषयीचा त्यांचा उत्कट अभिमान, त्यांचे वाक्कौशल्य इत्यादि गुणांचा मोठा सुंदर संगम या ग्रंथात झालेला आढळतो. या पुस्तकाच्या प्रकाशनामुळेच पूर्वी ओढवलेला गुरुजींचा रोष नाहीसा झाला असे शास्त्रीबुवा अनेकदा माझ्याजवळ बोलले होते.

महानुभाव संशोधकांचे साहाय्यक

पंडित श्रीबाळकृष्ण शास्त्री यांनी केलेले हे लेखनकार्य महत्त्वाचे आहे यांत शंकाच नाही; पण याहिपेक्षा त्यांनी पंथीयेतर संशोधकांना केलेले मदतीचे कार्य अधिक महत्वाचे आहे, असे मला वाटते. श्री. वा. ना. देशपांडे, श्री. हरिभाऊ नेने इत्यादि महानुभाव वाङ्मय संशोधकांना त्यांनी अनेक रीतींनी साह्य केलेले आहे. पोथ्या मिळवून आणणे, त्यांचे वाचन करण्याच्या कामी मदत देणे, त्यासंबंधी साधकबाधक प्रमाणासहित चर्चा करणे, सर्व प्रकारची सांप्रदायिक माहिती गोळा करून पुरवणे, अशी अनेक कार्ये त्यांनी अविश्रांत श्रम घेऊन केलेली आहेत. या सर्व प्रकारांनी मदत करून मला स्वतःला तर त्यांनी कायमचे ऋणी

करून ठेवलेले आहे. 'महानुभाव तत्त्वज्ञाना'चा अभ्यास आरंभी मी महंत श्री मुरलीधर शास्त्री यांच्या जवळ केला. नंतर श्री बाळकृष्ण शास्त्री यांच्यावरोवर केला. पोथ्यांचे उतारे करणे, ते नीट तपासून घेणे, मी लिहून काढलेला गोषवारा शुद्ध करूण देणे इत्यादि अनेक कामे त्यांनी माझ्यासाठी निरलसपणे व निःस्वार्थतेने केली. त्यासाठी ते उमरावती येथे माझ्या घरी जवळजवळ दीडदोन वर्षे येऊन राहिले. 'महानुभाव तत्त्वज्ञान' व 'महानुभावांचा आचारधर्म, हे दोन्ही ग्रंथ माझ्याकडून लिहून घेण्याला पंडित वाळकृष्णशास्त्री यांचीच प्रेरणा कारणीभूत झालेली आहे. मला ही मदत करीत असल्यामुळेच शास्त्रीवुवांना इतर अनेक रीतींनी त्रास व अपमान सहन करावा लागला. उमरावतीला असतांना ते वारंवार तेथील महानुभावांच्या मार्गात जात असत. तेथे पोथी चालू असतांना शास्त्रीवुवा जाऊन पोचले म्हणजे श्री. कारंजकर महंत पोथी तावडतोव संपवून मोकळे होत असत. कारण शास्त्रीवुवांच्या कानावर त्यांचे प्रवचन पडले तर ते कोलत्यांना म्हणजे अन्य-मार्गियांना सांगतील ही भीति ना! एका दृष्टीने शास्त्रीवुवा तेथे अस्पृश्यासारखे वागवले जात होते. पण हे सर्व सहन करूनहि त्यांनी मला मदत करण्याचे काम चालूच ठेवले. त्यावेळी शास्त्रीवुवांच्या सान्निध्यात त्यांच्या सात्त्विक व्यक्तित्वाचा मला वारंवार जो अनुभव आला त्याचा विसर पडणे शक्य नाही. शास्त्रीवुवा आमच्या घरातीलच एक व्यक्ति होऊन गेले होते. आमच्यातील परकेपणाचा भाव पूर्णपणे लोपला होता. माझे ते शिक्षक होते, स्नेही होते, वंधु होते; आणि म्हणूनच गेल्या १५ तारखेला त्यांच्या आकस्मिक मृत्यूची वातमी कानावर पडताच मला फार मोठा धक्का वसला. त्यांच्या मृत्युमुळे सर्व महानुभाव पंथीयांच्या अंतःकरणाला पीळ पडला असेल यात शंका नाही. माहूरच्या गादीवर वसल्यापासून त्यांनी त्या देवस्थानाची जी सुधारणा केली ती अभूतपूर्व होय. रेलवेपासून दूर असलेल्या त्या डोंगरावरील संस्थानात त्यांनी विजेच्या दिव्यांची व्यवस्था केली; प्रवेश करताच कुणालाहि प्रसन्न वाटेल अशी स्वच्छता निर्माण केली; आल्यागेल्या अतिथींचा सत्कार करून सर्व पंथीयांची अंतःकरणे त्यांनी जिंकून घेतली. यामुळे त्यांच्या विषयी सर्वांच्याच अंतःकरणात आदरभाव निर्माण झालेला होता. अलीकडे अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे कार्य त्यांनी आपल्या अंगावर घेतले होते. अखील भारतीय महानुभाव परिषद नागपुरला भरावयाची आहे. तिच्या मागे शास्त्रीजींचा फार मोठा हात होता. पण आता त्यांच्या मृत्यूमुळे परिषदेच्या कार्यकर्त्यांची स्थिति चिंताजनक झाली आहे. पण याहिपेक्षा मोठा धक्का प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संशोधनाला वसला आहे. पंथीयेतर जिज्ञासूंना साह्य करणारा त्यांच्यासारखा कळकळीचा कार्यकर्ता नाहीसा झाल्यामुळे या कार्यात पोकळी निर्माण झाल्यासारखी वाटते. महाराष्ट्र साहित्य परिषदेने योजिलेल्या वाङ्मयेतिहासातील 'महानुभाव खंडा'चे सहसंपादक म्हणून त्यांनी काम करण्याचे कवूल केले होते. पण ते निघून गेल्यामुळे पोथ्या वगैरे मिळविण्याच्या कामी आम्हाला मदत कशी होणार याची चिंता वाटते... पण...

पण, मनुष्याने इतके निराशावादी होऊन कसे चालेल! आपल्या अपूर्ण राहिलेल्या कार्याच्या भोवती पंडित वाळकृष्णशास्त्री यांचा आत्मा एकसारखा भिरभिरत असेल याविषयी मला शंका वाटत नाही. त्यांची प्रेरणा व आशीर्वाद नवीन कार्यकर्यांच्या पाठीशी सदैव उभ्या राहतील व आपले अपूर्ण कार्य त्यांच्याकडून निश्चित पूर्ण करून घेतील. शास्त्रीवुवांचे पार्थिव शरीर नाहीसे झाले असले तरी आपल्या कार्याच्या रूपाने ते विद्यमानच आहेत असे मी मानतो. त्यांची स्मृति आम्हाला निरंतर कार्यप्रवण करो अशी इच्छा प्रगट करून माझी ही श्रद्धांजलि मी त्यांच्या स्मृतीस अर्पण करतो.

नागपुरी भाषेचा नमुना

भागाबुढीच्या मताने

वामन चोरघडे

" सारा बजार खरीदून आनला का वं ? कईची बसली मी तुही वाट पाहात. "

" हो बजार खरीदतों ! तुहा सासरा देते कनाई पैसे मले ! "

" माहा सासरा काहून देईन ? दाल्ला कमावते दोई दोई हातानं तुहा. तुले काय कमी आहे वं ! "

" म्हूनच त' बसली होती भदाडवाल्यासीन् घंटाभर घासाघिसी करत ! रांडीच्यानं सात आने घेतले एका हांडक्याचे. "

" बेस मिरालं पन तुले हांडकं. मांगच्या सोम्मारी म्या अकरा आने मोजले माय ! "

" आतावी थो भायकत होता म्हनते कां ! आवं नांव सोड. बारा गंडे टाक म्हने. "

" तुह्या तोंडाकडं पाहून देल्लं का मंग हांडकं सात आन्यांत ? "

" त्या काहून नाही दाखवलं आपलं तोंड ? मुस्तांत देल्लं असतं त्यानं. "

" मने, अवलखने, दांत पाडीन अवघे, याद ठेव, तू म्हनशीन की— "

" अन् तुहे राह्यतीन मंग दांत ? तूं कसी म्हनते वं मंग ? पांच आन्याचा जीव दुखला तुहा अन् माहा तोंड काहाडतीस ! "

" खरंच वं ! अर्ध्या रोजाची मजुरी अकारज गेली माही ! आपल्या अडयान्याईस कोनीवी फसवते वाई ! "

" अदिक कोनं फसवलं गे ? "

" मने आज त' शनीमा देलवाल्यानी बकतेस वं तूं ! कोन भेटलं बजारांत ? "

" भागाबुढी ! ये बी म्हने माय् की तुहे दांतच पाडतो. "

" काहून ? तिचे दांत गेले म्हणून कां ? "

" म्हने मलेबी आनून दे भदाड ! मी काहून आनू ? तिचा बुढा होता तिच्या सवं; त्याले का धाड झाली जावाले अन् आनाले ? "

" भागाबुढी आपल्या बुढ्याले संदुकांतल्या बासनावानी ठेवते, नाही वं ? संच्या पाह्यरी त्याले झटक झुटक पन् करत असन. "

" तूं च पाह्य माय, ये त्याले झटकते की थो तिले झटकते त ! तुले आहे आदत इरकाम्या कथा करायची. "

" अन् तूं संतीन लागून गेली कनाई ? मांगच्या बजाराचं काहाडू कां तुह ? "

" काय काहाडशीन वं ? काहाड, पाहूं दे मले ! "

" त्या अगदुर चंची दे तुही, खांडसुपारी खातों न् मंग सांगतों, कसी रेकता करत होती त्या बामनी-नीची त' त्या रोजी. "

" का मनलं वं म्या ? थे भटकत होती तं म्या मनलं भटकते ! आखीन का केलं ? झोटे धरले का तिचे ? "

" पन् मी म्हनतो गरज काय तुही ? थे भटकन, नाचन नाहीत' अदिक काही करन्. दाल्ला कमावते तिचा— "

"हूँः अन् एका गध्याचं वझं बी वागवते. तिच्या संग गाठोडं तिच्या बाइनाईचं आन् हा बायल्या चालला तिच्या मांग मांग! जसी काही लग्नाची नव्हंच!"

"भारी किमती बासनं खरीदले अन् बाई-मानसाच्यानं पडले, कोनं हिसकले..."

"आन् भाजीची थैली व! ये नसन् दिसली तुले! डोरे फुटले होते कनाई? आन माही चंची. मोठी आली बामनीन तं' जा तिच्या घरीं! म्हने हिसकन् कोनी. आन् का व पुने, कोसभर बाजार तूं नेतं त' तुले कोन झोंबते व? का माय बोलते...!"

"आपल्या अडयान्याइले कोन हात लावते व?"

"हो, त्याहीले लावते त' मग पायांत वहान नाही का त्याहीच्या?"

"हूँ, दहा रुपाचं पायतन ह्या कामासाठीच त' घेतेत् ये लोक? अन् हिसका हिसकी करनं त्याहीच्या जातीले सोबतेबी? सिकली सिवरली त' का हेच करन् कां?"

"काही बी करो, मले का करा लागते म्हना! पन् तूं देऊन पाह्यनं एक रोज टोपलं आपल्या दाल्याच्या डोक्शावर; जिती गाडन का नाही ये मी बी पाहीन."

"थो काहून उचलन्? मले का धाड झाली, का हात मोडले माहे?"

"येच त' मनलं मीनं! मंग काहून ह्या सिकलीच्या नांवानं खिजली? बह्याडच आहे."

"हं, उगी राह्य, बहु बोलनं बरं नाही. चालत नाही कां आता? झालझूल बी त' बातच होते मंग. ये भागाबुढी बी आली; चाल उचल बाजार आपला."

"बापा, बापा! आता निंगते माहे पितर भागाबुढीच्यानं."

"आता नाही बोलनार ये. पाहून घेजो तूं. कोलू बुढा आहे न संग तिच्या."

"येऊन पाह्य कसी राह्यली बागत बागत. इकतं वझं आहे, पन् बुढा इरकामा चालन् डागा टाकत गांवापावतर. पाह्यजो तूं."

"झालं नाही का व पोटयाव्हा तुमचं? चलाचं नाही का गावाकडं? का झाडाखालतंच गोटे मांडान् इथं? चला उठा, बिगी बिगी; मंग झालपडल्या माह्या नजरेनं वाट नाही बरखत बाई."

"हे मनी उठतच नाही. कईची म्हनून राह्यली पण म्हनते माही भागाबुढी येईन तवा मी उठन्. आता तरी बांधनं माय चंची."

"हो, तू उपरी माही चंची खाली करसीन् आन् माही भागाबुढी जराशं पान बी घेनार नाही; नाही व? बस गे भागाबाई, पान खा; कोलूकाका आहे संगं! वाट नाही दिसन् त' धरजो ह्याचा हात."

"दो लेकराची माय झाली हे मनी, पन् इब्लिसपना गेला नाही तिचा. सांगतो तुह्या मानसाले थांब!"

"काका, माह्या दोईबी लेकराईले भागाबाईचाच हात लागला. तिनंच सिकवलं मले असं बोलूं म्हून."

"हो, ह्याच सिकवलं व! करा त' करा आन् भरूनशानी बी द्या. अन् का व, तू बली बारातीन पंधरा रोजाची आन् कोसभर वझं घेऊन जासीन? तुहा दाल्ला कोनाचं वझं उचलाले गेला गे? आन ये टोपलं माह्याकडं, देतो फेकून नाल्यामंधी."

"माहा काका इरकामा चालन् आन् माहा टोपलं काहून बा नाल्यांत जाईन? मी त्याले काका काहून म्हनीन मंग?

"तुहा काका उचलन् मी मेल्यावर. मी ठेंगनी आहे कां?"

"पन् एखांद्या डाव घेतलं त' कां झालं व! मी येईन काकासंगं. तुमी व्हा पुढं."

"मानसाची जात वझं वाहीन् आन् बाईल इरकामी भटकन्! कोनत्या मुलखातला न्याव्..."

"मी दाखवतों भागाबाई, मुलुख तुले. ये पाहय ह्या रस्त्यानं..."

"ये राह्यतेत सयगसवानांत आन् आपुन राह्यतो बावरासिवारांत! पिसी आहे मने तूं. डाब्यानं वझं घ्याव् अन् उजवा इरकामा ठेवाव. येळवखत सांगून येते का व?"

"पन् काकानं त'

"आइकनं व' सांग व' भागाबाई!"

(पुढील मजकूर पान २४ वर)

साहित्य-समीक्षेचें लक्ष्य—
आनंद कां अर्थ ?

दि. के. बेडेकर

साहित्य-समीक्षेचें साध्य किंवा ध्येय काय ? हा टीकाशास्त्रांतील मूळ प्रश्न आहे. आतापर्यंतच्या मराठी टीकावाङ्मयांत ह्याच प्रश्नाचीं वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून वेगवेगळीं उत्तरें दिलीं गेलीं आहेत. प्राचीन रसव्यवस्थेंतहि ह्याच मूलभूत प्रश्नाचें उत्तर भरतमुनींनी दिलें आहे. म्हणून ह्या प्रश्नावरच लक्ष ठेऊन आज मी आपल्यापुढे कांही विवेचन मांडीत आहे.

टीकाशास्त्र हें स्वतंत्र शास्त्र नाही तर कलास्वरूपशास्त्राचें तें एक अंग आहे ही गोष्ट सर्वमान्य आहेच, पण ती प्रथम मुद्दाम सांगणें मला जरूर वाटतें. साहित्य व समीक्षा यांचा संबंध भाषा आणि व्याकरण यांच्यांतील संबंधासारखा आहे. म्हणजेच साहित्याचें स्वरूप निश्चित केल्यावरच समीक्षेचें ध्येय ठरवितां येतें. साहित्याचें स्वरूप जीवनाची अनुकृति एवढेंच आहे असें जर मानलें तर मग समीक्षेचें प्रयोजन एवढेंच उरतें की हें अनुकरण कलावंताला कितपत साधलें आहे तें पाहणें. उलट, साहित्याला केवळ व्यक्तिसापेक्ष, सर्वस्वतंत्र व स्वयंभू असा आविष्कार किंवा कलावंताच्या प्रतिभेचा स्वैरविलास मानलें तर समीक्षेचा अर्थ केवळ त्या विलासांतील 'सौंदर्य' किंवा 'आनंद' ग्रहण करणें एवढाच ठरतो. आतापर्यंतच्या मराठी टीकावाङ्मयांत वर सूचित केलेले दोन दृष्टिकोण, म्हणजे जीवनानुकृतीचा व आनंदमीमांसेचा दृष्टिकोण, हेच प्रभावी ठरलेले दिसतात. या दोन्ही दृष्टिकोणांतून साहित्याची ओळख मुळीच पटत नाही असें नाही पण ती पुरतेपणीं व सर्व बाजूंनी पटत नाही. शास्त्र म्हटलें की अंशतः ओळख पटून चालत नाही, इतकेंच नव्हे तर अंशतः खरें वाटणारें अर्धसत्य हें शास्त्रसिद्धीला अडथळ्यासारखेंहि ठरूं शकतें. मराठी टीकावाङ्मयांत कांही अंशीं हाच प्रकार झाला आहे असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. म्हणून साहित्याच्या स्वरूपासंबंधी प्रथमच आपली भूमिका स्पष्ट करून घेणें जरूर आहे.

साहित्य हें सर्जन आहे

मराठी टीकावाङ्मयामध्ये आनंदमीमांसेला फार महत्त्व लाभलें व उलट प्रतिक्रिया म्हणून मग 'जीवन', 'बोध', 'वास्तवता' ह्या गोष्टींवर भर देण्यांत आला. पण रसास्वाद, ताटस्थ, सविकल्प समाधि आणि आनंदबोध यांच्या चिकित्सेंत किंवा समाजजीवन, प्रगतिवाद यांच्या प्रतिपादनांत मूळ साहित्याच्या **धर्मा**कडे जवळ जवळ दुर्लक्ष झालें, असें मला वाटतें. हा धर्म कोणचा ? तर **सर्जनाचा** किंवा नवनिर्मितीचा ?

साहित्य ही एक नवनिर्मिति आहे, जीवनाची नुसती प्रतिबिंबात्मक अनुकृति नाही किंवा नुसताच स्वैरविलास नाही ही गोष्ट थोडी जास्त विशद करण्याचा मी आता प्रयत्न करतों. आपण कोणचेंहि जुनें नवें काव्य घेतलें तर त्यांत प्रणय, वात्सल्य, भय, क्रोध, आशा, निराशा, इत्यादि नित्याच्या भावनांचा प्रत्यय आपल्याला लाभतो. यावरून कोणी असा

निष्कर्ष काढतात की अशा शाश्वत व मूलभूत भावनांचा प्रत्यय आणून देणें हेंच साहित्याचें सामर्थ्य व फल आहे. परंतु भावनांचा अनुभव रोजच्या जगण्यांत येतच असतांना त्याच्या प्रत्ययासाठी एवढा साहित्यनिर्मितीचा खटाटोप कशाला ? हा प्रश्न आपण नुसता डोळ्यांसमोर आणला तरी लगेच आपल्याला कळून येईल की भावनांचा परोक्ष प्रत्यय साहित्यांत येतो हें जरी खरें आहे, तरी साधा अपरोक्ष भावनाप्रत्यय रसिकाला आणून देणें हें कांही साहित्याचें किंवा कलेचें, साध्य ठरत नाही. उपमा द्यावयाची तर असें म्हणतां येईल की तांबडा, पिवळा, निळा इत्यादि रंग सृष्टींत प्रत्यक्ष दिसतात तशा प्रत्यक्ष स्वरूपांत ह्या रंगांचा प्रत्यय देण्यासाठी चित्रकार आपलें चित्र रंगवितो हें म्हणणें चूक होईल. चित्रामध्ये रंग असतात पण जास्त कांहीतरी असतें व जें जास्त असतें तेंच चित्रकाराचें सर्जन असतें. साहित्यांतहि भावना, विचार, जीवनांतील प्रश्न इत्यादि सर्व कांही असतें; किंबहुना रेषा व रंग याविना चित्र नाही, त्याप्रमाणे भावना, विचार याविना काव्य किंवा नाट्य असूंच शकत नाही. पण, इंद्रियें, हृदय व बुद्धि यांच्या अनुभवांना घेऊन साहित्यिक त्यांत जास्त कांही तरी घालतों, अपूर्व असें कलेचें प्राणतत्त्व त्या मूर्तींत तो ओतप्रोत भरूं शकतो. हाच सर्जनाचा अर्थ आहे.

अर्थप्रेरणा हा निर्मितीचा पाया

साहित्य हें सर्जन आहे असें मानलें की आणखी एका प्रश्नाचें उत्तर द्यावें लागते. ही निर्मिति कां होते ? हा तो प्रश्न आहे. या प्रश्नाचें एक उत्तर असें देतां येईल, आणि अनेकदा दिलेंहि जातें, की कलात्मक सर्जन हें एक गूढ आहे. कां व कसें हे प्रश्नच कलानिर्मितीबद्दल विचारणें चूक आहे ! माझ्या मतें, गूढत्वाची ही भाषा कोणच्याच मानवी प्रयत्नाबद्दल फोल आहे. मनुष्याचें मन असें कुंठित होऊन गूढाच्या गुंगींत फार काळ राहूंहि शकत नाही, हें अर्थात् सुदैव आहे.

साहित्याच्याच नव्हे तर ज्ञानाच्या व श्रमाच्या क्षेत्रांतहि मानवी बुद्धीचा निर्मिति-व्यापार सतत चालू आहे व ही निर्मिति मानवी अर्थ (Value) किंवा हेतु या एकमेव प्रेरणेने व दिशेने चालूं आहे. सागराच्या तळांतील मोतीं, पृथ्वीच्या उदरांतील रत्नें व अणूंच्या गर्भातील अजस्त्र शक्ति ज्ञानानें शोधून काढल्या. यांत निर्मिति आहे व अर्थ आहे. जें सृष्टीचें होतें तें मानवाचें करण्यासाठी श्रम व ज्ञान, (म्हणजेच तत्त्वज्ञान व विज्ञान), यांच्या सहाय्याने ही प्रचंड घडपड मनुष्यप्राण्याने केलेली नाही काय ? अर्थ किंवा हेतु हा प्रत्येक सर्जनांत अध्याहृतच असतो. तोच अर्थ साहित्य-सर्जनांतहि अनुस्यूत आहेच.

मनुष्यप्राणी •सृष्टीचाच अंश आहे. पण सृष्टीचा आश्रय घेतच तो तिला स्वतःच्या हेतूंना अनुकूल असें रूप देण्यासाठी धडपडत आहे. याच धडपडींत ज्ञान व कला ही नवनिर्मिति तो करीत आला आहे. सृष्टीशीं मानवाचा जो योग आहे तो साधर्म्य व भेद अशा द्वंद्वाचा योग आहे या योगांतून सर्जनाची प्रेरणा व अर्थहि मनुष्याला लाभला आहे.

सृष्टींतील घडामोडीची देशकाल आणि कार्यकारणभाव यांच्या **तर्कात्मक** (rational) स्वरूपांत जीं अमूर्त रूपें मानवी बुद्धीने निर्माण केली आहेत त्यांना आपण ज्ञानाचीं प्रमेयें म्हणतों. परंतु या तर्कात्मक अमूर्त प्रमेयपेक्षा वेगळीं अशीं सृष्टींतील वस्तूंचीं **लयात्मक** (rhythmic) मूर्त रूपें जेव्हा निर्माण केलीं जातात तेव्हा त्यांना आपण कलाकृति म्हणतों. ज्ञानाचीं निर्गुण अमूर्त प्रमेयें व कलेचीं सगुण मूर्त रूपें यांचा हा वेगळेपणा सहज जाणवण्यासारखा आहे, पण त्यांच्या या वेगळेपणांतदेखील मानवी अर्थ ही प्रेरणा त्यांना सांधणारी आहे ही गोष्टहि तितकीच सहज उमगणारी आहे.

सर्जनशील समीक्षेचा अर्थ

वरील संदर्भात आता सर्जनशील समीक्षेचा अर्थ लागेल, असें मला वाटतें. सर्जनशील समीक्षेचें साध्य प्रथम आपण पाहूं. हें साध्य मला वाटतें, विशिष्ठ सर्जनाचें, किंवा कलाकृतींचें, बाह्यांग व अंतरंग आकलन करणें हेंच असूं शकतें.

चित्र, शिल्प, इत्यादि कलांच्या बाबतींत बाह्यांग व अंतरंग यांचें ग्रहण करण्यासाठी त्या त्या कलेच्या माध्यमाचा विचार करावा लागतो. तसाच साहित्य या विशिष्ट कलेचा विचार करावा लागेल. साहित्यामध्येहि

सगुण व मूर्त अशीं रूपेंच असतात आणि लयात्मकताहि असावीच लागते. अमूर्त प्रमेयें व तार्किक मांडणी म्हणजे साहित्य नव्हे. तेव्हा साहित्याच्या बाह्यांग–समीक्षेंत रसिकाला कलात्मक साक्षात्काराचा अनुभव देणारीं मूर्त रूपें निर्माण करण्याची शक्ति व त्या रूपांच्या मांडणींतील लय यांची आपण समीक्षा करतों. भाषेच्या सहाय्याने अशी सगुण कलामूर्ति निर्माण करण्याची प्रतिभा कलावंतांच्या अंगीं किती आहे व ती कशी प्रगट झाली आहे याचा उलगडा करणें ही साहित्याची बाह्यांग–समीक्षा झाली. या समीक्षेबरोबरच आपण त्या निर्मितीच्या अर्थाकडे, म्हणजे अंतरंगाकडे, वळतों. या अंतरंग–समीक्षेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी मी प्राचीन रसव्यवस्थेकडे वळतों, कारण रससिद्धांताचा परिणाम आपल्या मराठी टीकाशास्त्रावर दीर्घकाळापर्यंत होत आलेला आहे.

रसतत्त्वाचें खरें स्वरूप

साहित्याच्या अंतरंगाकडे वळण्याच्या प्रयत्नांतच रसतत्त्वाचा लाभ प्राचीन समीक्षाकारांना झाला, असें मला वाटतें. परंतु, दुर्दैवाने मूळ रसतत्त्वाकडे मराठी समीक्षकांचें दुर्लक्ष झालें आहे. रसतत्त्वाकडून साहित्यनिर्मितीच्या अंतरंगाकडे किंवा अर्थाकडे न वळतां आपल्या समीक्षकांचें सर्व लक्ष आस्वाद, आनंद व रससंख्या या गोष्टींकडे वळलें. निर्मितीच्या फलावरच सारा भर दिला गेल्यामुळे प्रेरणेकडे वळण्याची गरज आपल्या समीक्षकांना वाटली नाही यांत मग नवल नाही.

महाकाव्याच्या वाचनाने आनंद होतो व तें आस्वाद्य असतें हा रसिकाचा अनुभव असतोच. मग आनंद होतो तो आस्वादामुळे एवढेंच जर भरतमुनींना सांगावयाचें होतें तर रसतत्त्वाची मांडणी करण्याचा खटाटोप त्यांनी कशाला केला असता? 'रस' हा आस्वाद्य असतो एवढेंच सांगावयाचें असतें तर काव्य हें आस्वाद्य असतें असें सांगूनच काम भागलें असतें व 'रस' तत्त्वाची उत्पन्न करण्याचीच गरज भरतमुनींना वाटली नसती. पण रसभावतत्त्वाची व्यवस्था त्यांनी निर्माण केली खरी! याचाच अर्थ असा की आस्वाद्यमानता हा रसाचा एक गुण त्यांनी सांगितला आहे पण तोच रसधर्म म्हणून सांगितलेला नाही. रसनिष्पत्ति कशी होते याचें भरतमुनींनीं वर्णन केलें आहे व त्यांतच रसतत्त्वाचें मूळ रूप व धर्म सांगितले आहेत. अशा रसाची निष्पत्ति झाल्यावर तो आस्वाद्य असतो ही गोष्ट त्यांनी सांगितली आहे खरी, पण रसतत्त्वाची ती फलश्रुति सांगणें आहे एवढेंच.

आस्वाद्यमानतेलाच रसतत्त्वाचा गाभा न समजतां आपण उलट दिशेने म्हणजे फलाकडून उगमाकडे वळलों तर काय दिसतें? मग रसाच्या अष्टविध विस्ताराच्या मागे एक श्लिष्ट व्यवस्था दिसूं लागते. एखाद्या रांगेंत (क्यूमध्यें) तिष्ठत उभे राहिलेले आठ, नऊ, दहा किंवा असंख्य रस म्हणजे रसव्यवस्था नव्हे. ही मूळ व्यवस्थेची विटंबना होय. मुळांत आठच रसांची कल्पना भरतांनी केली व त्या अष्टविध रूपें घेणाऱ्या रसतत्त्वाची एक स्वयंपूर्ण व्यवस्था त्यांनी मांडली. ती व्यवस्था संक्षेपानें अशी मांडतां येईल.

अद्‌भुत
राम |
वीर
|
हास्य—शृंगार— **रसतत्त्व**—बीभत्स—भयानक
|
रौद्र
| रावण
करुण

(वरील आकृति एका पातळीवर मांडल्याने या रसव्यूहाचें स्वरूप स्पष्ट होत नाही व तिच्यांत मानवी जीवनाच्या गतीविषयी, आशयाविषयी व कर्तृत्वाविषयी जें तत्त्व गोंवलें गेलें आहे त्याचें विवेचनहि अवघड होतें म्हणून ह्याच अष्टविध व्यवस्थेची मांडणी मीं सोबतच्या घनगोलाकृतीच्या सहाय्याने 'नवभारत' मासिकाच्या नोव्हेंबर १९५२ च्या अंकांत केली आहे, ती जिज्ञासूंनी पहावी.)

देवासुर शक्तींचा संघर्ष

या स्पष्टीकरणानंतर एक गोष्ट अगदी स्पष्ट असावी की रसतत्त्व हें नुसतें आस्वाद–तत्त्व नाही. असंख्य भावनांची रांग उभी करून त्यांच्या गर्दीने मूळ-

च्या अष्टभुज रसमूर्तीला आच्छादून टाकण्याची चूक आस्वाद्यमानतेच्या चाकोरींत अडकलेल्या मराठी रस-चर्चेमुळे झाली आहे. पण एकदा ती चाकोरी सोडली की रसतत्त्वाचें मूळ स्वरूप दिसतें व रसतत्त्वाच्या सहाय्याने मानवजीवनांतील मूळ अर्थाकडे वळतां येतें. हें आपण पाहिलें. हा मूळ अर्थ म्हणजे मानवी मनाने कल्पिलेल्या देवदानवांचा संघर्ष. अर्थात् हा संघर्ष मानवी मनांतील व जीवनांतील दोन प्रवृत्तींचाच आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या मनाला कुरुक्षेत्र मानलें तर याच संघर्षाचीं प्राचीन व अर्वाचीन महाभारतें आपल्या डोळ्यांसमोर उभीं राहतील. मग साहित्य-निर्मितीच्या अंतरंग-समीक्षेचा अर्थहि आपल्या मनांत आपोआप येईल. कलाकृतीच्या अंतरंगांत वरील संघर्षाचें चित्र किती स्पष्ट आहे, त्या संघर्षांत देवांचें व दानवांचें रूप किती स्पष्ट रेखाटलेलें आहे व जयापजयाचें पारडें कसें हेलकावलें आहे, हेंच अंतरंग–समीक्षण होय असें मला वाटतें. या कुरुक्षेत्रावर कलावंताची भूमिका कोणाचें सारथ्य करण्याची आहे हें या समीक्षेच्या वेळीं समीक्षकाला पाहावेंच लागतें, किंबहुना हें पाहूनच कलाकृतीचा व कलावंताच्या प्रतिभेचा अर्थ शेवटीं उमगतो. व्यास, वाल्मिकीपासून ज्ञानेश्वर, हरिभाऊ किंवा रोलाँ व गॉर्की यांच्या महात्म्याचा अर्थ या समीक्षेमुळेच आपल्याला उमगूं शकतो.

व्यक्तिसापेक्षता रसतत्त्वांत नाही

रसतत्त्व हें साहित्याच्या स्वरूपाचा शोध घेणारे व अर्थाकडे निर्देश करणारें प्राचीन तत्त्व आहे व म्हणून समीक्षेच्या बाबतींतहि तें तत्त्व अर्थगामी आहे. पण तत्त्वाचा वापर करावयाचा तर त्या रसतत्त्वाच्या मूळ व्यवस्थेकडे लक्ष दिलें पाहिजे. प्राचीन महाकाव्यांतून देवासुर–संग्रामाविषयी जी रचना आढळते व रामरावण, सीता द्रौपदी, इत्यादिकांचीं जीं व्यक्तिदर्शनें आढळतात त्यांचा अर्थ अष्टविध रसांच्या निष्पत्तीच्या अशा अर्थलक्षी मीमांसेच्या सहाय्याने करतां येईल व त्या कलाकृतींच्या बाह्यांगाचें व अंतरंगाचें नीट ग्रहण करतां येईल.

परंतु, ती व्यवस्था आणि त्याच्या बुडाशीं असलेलें रसतत्त्व आज अपुरें ठरेल ही गोष्ट मात्र विसरतां येत नाही. आजच्या साहित्यामध्ये व्यक्ति व तिच्या अंतर्बाह्य जगांतील संग्राम यावर भर दिला जातो व व्यक्ति-सापेक्ष व वर्गसापेक्ष असा जीवनाचा अर्थ आज कलेंत शोधला जातो. हा फरक झाल्यामुळे मानवी जीवनाच्या पूर्वकालीन कलाकृतींतील रामरावणापेक्षा वेगळ्या, म्हणजे तत्कालीन, प्रवृत्तींनाच साकार करणाऱ्या पात्रांपेक्षा वेगळ्या, पात्रांचीं नवीं रूपें आजच्या साहित्यांत दिसत आहेत. या पात्रांची घडण व त्यांच्या हातून घडणारी कृति यांचें साहित्यांतील दर्शनहि आज वेगळें आहे. या व्यक्तिवर्गप्रधान साहित्याच्या निर्मितीचा अर्थ लावण्यासाठी अष्टरसात्मक समीक्षा अपुरी पडणें साहजिक आहे. मानवी ध्येयवादाचा व आसुरी प्रवृत्तींचा संघर्ष आजहि आहे पण तो वेगळ्या रणभूमीवर, व्यक्तिमनाच्या व वर्गजीवनाच्या कुरुक्षेत्रावर, चालू आहे. त्या संघर्षाचा कलात्मक आविष्कार जसा बदलला आहे तसें कलास्वरूपशास्त्रांत व समीक्षेच्या शास्त्रांतहि बदल होणें अटळ आहे.

आणखी कित्येत बाबतींत आज रसतत्त्वाचा अपुरेपण. जाणवेल, परंतु या चर्चेत शिरणें प्रस्तुत प्रसंगीं शक्य नाही. नव्या समीक्षेसाठी नव्या तत्त्वाची गरज आहे हें क्रमप्राप्तच नाही काय ? परंतु, ज्या अर्थाने रसतत्त्व हें समकालीन साहित्याच्या अर्थाचा शोध घेणारे तत्त्व होतें त्या अर्थानेच आजचें समीक्षेचें तत्त्वदेखील आधुनिक साहित्याच्या बाह्यांगाचा व अंतरंगाचा शोध घेणारें असलें पाहिजे.

मराठी साहित्यसमीक्षाशास्त्रांत या दृष्टीने विचार झाला पाहिजे. असा प्रयत्न करावयाचा तर 'सौंदर्य' या शब्दाभोवती घोटाळत राहण्याचें थांबविलें पाहिजे. रसाच्या आस्वादावर व 'आनंद'रूपीं फलप्राप्तीच्या टोकावरच सारा भर देऊन मम्मट, अभिनवगुप्त प्रभृति दार्शनिकांनी आपापल्या दर्शनाच्या पुष्टीसाठी आपापली विशिष्ट आनंदमीमांसा सांगितली आहे. त्या सर्व मीमांसेची महती साहित्यशास्त्राच्या अभ्यासकांनी व तत्त्वज्ञानाच्या संशोधकांनीहि ओळखली आहे, परंतु 'सौंदर्य' या शब्दाप्रमाणेच 'आनंद' या शब्दाची मर्यादाहि आज लक्षांत घेणें जरूर आहे.

मला वाटतें की साहित्यांतील 'अर्थ' (Value) या कल्पनेकडे वळणें किती निकडीचें आहे याची

कल्पना आपल्याकडे श्री. वा. म. जोशी यांनी मांडली; पण एकंदर समीक्षा–शास्त्रांत 'रस' घेणाऱ्यांनी त्या कल्पनेकडे दुर्लक्ष केलें. नंतर 'वाङ्मयीन महात्मता' या श्री. मर्ढेकरांच्या ग्रंथांत ह्या कल्पनेचा व लय–तत्त्वाचा पुन्हा पुरस्कार झाला, पण तो ग्रंथहि दुर्बोध तर होताच पण निष्प्रभहि ठरला. प्रा. क्षीरसागर यांनी ही अर्थलक्षी सृजनशील टीकेची भूमिका आपल्या पद्धतीने मांडली आहे, पण तिचाहि प्रभाव मर्यादितच आहे. सारांश, एकीकडे 'सौंदर्य' व 'आनंद' या शब्दांनी सूचित होणारी समीक्षेची रूढ प्रवृत्ति व दुसरीकडे 'सामाजिक आशय' व 'आर्थिक प्रेरणा' यांचा शोध घेण्याची एकेरी नवी प्रवृत्ति यांच्या एकांतिकपणांत व अपुरेपणांत आजहि मराठी समीक्षा–शास्त्र भोवंडत आहे. यांतून वाट काढणें, त्यासाठी जरूर तेवढी मदत अर्वाचीन, पाश्चात्य समीक्षा–शास्त्रांतून व भारतीय रस–व्यवस्थेंतून घेणें, ही गरज आहे व मराठींतील मध्ययुगीन व आधुनिक साहित्याच्या प्रत्यक्ष परिशील-नांतच नव्या अर्थलक्षी सृजनशील समीक्षेला रंगरूप देणें व समृद्ध करणें हें आज आपल्या समीक्षकांपुढील कार्य आहे.

भागाबुढीच्या मताने

(पान १९ वरून)

"का सांगाचं आहे. माहा म्हननं असं, रानां-जंगलाचा रस्ता आन् आपुन चाललों आहो समज. त' माहा म्हननं, चालता चालता, म्या म्हनलं, आलं एखादं जनावर आडवं अन् मी म्हनतो बुढ्याच्या डोक्शावर म्या बझं देल्लं आन् माहा हात इरकामा. त' मंग म्या काय कराव्, सांग. मी बाईल का जनावर हाकलीन का वं! बुढा इरकामा असला त' कांही उपाव करन्. येळावखताचं कोनं सांगलं मायबइनी! येड्यावानी सयरांत आलं त' सयरांतलं नाही व्हाव्. मानसाचं काम मानुस करते, बाईचं बाईनं कराव्. म्हून म्हनतो पिसे, डावा गुतवावं आन् उजवा इर-कामा ठेवावं. येस म्हनलं कनाई वं पुने मिनं?"

"आता चालान् बी का करान् जेवनरात इथंच? उठाना वा पोरीव्हा!"

"मने, तुहं गाठोडं जराक् मी घेतो आन् जराक् पुनी घेईन. तूं नोको घेऊं. हं, चला, उठाव'!!"

कांही कविता

आंत.......! (गीत)

मनींचें मनिच राहिलें आंत

बोलत बोलत उगिच कांहितरि जरी उलटली रात
पलटली आता होत प्रभात
मनींचें मनिच राहिलें आंत

चुकवित दृष्टिस दृष्टि लाजली ओळख काळोखांत
मिसळुनि जात अता सकळांत
मनींचें मनिच राहिलें आंत

ओठांवरुनी आशय फिरला परत पुन्हा हृदयांत
घुटमळे जो आता शब्दांत
मनींचें मनिच राहिलें आंत

भुलवित निजपण तरिहि दुर्जेपण उरवित एकांतांत
विसर ज्याचा पडतो जगतांत
मनींचें मनिच राहिलें आंत.. ...!

—अनिल

तूं....मी....!

तूं आपुल्या दृष्टींतुन भावगंध उधळावें
मी आपुल्या गीतांतुन हृद्‌गत तुज सांगावें
तूं साध्या शब्दांतुन अर्थ नवे काढावे
मी बोलुन कांहितरी जगताला फसवावें
तूं 'जा' मज म्हणतां मी जागिच त्या अडकावें
मी 'जातों' म्हणतां तव नयनिं अश्रु तरळावे
फिरफिरून 'ये, येना' फिरफिरून 'जा, जा तूं,'
फिरफिरून अंतरांत उत्कट कढ दाटावे.

—गुणाकर देशपांडे

अंतःसंज्ञा

कल्पनेच्या घरा
कल्पनेचीं दारें
कल्पना परिवारें
वसती तेथे !

कल्पिल्या वराती
कल्पिली वोहरें
शोभेचीं खेचरें
मिरवती !

कल्पिल्या भ्रतारा
कल्पनेचा भोग
साच अभियोग
स्वप्नीं नसे !

कल्पना-प्रवाहीं
वाहवलें मन
जिनगरी दुकान
थाटियेलें ! १

* * *

लौकिका कारणें
केला बडिवार
केले नानाचार
देखाव्याचे !

मोडूनिया जुना
साजे नवा केला
साजोंच वाटला—
अभिनिवेश !

वेळेची आवडी
पाहूनिया बोल
रुचेल तो कौल
दिला जगा !

वाद्या मुखलेप
रुचे तैसें वाजे
रसना ही लाजे
रसिक-तंत्र. २

* * *

अंतरींची ओढ
अंतरंगा ठावी
कैसी पै वदावी
कोणा पुढे ?

होउनी लाचार
मौनावला शब्द
संज्ञे असंबद्ध
बोलवेना !

जाणवें अंतरीं
तें बोलूं गोचरीं
अंतरंगोद्‌गारीं
जिव्हाळलें-

तरी प्रज्ञा-वांझ
कालांध, खुरटा
येती अंगलटा
विशेषणें !

गोवळिया तरी
नवनीतीं काज
अंतः संज्ञा गुज
माथनिता ! ३

—गुणवंत हनुमंत देशपांडे

इशारा !

(जाति-अलकभार)

नको ग ! सजणे ! मनिं हरखूं

लागति गगनीं ढग फिरकूं !
वसंत वेगें
बघ तो लागे
पाउल मागे—
एक एक गे ! जरि सरकूं ॥१॥

वदशिल " पिकलें फळ चाखूं "
हिरवा पाला
फुलोर भरला
झडतां सगळा
लागतील कां तीं लटकूं ? ॥२॥

जातां वादळ रज झोकूं
रवि दिवसाभर-
झांकळेल वर
चपला भयकर
लवतां जाशील किति दचकूं ! ॥३॥

नको चांदणीसम मुरकूं
पडेल वारा
रिचतिल धारा
तिमिर पसारा
पाहिल उडुगण नभि झाकूं ॥४॥

येतां चालुनि खल डाकू
जरी न अडका
इमला पडका
जिवास धोका !
कसे ग ! आपण त्यां रोखूं ! ॥५॥

कुठे ग ! आपण मग ठाकूं !
खचतां अंबर
ढळतां डोंगर
धरणी पामर
देइल वद कां पद टेकूं ? ॥६॥

—पांडुरंग श्रावण गोरे

अनुक्रमणिका

भाद्रपदांतिल चांदरात

भाद्रपदांतिल गहरी धुंद चांदरात
भिजत पावसांत कधी हसत चांदण्यांत

१

घन वर्षुनि जरि गेले
कण ओले क्षण ओले
-तेजाचा हुंदकाच वाटला नभांत
भाद्रपदांतिल गहरी धुंद चांदरात

२

आर्द्र मृत्तिका कणांत
शत चंद्रम झळकतात
स्वप्नें जणु धरणीचीं हसत धावतात
भाद्रपदांतिल गहरी धुंद चांदरात

३

थेंब चंद्रिकेचे तृणिं
थरथरति पर्णांतुनि
चाफ्यावरि पीतधवल दिशा उजळतात
भाद्रपदांतिल गहरी धुंद चांदरात

४

अश्रूंनी भिजलेली
प्राजक्तें फुललेली
हाक विकल नीरव मज देइ मध्यरात
भाद्रपदांतिल गहरी धुंद चांदरात

—कान्त

निंबोनी आली भरा

चैताची चितवन, वैशाखीं मीलन निंबोनी आली भरा
जेठांत भेटी, आखाड तुटी फिरें नजर भिरभिरा
बांधू जांभळीला, सावनझूला भिजत झेल सरा
निळ्या ओठावर उमटला ग निळावंतीचा तोरा
कोवळ्या काट्यानं भरली बाभुळ जांभुळ गाभुळलं
पिरतीची दवा हा देई भादवा जुड्यांत माळूं फुलं
डिकेमालिचीं फुलं लांबसर कानामधि खोवलीं
गरगर फिरतां फूल पाकळी गालाला बोचली,
कशी ग गालाला बोचली
करूं शिलंगण, लुटून सोनं ओलांडून उंबरा ग
फिरे नजर भिरभिरा

आश्विन कार्तिक हळदीचं न्हाणं, फुलारली शेवती
जाइजुईला हळूच हसली लाजवंतीची जिवती
मनांत डोकाउनी पाहतो मोतीघोस मोगरा
निंबोनी आली भरा

जवळी आलं, पुढं ढकललं मोहतुर मार्गेसरा
पुसांत पुसलं, माघांत हसलं, कसं मुसमुसलं सयंवरा
फागांत फसलं, जरासं रुसलं, येऊन वसलं माझ्या घरा
ग निंबोनी आली भरा

—राजा बढे

खडक

निवली खळबळ
निवान्त झुलती लाटा
कधीच गेल्या
रेतीवरल्या
पुसून पाउलवाटा !!

पुळणीवरती
तरल ओलसर शांती
झिळमिळते वर
तृप्त उन्हाची
पिवळी रेशिमकांती !!

उठती अल्गद
पाण्यावरती तरंग
नुकता न्हाउन
संथपणाने
खडक वाळवी अंग !!

--मंगेश पाडगांवकर

असें कांहीं पाहिलें आहे--

असें कांही पाहिलें आहे—
ज्यानें दुभंगलों.
आणि उमगलें : मनांमनांतून
शिवशिवणाऱ्या विराट विकलतेला
माझ्या जवळ शब्द नाही
डोळ्याडोळ्यांतून थरथरणाऱ्या
पाऱ्यांतील वेदनेचा वेध घेणारा
माझ्याजवळ नेत्र नाही.
धुसमुसून कोपऱ्याशीं स्फुंदणाऱ्या
जन्मण्यापूर्वीच निर्वासित झालेल्या
करपलेल्या, हरवलेल्या,
अनाथ जगन्नायासाठी
माझ्याजवळ कूस नाही.

कूस नाही; माझ्यासाठीही कूस नाही

असें कांही पाहिलें आहे—
भरबाजारांतील आंधळ्या गर्दीत
ऐन दुपारीं रात्रीचें दृश्य :
पत्र्यांच्या चाळींतून; अळ्यांच्या आळींतून;
हाडांच्या जाळींतून; डोळ्यांच्या बिळांतून;
माणसें सडणारीं, न मरूं शकणारीं;
माणसें धुमणारीं, न पेटूं शकणारीं;
माणसें कुढणारीं, न कडाडणारीं;
असें कांही पाहिलें आहे–
ज्यानें दुभंगलों;
ज्यानें आलें आचानक अंधत्व
आणि आंधळ्या ईडिपसप्रमाणें
वाटलें निघावें जारपुत्रांच्या मागोमाग
विजनाच्या वाटेनें.
वाटलें असावी
माझ्याही अंतःकरणांत समाज विषवृक्षाची
प्रदीर्घ छायाच; लांब लांब फांद्यांचा
अवजड विस्तार. कधीही न पिकणारी
खुरटलेलीं फळें. जळलेला मोहोर.
आणि तळाशीं
थंडावलेलें धडगें.

—विंदा करंदीकर

ते आज विसरलों छंद

ते आज विसरलों छंद !

नव्हते जेव्हा शशिस चांदणें
फुलांस नव्हतें ठाऊक फुलणें,
शब्दांतुनि माझिया निघालें—
सुरंग सुरस सुगंध !— १

उठला कापत अचल हिमाचल—
दिपलें धडकत तेजोमंडल—
सुर–खडगीं चढविली प्रेरणा
सफल कराया द्वंद !— २

तरुण हृदय ये जखम घेउनी
व्यथा टाकिल्या क्षण झंकारुनि,
त्या तालावर पतंग झुलले
लुटीत ज्वलनानंद !— ३

रति निघाली अभिसाराला
अनंत अरसिक मूढ आंधळा,
सभ्य शिकविले प्रसाधनांचे
रूपमदेस प्रबंध !— ४

रमारसांची चोळित डोळे
सभेंत पाही स्वप्न जागलें
पुसत पैंजणा पदन्यास 'हे
कवणाचे रसबंध ?' ५

—कै. बी. रघुनाथ

अनुक्रमणिका

जीवन—नाट्य

(१)

कधी उषा कधी निशा कधी दिनान्त
विलोल वीचि शोकसागरांत शान्त
बघूनि भाविकाल वा हसे मनांत
क्षणाक्षणांत वर्तमान भूति श्रान्त !

असेच आज जें उद्या असेल काय ?
स्थिरांत आजच्या उद्या उरेल काय ?
आघान्तरीं सुरेल तान ही विरेल
अशीच जीवनांत नित्य 'हाय ! हाय ! '

(२)

कणाकणास ये नवीन मूल्य वा
चराचरास अर्थ प्राप्त हो नवा
नव्यांतुनी जुनें जुन्यांतुनी नवें
प्रतीत होत विश्वरूप मानवा
भवाब्धि शोकदु:खवीचिका वरी
रहस्य खोल लुप्त हो तदन्तरीं
तमांत पृथ्विगोल हा भ्रमे उगा
भ्रमांत मुक्ति मानवास कां खरी ?

(३)

तुवांच गूढजाल निर्मिलें अनन्त
हरावयास दर्प मानवी वृथा

उगाच बुद्धिवैभव प्रकाश हन्त
उरेल अंन्ति केवळ प्रभूकथा !

—ना. वा. शास्त्री

तें माझें घर ! तें माझें घर !

—१—

बाहेरीं मी सकाळपासुन
मावळला दिन
परतलों न पण
म्हणून तिष्ठत असेल बसलें
हृदयीं होउन सचिंत कातर
वीज दिव्यांच्या मिषेंच अनिमिष
कापत शंकित वरवर थरथर
पहात माझी वाट कधींची
तें माझें घर !
तें माझें घर !

—२—

सताड उघडुन दोन्ही दारें
की त्या द्वारें
लांब पसरूनी विशाल निज कर
औदार्यानें
मोकळ्या मनें
कवळाया मज असेल आतुर
तें माझें घर !
तें माझें घर !

—३—

जणू कुणी मी नव अभ्यागत
म्हणून कराया माझें स्वागत
पर्युत्सुक होउन अभ्यंतर
दारावरली तोरण—झालर:..
'स्वागत—स्वागत—स्वागत—स्वागत'
असेल छेडित हीच एक गत
भाग्यवंत मी अहो ! खरोखर
तें माझें घर !
तें माझें घर !

—४—

पायधूळ मी झाडिन म्हणुनी
उंबरठ्याशीं असेल पडुनी

मम वाटेने
उत्कंठेने
पावदान अतिनम्र अवस्तर
तें माझें घर !
तें माझें घर !

—५—

आणिक अंतर्गृहीं स्टोव्हवर
आनंदाच्या उकळघा फुटुनी
उत्साहाने हासत नाचत
राजिखुशीने असेल गर्जत
चहा मधुरतर
ब्रेड बरोबर
पतिपत्नींचें मिथुन मनोहर
चहा तयांची साऱ्या जगभर !
तें माझें घर !
तें माझें घर !

—६—

हिंदि, मराठी आणि इंग्रजी
नियतकालिकें वेगवेगळीं—
छे ! तीं माझी मित्रमंडळी !
मेजाभवतीं असतिल सगळीं
बोलायाला मर्जीश उतावळि
प्रचलित नानाविध विषयांवर
विचार त्यांचे गभीर सुंदर
अधुनी मधुनी कथा व कविता
चुटके चटके गमतीखातर
तें माझें घर !
तें माझें घर !

—७—

करावया मम मनोविनोदन
अधीर अगदी स्वरसंवाहक—
असेल;
मजला म्हणेल, "ऐका !
गायन–वादन मंजुळ मोहक;
नभोवाणिचीं अनेक केंद्रें
रुचेल तुम्हां लावा त्यांतिल
सिलोन, गोवें किंवा लखनउ
ठणठण ठोके पडल्यावर नउ
दिल्लीवरुनी करित प्रसारित
'हम दिल्लीसे बोल रहे हैं'
कथतिल वार्ता मग वार्ताहर
ताज्या ताज्या सर्व एकसर
तें माझें घर !
तें माझें घर !

—८—

मी वणवणलों
अतिशय शिणलों
नयेत होऊं कष्ट मला लव
श्रमलय व्हावा माझा यास्तव
मज उत्संगीं उत्सुक घ्याया
सज्ज सारखी असेल शय्या
निजविल ती मज माझी आई
करीत मजला 'गाई–गाई'
माया मजवर
तिची अनावर
तें माझें घर !
तें माझें घर !

—भवानीशंकर श्री. पंडित

त्याचें गीत :

१

अंधाराचा उंबरठा
रातभर झिजवला...
गांधिलमाशांचा थवा
मोहोळांतून उडाला.

२

अर्धमोडल्या नांग्यांची
बोच उरली मनांत
जणू इंद्र शापभ्रष्ट
असंख्य भगांनी विद्ध

३

येतां प्रभात साचला
पानोपानीं गहिवर
गुलाबाच्या पाकळ्यांत
अनुकंपेचा आवेग.

४

वाटे तूंहि पडशील
होऊनीयां लोळा गोळा
आजच्या युगाची नवी
रामपदासाठी शिळा

५

गुलाबाच्या आवेगाचा
गहिवर वाफारला
आणि कुत्सित हासला
तुझ्या मनाचा धुराळा !

—य. द. भावे

पुनः कशास भेटायाचें ।

पुनः कशास भेटायाचें ।

जो प्रवेश संपला
त्यास पुनः बसवायाचें
पुनः कशास भेटायाचें ।

तें तर नाटक कविच संपलें
होउन चुकलें व्हायाचें
पुनः कशास भेटायाचें ।

हारपलें तें सोंग आजला
भावुक मंगल अजाणतेचें
नव तरुणांचें नव तरुणींचें
नाहीच आता तें जमण्याचें
पुनः कशास भेटायाचें ।

जें न रंगलें सोंग तेधवा
पुनः कशास सजवायाचें ।
पुनः कशास भेटायाचें ।

छे, छे, जाऊं संथ क्रमानें
सोडुन देऊं जीवन वर्तुळ
परस्परांना छेदायाचें
पुनः कशास भेटायाचें ।

—मार्तंड नीलकंठ गलगलीकर

आषाढ

आषाढ घनांची छाया
नांगरल्या धरणीची पुलकित काया

गावच्या नदीला आलें पहिलें वहिलें पाणी
विहिरींत पाहती डोकवुनी उत्कंठित गृहिणी

बीजांमधुनी उठली रोपें डोळे चोळत
खोड जुने मोडुन पडलें रस्त्यावर लोळत

कौलारांवर येउन बसलें संचित वानर
'ऋतु गेले इतुकें होउं न शकलें अपुलें घर'

नागवीं बालकें हुंदडती पर्जन्य लुटाया
बोलाविति कंठरवाने घरांत त्यांना त्यांच्या आया

विरहिणिची वाढे अधिकच तगमग
बरसतील एव्हढ्यांत हे आतुर भरले ढग !

—मनोहर म. देशपांडे

अशा दुपारच्या वेळीं !

वैनगंगेच्या काठाशी एका आम्रवृक्षातळीं
बसायचें वेड मला अशा दुपारच्या वेळीं !

आवरूनी पाटपाणी करूनीया झाकपाक
धुणें घेऊन डोईला येते बाई एक ..एक...
डावीकडे मान झुके डोईवरल्या भाराने
पाय पडती ठेक्यांत उरोजांच्या उभाराने !
एका हाताला धरूनि पोर दुडदुडा धावें—
निःसंकोच मनें सारें झाडाआडून पहावें !

वैशाखाचा जाच मोठा ! क्षीण धार कोठे...कोठे
आता धारेहून आहे तीरीं वाळवंट मोठें !
हात गुंतले धुण्यांत बांगड्यांचा येई नाद
एकमेकींना उगीच देती ओरडून साद !
—अनिर्बंध त्यांची वाणी ! —वात्स्यायनाने लाजावें
प्राण आणूनि कानांत झाडाआडून ऐकावें !

नाही साऱ्या घाटावर कुणी पुरुष जाणून
कुणी उतरते जळीं मत्स्यकन्यका होऊन.
तीरीं राहिला संकोच ! —स्नान मत्स्यगंधा करी

निसर्गाच्या उरीं भरे वैशाखांत शिरशिरी !
—जसें पाण्याच्या आडून मासळीने झळकावें
तसें कांहीसें रेखीव एकटक टेहळावें !

वैनगंगेच्या काठाशीं एका आम्रवृक्षातळीं
बसायचें वेड मला अशा दुपारच्या वेळीं !

—वसंत वऱ्हाडपांडे

विलीन होणार नाहीत—

शमणार नाही
हें विद्ध मन

उद्याच्या सुखद स्वप्नांच्या माळा घालून
शिवलें जाणार नाही
हें फाटकें हृदय

बुजणार नाहीत
हृदयाला पडलेलीं असंख्य घरें
उगीचच डोळ्यांत
आसवें म्हणून

अतृप्त आ[illegible]ें ओझें
पाठीवर घेऊन
काळाची चढण चढत आलेले
अजाण जीव
नुसती स्वप्नांची भुरळ घालून
समजणार नाहीत !!

अमावास्येच्या काजळांत
अथांग सागरांत बुडूं पाहणारे
असंख्य जीव
नांवास उरलेले
शीड फडफडत

अस्पष्ट अस्तीत्व दाखवीत
तापलेल्या वाळूवर
तळमळणारे जीव
उद्याच्या आशेवरच फक्त
तुमच्यांत विलीन होणार नाहीत
खास !!

—श्रीपाद गंगाधर कावळे

अनुक्रमणिका

प्रादेशिक गीत

हक्क

मूळ पंजाबी कवयित्री—**अमृता प्रीतम**

अनुवादक—**प्रभाकर माचवे**

[प्रादेशिक गीताचें हें नवीन सदर आम्ही या अंकापासून सुरू करीत आहोंत. या बाबतींत श्री. प्रभाकर माचवे यांच्या प्रमाणेच इतर भाषेंतील लेखकांचें सहकार्य लाभल्यास आम्ही अत्यंत आभारी होऊं. —संपादक]

(मूळ पंजाबी)

कीते झारने जिमी दे कई टोटे
बन्ने लख दावे हदबंदियाँ दे
उड्डे ख्वाब ते अख्खां विच आण सुत्ते
दोहां सभ्यताँ दूर वसंदियाँ दे
अख्खां झूमियां बुत्त ज्यों झूम देने
किसे टहाणियां बूर पुवंदियाँ दे
तेरे सांचो मेंहक दाकुट्ट भऱ्या
ऱ्हौणां पिद्दियाँ नाल सुगंधिया दे

सत्ते रंगे आसमानने डोल देत्तै
मत्थे कूललुकाई दे सोन वन्ने
केडे गगन तो रहमताँ वरस्सियांनी
सारी भौने रज्जके भरे छन्ने
चन्ना सूरजाँ आनकेवले जादू
साड्डे एस बन्ने साड्डे ओस बन्ने
जिन्द जिन्द दे विच्च समाई आके
टोटे जिमीं दे गलांनु लाग रुन्ने

रुन्नी जिमीं ते रुन्नाए लोक सारा
तन्दा इंज न जान तरोडियाँ वे
लौ बीटने जार ना फेर उठ्ठण
जिन्ना घत्तियाँ तोड बिछोडियाँ वे
आँग जिमीं दे पठ्ठयिां वाँग टुक्के
जिन्दाँ छल्लियाँ वाँग मरोडियाँ वे
इन्ना नित्त दे जाराने लखनवारी
लांमा छेडियाँ फूणियाँ रोडियाँ वे

(मराठी गद्यांत अनुवाद)

झाराने जमिनीचे कंक तुकडे केले
हद्दबंदोचे लाख दावे मांडले;
डोळ्यांत उडणारीं स्वप्नें तेथेच झोपलीं, थिजलीं,
दोन संस्कृतींचीं दूर वसणारीं दोन स्वप्नें !
त्या स्वप्नांमुळे डोळे धुंद झाले
ज्याप्रमाणे डहाळ्या नव्या मोहोराने मस्त होतात.
तुझ्या श्वासोच्छ्वासा सुवास मी असा घेतला
की त्या सुगंधाने सर्व हवा भरून गेली.

सात रंग आकाशांत डोलूं लागले,
सोन्याने सर्वांचीं डोकीं मढविलीं गेलीं,
कोणत्या आकाशांतून इतकी कृपा बरसली
की पृथ्वीने त्या कृपेने मनसोक्त कटोरे भरून घेतले
चंद्रसूर्याने जादू अशी केली
इकडे तिकडे, चोहिकडे, संपूर्ण
जीवन जीवनांत येऊन सामावलं
जमिनीचे तुकडे गळयांत गळा घालून रडले !

जमीन रडली नी सर्व लोक रडले,
धागेदोरे अशा रीतीने तुटत नसतात,
ते रक्त सांडणारे झार परत न जागोत
ज्यांनी धरणीची खंडोळी केली, नाश केला,
तुकडे असे केलेत ज्याप्रमाणे कुट्टी कापतात,
सगळीं माणसं अशीं मुरगळलीं जणू कणसं;
या परत-परत येणाऱ्या झारांनी लक्षदां
युद्धें पुकारलीं व किती अक्षौहिणी सैन्य नष्ट केलं !

अनुक्रमणिका

जागे आज लुकाई दे हक जागे
उन्ना फूणियां दी सौ खाके ते
सांजे हक्क दे धरतियां सांजियांने
झल्ले कोन इस वारनू आके ते
खेत लोकां दे खेतांनी कसम खावी
सिटे अन्न देहत्यांविच्च चाहु के ते
रिन्दा ! आन वफा दे कौल दित्ते
सांजी पौण दां जाम उठा के ते

पण आज लोकांचे हक्क जागे झाले आहेत
त्या अक्षौहिणींची शपथ घेऊन
खंडशः विदीर्ण धरणीचे संयुक्त हक्क सजले आहेत
आता यांचा वार कोण झेलूं शकेल !
शेतें लोकांचीं आहेत, त्यांची शपथ घे
दोन्ही हातांत धान्याच्या ओंब्या उचल,
प्रियकरा! आज सच्च्या प्रेमाची शपथ घे
या सर्वांच्या हक्काच्या हवेचा पेला उचलून !

मृत्युंजय

प्राशितों लाजरा भावगंध आकंठ
शिर टेकुन मंथर उरीं सखीच्या शांत,
धुंदींत पूर्तिच्या सांद्र पापण्या मिटती
नभपुष्प मिटावें जसें तृप्त दिनांतीं;
—तों उगाच नकळत उदास होते काया
ढाळिती आसवें अंधाराच्या छाया—
त्या क्षणीं आंतल्या आंत सांगतें कोणी,
" युग सहस्र असतीं तुझिया मरणा अजुनी! "

× ×

निष्पाप अंग मम चिणोनिया भिंतींत
उद्दाम हाणतें घाव विश्व हें नित्य,
चिळकांड्या उडती रक्ताच्या या करुण
उद्बंध गळें जंव अंभ भंगता गगन;
—तों उगाच नकळत प्रसन्न हसते काया
नाचते पिउनियां सुधा निळी शशिछाया—
त्या क्षणीं आंतल्या आंत सांगतें कोणी,
" युग सहस्र असतीं तुझिया मरणा अजुनी! "

—वसन्त निनावे

पहाट–नाट्य

उंबर मूक उभा.
शून्यपणाने पाहत सारी झडली पर्णसभा
खंडित चिंच तिथे
अपमानित प्रीतीसम अपुले हिरवे क्षण जपते.
पिंपळ मुग्धपणें
पुन्हापुन्हा लाजतो हासवित उरांत स्पंदनें.
जुइवर लक्ष तुरे
गंधाचा नटवीत पिसारा वायुलहर विहरे.
पहाट–नाटच खुले
सहज तमाचें भेदित काळिज तेजकमळ उमलें.
उडली त्यासरशी—
रमणीच्या हृदयाहुन नाजुक चिमणी भुरदिशीं !
नकळत शीळ फुले
शांत स्वरांच्या सुबक झालरी लेवुन गंध झुले !

—राम शेवाळकर

अंतर्यामीं

असण्यांत गोडी तुझ्या नसण्यांत
अस्मिता निरर्थ तुझ्या साम्राज्यांत—
इच्छामात्रें तुझ्या बारावरी वार,
पूर्ण पराभव भीक दारोदार !
'तथास्तु' तुझें तें शौर्याचा संचार
जयावरी जय जयजयकार
कठोर तपस्या, आत्मबलीदान,
घोर दुर्वर्तन, संहार भीषण !
घडवीसी जरी अवघें जें घडे
द्वैताचे प्रत्यय मात्र बुडबुडे !
अस्तित्वाभोवतीं त्वदिच्छावरण
अस्तित्वाभ्यंतरीं तुझेंच दर्शन !
द्वैताद्वैताचा हा तमाशा निर्घृण
परतंत्र स्वत्व विटंबी जीवन !
अंतर्यामीं इच्छा तूंच नसावेंस
नससी निश्चित ! –पटावें बुद्धीस !

—द. चिं. सोमण

लघुकथा

शंख आणि घड्याळ

शंकर बाळाजी शास्त्री

आमच्या शेजारीं तें नवीन बिऱ्हाड रहायला आलं आणि त्यामुळे मला, अन् माझ्यापेक्षाहि अधिक माझ्या सौभाग्यवतीला कितीतरी आनंद वाटायला लागला. ह्या गावांत आमची बदली होऊन आम्ही रहायला आलों, त्या गोष्टीला आता, कांही नाही तरी, तीन-चार महिने व्हायला आले होते. पण, आमचाच स्वभाव एकलकोंडा होता म्हणून म्हणा, की ह्या गावचे,- विशेषतः आमच्या आळींतले लोकच तऱ्हेवाईक होते म्हणून म्हणा, पण ह्या तीन-चार महिन्यांच्या अवधींतहि आमची कोणाशीं विशेष ओळखदेख झालेली नव्हती,-मग कोणाकडे जाण्यायेण्याची किंवा घरोब्याचे संबंध उत्पन्न होण्याची तर गोष्टच सोडा ! झाड-लोट, स्वयंपाक-पाणी, -जेवण-खाण वगैरे गोष्टींत सकाळचा वेळ तर निघून जायचा, पण मी कचेरींत निघून गेल्यानंतर संध्याकाळीं परत घरी येईपर्यंतचा सारा वेळ आमच्या 'हि'ला किती कंटाळवाणा जात असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. थोडा वेळ वामकुक्षी, मग आलेलीं वर्तमान-पत्रें, मासिकें वगैरे चाळणें, संध्याकाळीं कोणती भाजी करायची, चटणी करायची की नाही ह्या असल्या गोष्टींचा आपल्या मनाशींच विचार करणें अन् उगाच ह्या खोलींतून त्या खोलींत चकरा मारणें व किती वाजले तें पाहण्यासाठी टेबलावरच्या टाईम-पीसकडे अधून-मधून डोकावणें ह्यांत माणसाचा वेळ कितीसा जाणार ?—बरं, आई-बापांना निवांतपणाचे चार क्षणहि लाभूं न देणारीं चार-दोन पोरं-बाळं घरांत असावीं, तर तर त्या बाबतींतहि दुर्दैव आमच्या बाबतींत आडवं आलेलं !

अशा परिस्थितींत, शेजारचं ओस पडलेलं घर पुन्हा माणसांनी गजबजणार ही बातमी आम्हाला,— म्हणजे विशेषेंकरून आमच्या सौभाग्यवतीला विशेष आनंदाची वाटली असली, तर त्यांत नवल काय ?

आता, त्या आनंदावर विरजण घालणारी एक लहानशी गोष्ट ह्या बाबतींत होती,—नाही असं नाही. पण तिकडे तिने दुर्लक्षच करायचं ठरवलं होतं. आमच्या शेजारीं रहायला आलेलं कुटुंब मद्रासी होतं. ही गोष्ट लक्षांत आली, तेव्हा कांहीशी खट्टू होऊन ती कांहीशी स्वतःला उद्देशून आणि कांहीशी माझं लक्ष वेधण्याच्या हेतूने म्हणाली, "--इश्श ! काय बाई तरी !"

टेबलावरच्या कचेरीच्या कागदपत्रांवरून आपली दृष्टि न उचलतां, खिडकींतून बाहेर रस्त्यावर दृष्टि रोखून उभ्या असलेल्या माझ्या पत्नीचे हे उद्गार कानीं पडून मी म्हणालों, "कां ? काय झालं ?—"

"अहो, हें पाहिलंत कां ?"

"काय ?--"

"आपल्या शेजारचे ते नवीन बिऱ्हाडकरू..."

"हं, हं ! त्यांचं काय ?" मी कांहीशा उत्सुकतेनं प्रश्न केला.

"अहो,-ती मंडळी मद्रासी दिसतात !"

"हात्तिच्या ! एवढंच ना ?--म्हटलं काय झालं..."

"--वाटलं होतं नवीन शेजारी आले आहेत रहायला. आता दुपारच्या दोन घटका वेळ मजेंत निघून

जायला सोय झाली अनायासं ! --"

" --ती सोय तर झाली आहेच की !--"

"हं ऽऽ पण बाई, ती मंडळी पडली मद्रासी ! कोणाला ठाऊक कशा स्वभावाचीं माणसं आहे तें ! "

" म्हणजे काय ?--अग, मद्रासी झालीं तरी तीं माणसंच आहेत ना ? "

" तें झालं हो--पण..."

" पण काय मग ? "

" अहो, तुमचं एक वरं आहे. इंग्रजींतून खुशाल बसाल दोघे तासन्तास गप्पा मारीत. पण मला कुठलं यायला--समजायला वसलं आहे त्यांचं तें तसलं वोलणं ? इश्श बाई ! देवानी मला शेजारी धाडला, तो तरी पहा कसा ! --"

तिच्या वोलण्याचं मला हसूं आलं. मी म्हणालों, "ह्या आपल्या हातच्या का गोष्टी आहेत ? "

" तेंच तर मीहि म्हणतें आहे. "

"--पुन्हा, मी म्हणतों, अजीवातच शेजार नसण्यापेक्षा, आलेले मद्रासी हे काय वाईट ? दगडापेक्षा वीट मऊ. "

"कसला दगड, अन् कशाची वीट !--साऱ्यांचा एकच मोठा खडखडाट !--पण, मंडळी कांही वाईट दिसत नाहीत, वरं का--"

"कशावरून ?"

"ती वाई, पाहिलीत का, कशी चांगली, गोरी--गोरी, गुबगुबीत दिसते आहे !--तिचं नेसतं लुगडं देखील चांगलं गर्भरेशमी, भारीपैकी दिसतं आहे, वरं कां. पण, नेसण्याची ही तरी कसली वाई तऱ्हा, म्हणतें मी ? इश्श..."

मला पुन्हा तिचं हसूं आलं. मी म्हणालों, "तूं पण आता तिच्यासारखं लुगडं नेसायचं शिकून घे तिच्यापासून."

"इश्श !--कांही तरीच..."

"कांही तरीच काय ? अग, रीती--भाती, खाणं--पिणं, आचारव्यवहार वगैरे गोष्टींची ही अशी देवाण--घेवाण करणं ह्यांत वाईट काय आहे ? उलट त्यांमुळे एकमेकांवद्दलचे निष्कारण रुळलेले गैरसमज दूर होऊन एक विशाल राष्ट्रीयत्वाची जाणीव..."

"पुरे झालं तुमचं तें व्याख्यान !--

"वरं, पुरे म्हणतेस, तर, हें केलं पुरं--हें पहा, नऊ वाजायला आले. आज आम्हाला कचेरी--बिचेरी कांही आहे की नाही ?"

"अग बाई !--झाले का नऊ !--" ती उगवगीनें म्हणाली. "ह्या नव्या मंडळींच्या गडवडींत वेळेचं भानच राहिलं नाही" मला असें म्हणून ती स्वयंपाक घराकडे निघून गेली.

मीहि आंग झटकून आंघोळीला जाण्यासाठी निघालों. जातां जातां खिडकींतून गलीकडे नजर टाकल्यावाचून राहवलें नाही. मी पाहिलें, गाडीवाल्याच्या मदतीने तो मद्रासी गृहस्थ सामानसुमान घरांत नेण्याच्या गडवडींत होता. त्याची ती गोरी--गोरी गुटगुटीत पत्नी दाराजवळ उभी राहून तें पाहत होती. नवरा--वायको दोघेहि मला भले लोक वाटले. म्हटलं, चला. वरं झालं. शेजाराला आलेले लोक निदान सकृद्दर्शनीं तरी वाईट दिसत नाहीत, हें ठीक झालं.

जेंवण आटोपलं, आणि कपडे करून मी कचेरीला जाण्यासाठी निघालों. जातां जातां, मी माझ्या सौभाग्यवतीला म्हटलं, "आजची दुपार कांही कंटाळवाणी जायची नाही तुला. नवीन शेजारी आले आहेत, त्यांची ओळख --वीळख...

पण ती कांहीच वोलली नाही. कांही वोलेल अशी अपेक्षाहि माझी नव्हतीच. कचेरीची घाई असल्यामुळे मी निघून गेलों.

* * *

दिवसभर कामाच्या धांदलींत असल्याकारणानें मला आमच्या ह्या नवीन शेजाऱ्यांवद्दल विसरच पडला होता. परंतु संध्याकाळीं घराकडे जातांना मला पुन्हा त्यावद्दल आठवण झाली. घरांत शिरतां शिरतां, मी सहजच त्या घराकडे दृष्टि वळवून पाहिलें. वाहेरून दारें--खिडक्या वंदच दिसत होत्या. आंत कोणी मंडळी आहेत तरी की नाही, त्यावद्दल तिऱ्हाईत माणसाला शंका उत्पन्न व्हावी, अशी सामसूम तेथे दिसत होती.

घरांत गेल्यानंतर मी कांहीशा उत्सुकतेनेच सौभाग्यवतीच्या चेहेऱ्याकडे पाहिलें. पण तेथेंहि मला विशेष असें कांही आढळलें नाही. मी शेवटीं प्रत्यक्षच विचारलें, " कसं काय ? "

"असायचं काय ?—ठीक आहे, नेहमीप्रमाणेच"

"नाही,—माझ्या विचारण्याचा हेतु असा,—म्हटलं, गेली होतीस का शेजारीं ? "

" मी नाही बाई गेलें. "

"कां ग ? "

"—म्हटलं, आजच आले आहेत ते लोक. घरांत सारं सामानसुमान अस्ताव्यस्त पडलेलं असेल. त्यांच्याच धांदलींत असतील ते. त्यांत आपण आणखी कशाला उगाच जायचं आणखी ? "

"तेंहि कांही खोटं नाही. "

"पण शेजार–धर्म म्हणून आपण जायला पाहिजे त्यांच्याकडे एकदा, हें मात्र कांही खोटं नाही. "

"हं "

"मग ?"

"मग काय ?–काय म्हणणं काय आहे तुझं ? "

"नाही,–म्हटलं, चालतां का, आपण जाऊन येऊं त्यांच्याकडे ?"

"आपण ?—"

"हो.–काय हरकत आहे ?"

"हरकत कशाची त्यांत ?–चला. मी तयार आहें. यायला. चहा–विहा घेऊं अन् मग जाऊं."

आम्ही गेलों, त्यावेळीं सहा वाजून गेले होते. अद्यापिहि त्या घराचीं खिडक्या–दारें बंदच होतीं.

मी पुढे झालों आणि दारावर ठोठावलें. एक–दोन मिनिटें झालीं तरी आंतून कोणतीच चाहूल ऐकूं येईना. तेव्हा पुन्हा एकदा किंचित् अधिक जोराने दार ठोठावलें. ह्या खेपेला मात्र आंतून प्रत्युत्तर आलें. आपल्या विचित्र स्वरांत हिंदी शब्दांचा उच्चार करीत तो विचारत होता, "कौन हाय ?–किया हाय ?–" आणि पुढच्याच क्षणीं दार उघडून तो आमच्यासमोर आला.

आम्हां उभयतांना पुढे उभें पाहून त्याला आश्चर्य वाटलें असावें हें स्पष्टच दिसत होतें. तो टकमका आमच्या चेहेऱ्यांकडे पाहतच उभा राहिला.

शेवटीं मीच त्याला स्वतःची ओळख करून दिली आणि आमच्या येण्याचा हेतुहि त्याला सांगितला.

पण, तरीहि तो गृहस्थ मख्खासारखा दारांतच उभा होता. साधा शिष्टाचार म्हणून तरी त्याने आम्हाला घरांत येण्याबद्दल सुचवायचें ? पण तें देखील तो करीना ! मी एकटाच असतों, तर कदाचित् मी ह्या गोष्टीकडे तेवढेसें लक्ष दिलेंहि नसतें. पण बरोबर माझी बायको होती. कांही नाही तरी, ह्या विचाराने तरी त्या गृहस्थाने आम्हाला आंत येण्याबद्दल सूचना करावी की नाही ? पण तो तसें कांहीच करीत नाही असें पाहून, शेवटीं मीच माझ्या पत्नीकडे वळून म्हटलें, "तूं आंत जा आणि ह्यांच्या मंडळींशीं भेटून ये. कांही हवं–नको असल्यास चौकशी करायला विसरूं नकोस."

अशा रीतीने, नाइलाज झाला म्हणूनच, तो गृहस्थ दारांतून बाजूला सरला व त्याने माझ्या बायकोला घरांत जाण्यासाठी वाट करून दिली. ती त्याच्या अंगावरूनच आंत गेली व पलीकडच्या खोलींत दिसेनाशी झाली. मी आणि तो गृहस्थ, दोघे दारांतच उभे होतों.

तो स्वतः कांहीच बोलत नव्हता. आमचें असें येणें त्याला बहुश: रुचलें नसावें. त्याच्या ह्या विचित्र वागणुकीमुळे, आपण उगाच ह्या पंचाइतींत पडलों, असं मला वाटूं लागलं. पण काय करायचं ? प्रसंग शेवटपर्यंत निभावून नेणं प्राप्तच होतं. माझी बायको आंत गेली होती, ती परत येईपर्यंत मला कसा तरी वेळ काढणंच भाग होतं. मी त्या गृहस्थाशीं इकडच्या–तिकडच्या गोष्टी काढून बोलायला लागलों. प्रत्येक गोष्टीला नुसतेंच 'हो', 'नाही', वगैरे तुटक उत्तरें देत होता. तो काय करतो, मी कुठे नोकरीला आहें, येथे येण्यापूर्वी मी कुठे होतों, तो कुठे होता, वगैरे बाबतींतहि मी स्वतःबद्दल माहिती देऊन त्याच्याबद्दल माहिती काढून घेण्याचा प्रयत्न करीत होतों. पण त्यालाहि, यावं तसं यश आलं नाही. कळलं तें एवढंच, की तो गृहस्थ कुठल्याशा विमा कंपनींत काम करीत असतो, आणि नुकतीच त्याची ह्या गावीं बदली झालेली आहे.

अनुक्रमणिका

असल्या अबोल आणि माणुसघाण्या वृत्तीच्या माणसा-कडून विमा–कंपनीचं काम तरी कसं होत असेल, ह्याचंच मला आश्चर्य वाटत होतं.

आमच्या ह्या अशा एकतर्फी संभाषणांत बराच वेळ निघून गेला. —निदान तसं मला वाटलं तरी. सबंध वेळ आम्ही दारांतच उभे होतों. तो चौकटीवर एक पाय देऊन आंत, आणि मी त्याच्या पुढे पायरीवर ! तो मला आंत येण्याविषयीं कां म्हणीत नाही ह्याचं मला आश्चर्यंच वाटत होतं.

शेवटी एकदाची आमच्या सौभाग्यवतीची स्वारी एकदाची आपली पहिली मुलाखात संपवून बाहेर आली, आणि मला हायसें वाटलें. मी नमस्कार करीत त्या गृहस्थाचा निरोप घेतला, आणि वेळ झाला म्हणजे आमच्याकडे अवश्य येण्याची विनंती करून तेथून घराकडे जाण्यासाठी निघालों. आमची पाठ पूर्णपणें वळते तोंच दार धाडकन् बंद करण्याचा आवाज आमच्या कानीं आलाच.

"कशी काय वाटली तुमची नवी शेजारीण ?" मी तिला विचारलें.

"चांगली दिसते की,—दिवसभराच्या दगदगीमुळे अगदी थकून गेल्यासारखी झाली होती बिचारी.—अजून सारंच घर लागायचं आहेना त्यांचं,–म्हणून."

"हं ! म्हणूनच, मला वाटतं, त्या सद्गृहस्थानं मला बाहेरच तिष्ठत उभं ठेवलं एवढा वेळ !——"

"खरंच की !–काय बाई तरी विचित्रपणा ! घर जरी लागलेलं नसलं म्हणून का कोणी असं करतं ? इश्श !–पण ती बाई मात्र तशी वाटली नाही मला."

"हं. ह्या पहिल्याच भेटींत काय कळणार तेवढंसं ?"

"आपल्या दूधवाल्या भैयाला सांगितलं पाहिजे उद्या त्यांच्याकडे जायला." माझ्याकडे तिचं लक्ष नव्हतं हें स्पष्टच दिसत होतं.

* * *

त्या आमच्या पहिल्या भेटीच्या दिवशीं मी आमच्या त्या शेजाऱ्याला आमच्याकडे येण्याबद्दल आमंत्रण करून आलों होतों. पण त्याकडे त्याने विशेष लक्ष दिलेलं कांही मला दिसलं नाही. आठपंधरा दिवसां-नंतर, अशा एका रविवारीं, सौभाग्यवतीचा आग्रहच होता म्हणून मी त्या उभयतांना आमच्याकडे चहाला बोलावलं. अन् ते दोघे आलेहि. पण जो कांही अर्धा पाऊण तास त्यांचा आमच्या घरांत गेला, त्या सबंध वेळांत तो गृहस्थ मोकळेपणाने माझ्याशीं फारसं असं कांही बोलला नाहीच. सारा वेळ मलाच एकतर्फी संभाषण सुरू ठेवावं लागलं होतं, आणि तो आपला नुसता जुजबी 'हो', 'नाही', सारखीं प्रत्युत्तरं देत बसला होता. त्याची बायको आंत स्वयंपाक घरांत जाऊन बसली ती कांही बाहेर झाली नाही.

कसाबसा चहा फराळ आटोपला, आणि त्या गृहस्थाला सुटका झाल्यासारखा आनंद वाटल्यासारखा होऊन तो बायकोसह घरीं निघून गेला.

ह्या प्रकारानंतर मीहि पुन्हा त्याच्याशीं लगट वाढविण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. रस्त्यावरून जातांयेतांना चुकून भाकून कधी तरी त्याच्याशीं दृष्टि-भेट झालीच, तर हसल्यासारखं करून हात वर उचलायचा आणि पुढे चालूं लागायचं एवढाच आमचा संबंध.

पण आम्हां पुरुषांमधे जरी हें असं असलं तरी आमच्या दोघांच्या बायकांच्या मधे मात्र मैत्री झपा-ट्याने वाढत होती, हें खरं. त्या संबंधीचा मला वारंवार आमच्या सौभाग्यवतीकडून तपशील कळायचा, आणि त्यामुळे त्या मद्रासी गृहस्थाबद्दल जी लहानशी अढी माझ्या मनांत घर करून बसली होती ती दूर होण्याकडे जरी त्याचा परिणाम झाला नाही तरी, माझ्या बायकोच्या एकऊकोंड्या जीवनांत हा एक विरंगुळा सापडला म्हणून तिच्यासाठी मला समाधान वाटत होतें. असेच दिवस जात होते, आणि हळू हळू मी त्या गृहस्थाचा विक्षिप्तपणा "मनुष्य-स्वभावाचा एक मासला" ह्या सदरांत घालून मोकळा झालों होतों.

जसजसे दिवस जाऊं लागले, तसतसा मला त्या जोडप्याविषयी कांही नवीन–नवीन गोष्टी–अर्थात् आमच्या सौभाग्यवतीच्या मार्फतच कळूं लागल्या.

त्या गृहस्थाची ती वटमोगऱ्यासारखी गुबगुबीत बायको वृत्तीनं अत्यंत खेळकर, हसरी, प्रसन्न अशी

होती. पण तिची ही स्वभावाची प्रसन्नता उष्णता-मापक-यंत्रांतल्या पाऱ्याप्रमाणे नेहमी वाढणारी आणि कमी होणारी असल्याचें आम्हाला दिसून आलें. धंद्या-निमित्त मधून मधून तिच्या नवऱ्याला बाहेरगावीं जावें लागत असे, आणि तो गावीं नसला, की हिची प्रसन्नता अगदी फुलून आल्यासारखी व्हायची. मग ती दिवस-दिवसभर आमच्या घरीं रहायची. मी ऑफिसांत गेलों रे गेलों, को ती आमच्या घरीं हजर आणि माझी घरीं यायची वेळ झाली की त्यापूर्वी पांच-दहा मिनिटेंच ती आपल्या घरीं निघून जायची. आणि अशा प्रसंगीं त्या दोघी मैत्रिणींचं खूपच मेतकूट जमायचं. पण नवरा दौऱ्यावरून गावीं परत यायची वेळ झाली, की तिच्या त्या अवखळ प्रसन्नपणाला ग्रहण लागल्यासारखं वाटूं लागे. तो गावीं असला की अष्टौप्रहर दारें-खिडक्या बंद करून स्वतःला व स्वतःच्या त्या बिचाऱ्या बायकोला घराच्या आंत बंद करून ठेवी, आणि ह्या काळांत मग चुकून माकून ती कधी आमच्या घरीं आलीच तर दहा-पांच मिनिटांपुरती, धावत-पळत, भीत-चाचरत ! येते न येते तों लगेच पुन्हा घरीं परत निघून जायची.

सर्वसाधारणपणें बायकांना जशा प्रकारची संसा-राची हौस असते तशी हौसहि तिच्या ठिकाणीं भरपूर होती. मद्रासी पद्धतीचे अनेक रुचकर खाद्य-पदार्थ करायला तिने माझ्या बायकोला शिकवले होते, आणि तिच्यापासून आपल्याकडचीं अनेक पक्वान्नं कशीं करायचीं तीं ती स्वतः शिकली होती. वीणकामांत तिची प्रगति अगदी वाखाणण्यासारखी होती. रूपाने नीटनेटकी तर ती होतीच; पण कपडेलत्ते, दागदागिने इत्यादि गोष्टींच्या बाबतींतहि तिचा नवरा तिला कांही उणें पडूं देत नसावा, हें स्पष्ट दिसत होतें. तिच्या-संबंधी अनेक मजेच्या गोष्टी मला आमच्या सौभाग्य-वतीकडून ऐकायला वरचेवर मिळत.

—पण त्या दिवशीं जी गोष्ट मला कळली, ती ऐकून मात्र त्या मद्राशाबद्दलची माझ्या मनांतली अढी अगदी पक्की होऊन बसली. त्या दिवशीं माझ्या बाय-कोने मला सांगितलें,—"ऐकलंत का ?—अहो, तिचा नवरा तिला बिचारीला म्हणे मारतो.—"

"काय म्हणालीस ?—मारतो ? तिचा नवरा ?" मी आश्चर्याने विचारलं.

"हो चांगला पिटून काढतो बिचारीला, म्हणे."

"छट् ! कांही तरीच."

"कांही तरीच काय ? मी प्रत्यक्षच, आपल्या डोळ्यांनी पाहिलं ना,"

"म्हणजे?"

"आज तुम्ही कचेरींत निघून गेलां त्यानंतर मी घरांतली आवरसावर केली, अन् वाट पहात बसलें. म्हटलं, ती येईल आता—"

"तिचा नवरा बाहेरगावीं गेला आहे की काय ?"

"हो तेंच तर सांगतें आहे. तो गेला होता दौऱ्यावर आजच सकाळीं साडेनवाच्या गाडीने आला परत—पण मला कांही हें ठाऊक नव्हतं. मी आपली तिची वाट पाहिली कांही वेळ, अन् मग, आपणच जावं तिच्याकडे, अशा विचाराने तिकडे गेलें अन् पाहतें तर काय ? स्वयंपाक-घरांत सारं कांही जसचं तसं पडलेलं. अन् पलीकडे, माजघरांत, ही आपली, एका सुखवाशीवर डोळे मिटून पडलेली ! केस सारे अस्ताव्यस्त झालेले. अंगावरचे कपडेसुद्धा धड ठिकाणावर नाहीत. तोंड अगदी सुकून गेलेलं—मला कससंच वाटलं. मी तिला विचारलं, 'कां ग, बरं नाही का काय तुला ?' अन् तितक्यांत माझं लक्ष गेलं तिच्या कपाळाकडे. ह्या इथे, उजव्या भिवईच्या वर चांगली बोटभर लांब, चरचरीत खोक की हो पडली होती ! —"

"अरेच्या ! —"

"मी म्हटलं, झालं तरी काय ? अन् चौकशी सुरू केली. सुरुवातीला तर ती कांही पत्ताच लागूं देई ना. नुसत्या थापा मारून तिने मला चकवण्याचा देखील प्रयत्न केला. पण जेव्हा मी अगदी कच्छपींच लागलें, तेव्हा शेवटीं तिने कबूल केलं, नवऱ्याने मारलं म्हणून. अंघोळबिंघोळ आटोपून स्वारी पूजेला बसली होती..."

"म्हणजे ?—पूजा-बीजाहि करतो वाटतं तो ?"

"तर ?—चारी ठाव !—अन् झालं काय, की पूजा करतांकरतांच, रागाने त्याने तिला पुजेंतला अडणीवरचा शंख की हो फेकून मारला !—बिचारीच्या कपाळांतून भळाभळा रक्त वहायला लागलं !—बरं तर बरं. नाही तर डोळाच जायचा तिचा ! बिच्चारी !—"

"पण, तिच्यावर असा हात टाकण्याजोगं झालं तरी काय ?"

"तें वरीक मला तिने कळूं दिलं नाही."

"तो घरींच होता का, तूं गेलीस त्या वेळीं ?"

"तेवढीच खैर झाली बाई ! तो गावाहून परत आला. त्यानंतर स्नान, पूजा वगैरे करीत बसला, अन् पूजेच्याच वेळीं हा प्रकार ! त्यानंतर पूजा आटोपून अर्धापाऊण तासानेच पुन्हा कामासाठी कुठे बाहेर गेला म्हणे,–न जेवतांच."

"काय तरी विचित्र माणूस !"

"बरं, तसं म्हणावं तर ती कांही स्वभावाने भांडकुदळ आहे असं नाही. कधी तोंडाला तोंड द्यायची नाही की नवऱ्याच्या मर्जीविरुद्ध इकडची काडी तिकडे करायची नाही. आणि तरी हा प्रकार !–"

"आश्चर्य आहे !—"

"अन् म्हणे, हा कांही आजचाच प्रकार आहे असं नाही. शेवटीं बिचारीनं सारंच कबूल करून टाकलं माझ्याजवळ—तो म्हणे तिला असं पुष्कळदा मारतो. घरांतली लाज बाहेर उघड्यावर कशी मांडायची, म्हणून जगाला हें कळलं नव्हतं आजपर्यंत, एवढंच. पण तिला नवऱ्याकडून मार–हाण हा नित्याचाच प्रकार आहे म्हणे !—"

"अरे, अरे !

* * *

हा प्रकार घडला त्या गोष्टीला पांच–सातच दिवस लोटले असतील.

रात्री साडे–आठ, नऊ वाजण्याचा सुमार असेल. आमचीं जेवणं नुकतींच आटोपलीं होती. सौभाग्यवती स्वयंपाकघरांत आवरसावर करण्यांत गुंतली होती. बाहेरच्या खोलींत मी आरामखुर्चीवर पाय तण्णावून, सुपारी चघळीत, कुठल्यातरी कादंबरीचीं पानें चाळीत पडलों होतों. अशांतच, दारावर अचानकपणें 'टक्, टक्' आवाज झाला. पुस्तक बाजूला सारून मी पाहूं लागलों, तों तो मद्रासी गृहस्थ दारांत उभा ! त्याचे केस विस्कटलेले होते. डोळे भकास दिसत होते. शर्टच्या गुंड्या उघड्या होत्या, आणि त्याची मुद्रा पराकाष्ठेची उदास आणि केविलवाणी दिसत होती. त्याचें तें रूप पाहून मी मनांत चरकलोंच. तो आपल्या बायकोला मारतो ही गोष्ट कळल्यापासून माझ्या मनांत त्या माणसाबद्दल एक प्रकारची घृणा घर करून बसली होती. पुन्हा कधी त्याच्याशीं बोलायचंसुद्धा नाही, भेटला तर औपचारिकपणाने नमस्कार–चमत्कारांचेंसुद्धा अगत्य न दाखवितां सरळ, तोंड दुसरीकडे वळवून निघून जायचें, असा मी आपल्या मनाशीं निश्चय सुद्धा करून टाकला होता. पण त्याची त्या वेळची मुद्रा पाहून माझा निश्चय मनांतल्या मनांत विरघळला. उलट मला त्याच्याबद्दल एक प्रकारची कीवच वाटायला लागली. मी त्याला आंत बोलावलें व खुर्ची बसायला दिली.

पण, मी खुर्ची पुढे करण्याची देखील वाट न पाहतां, तो माझ्या शेजारीं धप्कन येऊन बसला. जणू काय त्याच्या पायांत उभे राहण्याची शक्तीच उरली नव्हती. मी पाहिलें, त्याचे हात, पाय थर–थरा कापत होते. काय प्रकार असावा, त्याची मला कल्पनाच करतां येईना. मी विचारलें, "कां हो ?–कांही विशेष ?"

"हो. एक विशेष कामासाठीच मी असल्या भलत्या वेळीं आलों आहें तुमच्याकडे !—" घसा खाकरून तो म्हणाला.

"बोला, काय काम आहे ? "

"काम म्हणजे असं,......" आपल्या मनगटावरचं सोन्याचं घड्याळ काढून माझ्यापुढे टेबलावर ठेवीत तो म्हणाला, "–हें माझं घड्याळ,–सोन्याचं आहे, झेनिथचं. नुकतंच चार महिन्यापूर्वी मी एकशें नव्वद रुपयांना घेतलं आहे. रिसीट देखील आहे माझ्याजवळ. हें घड्याळ तुम्ही घ्या, अन् मला शंभर, निदान पाऊणशें रुपये तरी अगदी आत्ताचे आत्ता द्याच. —अतिशय निकड आहे मला पैशाची.—अंहं. थांबा. मला बोलून टाकूं द्या सारं. अडवूं नका मला.— हें घड्याळ मी तसं कोणाला दिलं नसतं. तिने–माझ्या बायकोने आमच्या लग्नाचा वाढदिवस म्हणून मला तें भेटीदाखल दिलेलं आहे.—पण आज, आत्ता, ह्या क्षणीं मला पैशाची निकड आहे, अन् ह्यावाचून मला

(पुढील मचकूर पान ५२ वर)

पक्कीं घरें !

प्रा. पां. कृ. सावळापूरकर

'कां न सदन बांधावें की त्यांत पुढे विळें करिल घूस', असें मोरोपंत एका ठिकाणीं दृष्टान्तादाखल म्हणाले. कारण त्या काळीं प्रत्येक घरांत घूस विळें करूं शकेल अशी सोय होती. आता नव्या काळांत घूस या प्राण्याचें अस्तित्व असलें तरी त्याला मारण्याचे नवनवीन उपाय तर निघालेच आहेत; पण त्यापेक्षाहि त्या प्राण्याचा पराक्रम अजीच कुंठित होऊन जाईल अशीं पक्कीं घरें बांधण्याची किमया वास्तुशास्त्र-विशारदांनी शोधून काढली आहे ! पक्कीं घरें हा आजच्या सुधारणेचा महाविष्कार आहे. पुरोगामित्वाचें सर्टिफिकेट हवें असेल तर माणसानें पक्क्या घरांत राहिल्यावाचून गत्यंतर नाही.

पूर्वी श्रीमंतांचीं घरें त्यांतल्या त्यांत काय तीं पक्कीं असत. म्हणजे तीं सुमारें एक दीड शतक कशीं बशीं टिकून राहात. सामान्यांचीं घरें दर पिढीस बहुधा थोडीं बहुत नवीं करावीं लागत. अर्थात् या खटाटोपाचा खर्चहि दर पिढीला झेपेल असाच माफक असे. सध्या सारें तंत्र बदललें. नवनव्या संस्कारांनी आम्ही घरांचा हा पक्केपणा संपादन करूं लागलों. कच्चें घर म्हणजे मुख्यत: मातीचें. आणि पक्कें घर म्हणजे दगड, मोठ्या विटा, लोखंड आणि यांना एकत्र धरून ठेवणारें सिमेंट यांनी बनविलेलें. मातीच्या घरांत थोडा ओबडधोबड-पणा अपरिहार्य आहे. उलट सिमेंटाच्या घरांत भूमितीच्या कोनांची अंशप्रमाण साधणूक करतां येते, तऱ्हेतऱ्हेचे आकार आणतां येतात, आकर्षकता वाढवितां येते, सौंदर्यशास्त्र आणि लालित्य यांच्यांत भर टाकतां येते; किंबहुना आधाराधेय भावाचा विपर्यय होऊन आधेयानेच आधाराला महत्त्व येतें ! !

आपण बांधत असलेली वास्तु चिरकाल टिकावी हा माणसाचा हव्यास. ती शक्य तर अमर व्हावी असेंहि त्याला मनांतून वाटतें. पण 'जातस्यहि ध्रुवो मृत्युः' हा न्याय पक्क्या घरांसहि लागू आहे याची त्याला जाणीव असल्यामुळे त्याचा मृत्यु जितका टाळतां येईल तितका टाळावा अशी त्याला तळमळ लागली असते. वास्तव त्यांत जितका म्हणून पक्केपणा आणतां येईल तितका आणण्याचा तो प्रयत्न करतो. बहुधा असें घर बांधणारी एक पिढी तें घर बांधण्यांत आणि त्याचें कर्ज निस्तरण्यांत खलास होते. तें कर्ज पुरें फिटलें तर पुढील पिढीस घराचा निर्वेध उपभोग घ्यावयास मिळतो. कर्ज राहिलेंच तर घर सावकाराच्या घरांत गेलेलें त्याला पाहावें लागतें. क्वचित् या घरवाल्याच्या दुसऱ्या तिसऱ्या पिढीच्या माणसाचे कुळ-कुळाचार आउट हाऊसमध्ये किंवा मोटर गॅरेजमध्ये व्हायला लागून मुख्य बंगल्यांत एखादा प्रतिष्ठित भाडोत्री विराजमान झालेला दिसतो ! ! हें तर असोच, पण हिंदुस्थानच्या हवामानाच्या दृष्टीनें या सिमेंटी त्रंगल्यांचा पक्केपणा राहणाराला शक्य तितकें कच्चें करीत असतो. हिवाळ्यांत अति थंड, उन्हाळ्यांत अति गरम, पावसाळ्यांत दमट अशी या घराची स्थिति असल्यामुळे, शेगड्या, वाळ्याच्या ताट्या व विजेचे पंखे टेबलखुर्च्या, स्वयंपाकघरांत देखील जोड्यांचा व्यवहार, हें सर्व आलेंच ! एक पाप झाकण्यास दुसरें पाप करावें त्याप्रमाणे एका गैरसोईचें निराकरण करण्यास अन्य उपाधि लावून घ्याव्याच लागतात. पाश्चात्यांच्या तंग पोषाखाचें अनुकरण करून आपण येथील हवामानांत तंग येऊं लागलों, तसाच प्रकार कांही अंशीं घरांच्या बाबतींतहि होत आहे की काय अशी शंका येते.

पूर्वी फॅशन्स किंवा टूम यांचें आयुष्य बरेंच दीर्घ असे. आता या फॅशन्स भराभर बदलूं लागल्यामुळें

थोडया काळापूर्वी नवी वाटणारी वस्तु अचिरात् जुनी होते व टाकाऊ वाटूं लागते. आणि नव्या ढबीची नवी कोरी करकरीत वस्तु आपलें मन आकृष्ट करून घेते! कालांतराने तीहि जुनी होते. नागपूर शहरांत १९२० पूर्वी वसलेली धनतोली व १९५० नंतर वसलेली रामदास पेठ यांत किती अंतर पडलें आहे तें पाहा. बरें, टाकाऊ वाटूं लागलेली वस्तु लहानसहान असती तर बदलली असती. 'पक्कें घर 'च टाकाऊ वाटूं लागलें तर तें कसें वदलणार! चरफडत तेथेंच राहावें लागतें, त्याला इलाज नाही.

हीं पक्कीं घरें पाहिलीं म्हणजे मला असें वाटतें की भूमातेच्या पोटांत वसत असलेल्या मृदुता, वात्सल्य, आर्द्रता, सर्वसंग्राहकता, प्रत्यास्थता, ऋतुकालोद्भव आपत्तीची प्रतिकारक्षमता व आनंदवर्धकता इत्यादि उत्तमोत्तम गुणांचा अव्हेर करून आम्ही करंट्या मानवांनी तेथील फक्त कठोरता आणि रुक्षता याच दुर्गुणाचा आपल्यासाठी कायमचा स्वीकार केला आहे, इतका की या मातेच्या चरणावर डोकें ठेवलें तरी तिने कठोरतेने तेथे वेंडच आणावें!! अशा नित्य कठोरतेचा परिणाम मनावर न झाला तरच नवल. चिरेबंदीने भूमातेचा रस आणि गंध यांसहि आम्ही मुकतों.

'मृत्तिका खणोनि घर केलें। तें माझें ऐसें दृढ कल्पिलें। परी तें बहुतांचें हें कळलें। नाहीच तयासी' असे उद्गार श्रीसमर्थांनी घरासंबंधी काढले आहेत. त्याचप्रमाणे मूषक, पाली, मक्षिका, मुंगळे, मुंग्या, ढेकूण, मांजर, इतकेंच नव्हे तर दासी, पाहुणे आणि मित्र हेहि त्या घरावर 'आमुचें घर' म्हणून हक्क सांगतात व तुमची मालकीच मुळांत उधळून लावतात असेंहि त्यांनी सार्थ वर्णन केलें आहे. आजच्या पक्क्या घरांनाहि हें वर्णन लागूं पडतेंच, किंबहुना ज्या देहासाठी हीं घरें बांधावयाचीं त्या देहावर देखील किडयांची सत्ता चालते, असें त्यांचें कथन आहे. अशा नाशवंत घरांचा निषेध करून 'देह परमार्थी लावलें। तरीच याचें सार्थक झालें' असा त्यांनी उपसंहार केला आहे. यांतील 'परमार्थ' याचा व्यापक अर्थ येथे अभिप्रेत आहे.

वरील मजकुरांतील समर्थांचा उपसंहार सोडला तर इतर विचार हा अगदी वरवरचा झाला. याच्या पलीकडे गेलें म्हणजे अनेक महत्त्वाचे विचार मनांत येतात. खरोखरच पक्कें आणि कच्चें यांची व्याख्या तरी काय करावयाची? या संज्ञा सापेक्ष आहेत म्हणून घरांचा पक्केपणा वा कच्चेपणा मनुष्याच्या आयुष्याच्या तुलनेनेच मापला पाहिजे. आपलें डोकें फोडावयाचें असेल तर तें फूट दोन फूट दगडावर आपटलें काय किंवा प्रत्यक्ष हिमालयावर आपटलें काय, सारखेंच फुटेल! हिमालय झाला म्हणून तो कांही जास्त प्रहार करणार नाही. त्याप्रमाणे आपल्या आयुष्यांत पुरणारा घरांचा पक्केपणा आपल्याला बस्स झाला, त्यानंतर असलेला पक्केपणा हा आपला नव्हे; त्याचा आपणाला कांही उपयोग नाही. त्यासाठी घेतलेली मेहनत आणि केलेला खर्च हा आत्मिक आणि राष्ट्रीय अपव्यय होय असें कां मानूं नये? हें वाचून माझे मित्र म्हणतील, "अहो, तुमची दृष्टि फारच आकुंचित आहे. तुम्ही केवळ स्वतःपुरतें पाहातां. पुढील पिढी आपली कोणी नव्हे काय? मग 'संतति' या नांवाची सार्थकता तरी कोणती? आपल्या वास्तूमध्ये आपल्या नंतरच्या अनेक पिढया नांदाव्या ही इच्छा स्वाभाविक नाही काय? हें जर खरें तर घरांचा पक्केपणा दूषणीय कसा ठरतो तें कळत नाही!" मला या आक्षेपाची जाणीव आहे. आपल्या नंतरच्या पिढीने सुखाने निर्वेधपणे नांदावें अशी इच्छा त्यांच्याप्रमाणे मलाहि आहे. पण त्या बाबतींत सर्वांगांनी आपला प्रयत्न असता तर मला हा लेख लिहिण्याचें कारणच पडलें नसतें. तो तसा नाही हीच मोठी दुर्दैवाची गोष्ट मला वाटते. अन्य बाबतींत दुर्लक्ष करून घराच्या बाबतींत तेवढी काळजी दाखविण्याचा उद्योग मला भयावह वाटतो.

बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य या चालू युगाच्या दोन महान् देणग्या होत. या जशा उपयोगी आहेत तशा त्या भयावहहि आहेत. एका बाजूला आम्ही याचा असा अतिरेक केला आहे की "**आमच्या** बुद्धीस पटेल तेव्हाच ती प्रमाण मानूं. **आमच्या** व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड प्रत्यक्ष बापालाहि येऊं देणार नाही. **आमची** जोडीदारीण **आम्ही** निवडून काढूं. स्त्रीपुरुष या पलिकडे कोणतीहि बंधनें **आम्ही** पाळणार नाही. श्रद्धा, पूज्यबुद्धि, भावना, मानबिंदू इत्यादि **आम्ही** साफ मानणार नाही." या सर्व प्रकरणीं असणारा हा '**मी**'

किंवा 'आम्ही' हा सर्वश्रेष्ठ, प्रमादरहित, दिव्य असा मानला आहे हें विशेष होय. एखाद्या बापानें आपल्या मुलाचें कल्याण व्हावें या बुद्धीने स्वतःला पवित्र वाटणारे संस्कार त्यावर केले, किंवा अमुकच प्रकारचें तूं आचरण कर असें 'कर्मकांड' त्याच्या मागे लावून दिलें की तो बाप मुलाच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येतो असें मानावयाचें. हा बाप आपल्या मुलाला त्याच्या लहानपणापासून 'डॉग्मॅटिक' करीत आहे, बिघडवीत आहे हा त्याच्यावर आरोप येतो. मुलगा मोठा झाल्यावर त्याच्या बुद्धीला पटेल तसें तो आचरण करील. बापाचेंच पारंपरिक मत त्याने घ्यावें ही सक्ति कोठली? बापाने निवड केलेल्या व लहानपणीं लग्न लावून दिलेल्या वधूशींच त्याने काय म्हणून संसार करावा? बापाचाच जन्मजात धंदा मुलाने चालविला पाहिजे अशी तरी सक्ति समाजाने काय म्हणून करावी. ज्याच्या त्याच्या प्रवृत्तीप्रमाणे ज्याला जो धंदा आवडेल तो त्यांनी 'गुणकर्मविभागशः' करावा. तूं अमुकच कर अशी आज्ञा करण्याची, व्यास, मनु वा याज्ञवल्क्य यांना कोणी उठाठेव सांगितली? इत्यादि विचार आपल्या परिचयाचे आहेत. वडील माणसांनाहि वाटतें, 'आपण मुलाच्या कारभारांत न पडलेलें बरें; त्याला शिकवून मोठें केलें म्हणजे आपली जबाबदारी संपली! (यांत शिकविणें म्हणजे साक्षर करणें. शिक्षणाचा सुसंस्कार हा अर्थ येथे घ्यावयाचा नाही. कारण 'सु'च्या बाबतींतच मतभेद संभवतात.) पुढे त्याला जें करावयाचें तें तो करील. आपल्या म्हातारपणीं त्याने आपल्यास लाथा मारल्या तरी त्या सोसल्या पाहिजेत; कारण त्याला काळाचें साहाय्य आहे!'

ही उभयपक्षी विचारसरणी जागतिक प्रगतीला हितावह असेल किंवा अहितावह असेल. हें ज्याच्या त्याच्या विचारसरणीवर अवलंबून आहे. प्रस्तुत मला त्याचें कर्तव्य नाही. मला या ठिकाणीं जें कटाक्षाने म्हणावयाचें आहे तें असें की एका बाजूला मतांच्या व वागणुकीच्या बाबतींत पुढील पिढीस पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें; पण दुसरीकडे त्यांच्याकरिता--त्याच्या नव्हे तर स्वतःच्या आवडीने अशीं पक्कीं घरें बांधून ठेवावयाचीं की मुलाला आपल्या मताप्रमाणे कोठे केवळ खिळा ठोकण्याचीहि उजागरी असूं नये! सारें चिरेबंदी काम; एकदा बांधलें की बांधलें, भुसभुशीतपणा कोठेहि नाही!! जाणतेपणीं आपल्याला पाहिजे असेल त्या धर्तीचें मुलगा घर बांधील; त्याच्यावर आपण या बाबतींत काय म्हणून सक्ति करावी, असा विचार हीं पक्कीं घरें बांधणारांनी कां करूं नये हें समजत नाही. आणि बाह्य घराच्या बाबतींतील सक्ति त्यांना जर हितावह वाटते तर अन्य रीतीने सुखी जीवनाचे नियम मुलावर सद्बुद्धीने लादायला वडिलांनी काय म्हणून माघार घ्यावी याचाहि उलगडा होत नाही!

विटासिमेंटांचें बांधलेलें जें तेंच घर हें तरी बरोबर आहे काय? हा घराचा अति स्थूल प्रकार झाला. उज्ज्वल आणि पवित्र आत्म्यांच्या वसतीने त्या त्या जागेला घरपणा येत असतो. 'न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते' हें गृहस्थाश्रम्याचें घर तर प्रसिद्धच आहे. या घरांच्याकडे आपलें खरोखर लक्ष आहे काय? आत्म्याचें परमेश्वरनिर्मित घर जें शरीर त्याच्या तरी पक्केपणासाठी आपण कितीसा खटाटोप करतों? पक्कीं घरें बांधायचीं असतील तर तीं आत्म्यासाठी बांधायला नकोत काय? 'अभयं सत्वसंशुद्धि' इत्यादि दैवी संपत्तीला राहावयाला या जगांत पक्कीं घरें मिळेनाशीं झालीं आहेत! त्यांना जागा पाहिजे आहे. आमच्या राष्ट्रांत त्यांना पूर्वी शेंकडो वर्षें नांदतां आलें. कलिप्रभावाने त्यांच्या सदनांचा उच्छेद झाला आहे. त्यांना कोणी घरें बांधून देईल काय? 'अनुद्वेकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च तत्' असें वाङ्मयतप आचरण करणाऱ्या जिव्हांना आता पूर्वीसारखीं घरें मिळत नाहीत. कोणी विश्वकर्मा त्यांची स्थापना पक्क्या घरांत करील काय? आम्हांला अंतःकरणाला घरें पाडतां येतात. अंतःकरणासाठी घरें बांधतां येत नाहीत!!

सर्व प्रकारच्या गुणप्रकर्षाला राहतां येण्यासाठी ज्या पक्क्या घराची आवश्यकता आहे त्याचा मालमसाला कोठे मिळेल याचा शोध आता पुनः जारीनें केला पाहिजे. आमचें सिमेंटचें घर अमुक इतकीं वर्षें टिकावें असें वाटतें ना? त्या प्रमाणे माझ्या राष्ट्राचें व सत्वगुणाचें घर अनंत कालपर्यंत टिकावें अशी विवंचना आता लागलीच पाहिजे. ज्यांना ही विवंचना

पूर्वी होती त्यांनी या बाबतींत उपाययोजना सांगून ठेविली आहे. ती पाहिली पाहिजे. नवे चिंतक जी उपाययोजना सुचवितात त्याचाहि विचार झाला पाहिजे.

जगाच्या अंतापर्यंत टिकेल अशा कांही शाश्वत तत्त्वांची बांधणी व्यासाने महाभारतांत, भगवंतांनी गीतेंत, बुद्धाने धम्मपदांत वा मनूने आपल्या स्मृतींत केली असली तर ती आजहि अस्तित्वांत असलीच पाहिजे. कदाचित् तपशील वा बाह्य आविष्कार बदलला असेल पण तत्त्व अमरच राहील. म्हणजे आपल्याला पाहिजे असलेल्या पक्क्या घराचे खांब, तुळया हें सारें जुनेंच आहे असें दिसून येईल. नवा चिंतक झाला तरी शाश्वत तत्त्वांत काय बदल करणार? मातीविटांचीं घरें बांधणारा मिस्त्री जुनें घर साफ पाडून त्या जागीं पूर्ण नवें घर वांधूं शकतो; तरीहि त्याला पायाभूत भोकें मूळच्याच भूमिकेवर पाडावीं लागतात. या बदलाला यद्यपि 'क्रांति' इत्यादि आकर्षक नांवें आपण दिलीं तरी त्या नव्यांतहि जुनें बीजभूत असतेंच. मग आत्मा, सद्गुण, राष्ट्र इत्यादींसाठी पक्कीं घरें हवीं असलीं तर तीं पूर्णतया नवीं कोठून येणार? जुनीं घरें जर 'अदाघ्य अक्लेद्य' अशाच स्वरूपाचीं अनायासें असतील तर आपण पाडून तीं कशी काय पडणार? फार तर आपण पाडण्याचा प्रयत्न करूं. कोठें मऊ भागाला थोडा वाकहि आणूं. लोक आपणाला सुधारक म्हणतील; या प्रयत्नांत मेलों तर हुतात्मा पदवी मिळेल; हें सारें खरें असलें तरी जुन्याचें पूर्ण निखंदन झालें असें होणारच नाही. आमच्या वंशजांसाठी टिकावीं अशीं सिमेंटचीं घरें जशीं आम्ही बांधतों तशीं आमच्या विचारी पूर्वजांनी त्यापेक्षा शतपट पक्कीं असणारीं व अनंत काळ टिकणारीं अशीं विचाराचीं, तत्त्वाचीं व यमनियमाचीं घरें आमच्या-करिता बांधून ठेविलीं आहेत. वंशजांना खिळाहि ठोकण्याची सोय न ठेवण्याचा कृपणपणा या आपल्या दिव्य पूर्वजांनी केला नाही. एकतर त्यांत सहसा अपुरेपणा आढळावयाचा नाही, आणि आढळलाच तर तुम्हाला त्यांत आपले अनुभव व विचार यांची भर घालून तीं विस्तृत करण्याचा पूर्ण अधिकार आहे. या घरांत गिलावे व रंगरंगोटी करण्याची किंवहुना मजले चढविण्याचीहि सर्वांना मोकळीक आहे.

म्हणून पक्क्या घरांचा विचारच करावयाचा तर अशा दृष्टीने करावा. सर्वतोपरि कच्चें असणाऱ्या माणसांना कितीहि पक्कीं घरें बांधून दिलीं तरीं तीं त्यांना राखतांहि येणार नाहीत. तेव्हा माणसें प्रथम पक्कीं करा. घरें आपोआपच पक्कीं होतील.

अनुक्रमणिका

लघुकथा

नातें

केशव केळकर

'टांगा आपल्या दाराशीं थांबला का ग?' रस्त्यावरील टांग्याची खडखड ऐकून सावित्रीकाकूंनी विचारलं.

थोरली सून दाराबाहेर आली आणि म्हणाली, 'आपल्याच घरापाशी थांबला बहुतेक.'

'असल्या भलत्या वेळीं कोण पाहुणें आलेय कुणास ठाऊक!' धाकटया सुनेनं तिघींच्याहि मनांतल्या अस्वस्थतेला वाचा फोडली.

आंतल्या खोलींत अंथरुणावर पडलेल्या धाकटया दिराच्या डोक्यावरील बर्फाच्या पिशवींत नवीन बर्फ घालायचा होता. त्या एका कामांत तिघींनीहि आपापले वाटे उचलले होते. मध्यंतरीं हा अडथळा आला. टांगा कुणाच्या दाराशीं थांबला, याचा निर्णय लागेतों तिघींनीहि श्वास अवरोधून धरला होता.

'वासंती, तुझे ते जळगावचे चुलते आले आहेत वाटतं.'

थोरल्या जावेच्या या बोलण्याबरोबरच बाहेर टांगेवाल्याशी चाललेलें बोलणें ऐकूं आलें.

निर्णय लागला होता.

थोरल्या जावेनं भराभरा खोलीभर पडलेले कपडे व केर गोळा केला, आणि ती स्वयंपाकघरांत गेली.

सावित्रीकाकूंनी फोडलेल्या बर्फाचे तुकडे पाण्यांत धुतले. बादली बाजूला सारली आणि त्या पिशवींत बर्फ भरूं लागल्या. धाकटया मुलाच्या कपाळावर त्यांनी हात ठेवला. कपाळ अतिशय तापलें होतें. त्यांचा चेहरा बदलून गेला.

धाकटया सुनेला काय करावें, कांही सुचेना. तिचे चुलते आले होते. तिलाच पुढे व्हायला हवें होतें.

'वासंती, जरा इकडे येतेस कां?' तिच्या चुलत्यांची बाहेरून हाक आली.

ती समोर झाली.

'तुझ्या चुलतीला घेऊन आलोंय बघ. जुनंच दुखणं आहे. शेवटचे उपाय करून पाहायचे. जरा आधार देतेस तिला?'

दोघांचा आधार घेऊन चुलती हळूहळू पावलं टाकीत आंत आली.

आंतल्या खोलींत आल्यावर आईनं उठून 'याना' म्हटलं खरं; पण चुलत्यांना बसायला सांगण्याजोगी जागा उरली नव्हती. आणि चुलतीला तर बिछान्यावर आडवं होणं आवश्यक होतं.

सावित्रीकाकूंचं चित्त भानावर नव्हतं. आजची रात्र सुखरूप पार पडली, की निभवलं, असं डॉक्टर बजावून गेले होते.

धाकटी सून आधाराला दिलेला हात तसाच ठेवून वाट पहात उभी राहृयली.

थोरली सून लगबगीने आंत आली. तिनं कोपऱ्यांत गुंडाळलेली वळकटी घाईघाईनं उलगडली व त्यावरील चौघडी सारखी केली. तशीच ती आंत गेली व तिनं चुलत्यांसाठी आंतून बसायला पाट आणला.

इतक्या वेळांत कुणाचंच कांही बोलणं झालं नाही.

चुलती दम्यानं व प्रवासानं गळली होती. ती लगेच आडवी झाली.

कांही वेळ थांबून चुलत्यांनी आपण होऊन विचारलं,

'आजारी आहे?'

'हो' —सावित्रीकाकू.
'काय ?'
'विषम.'
'कितवा दिवस ?'
'आजचा चौदावा'
'अरे !'

आणि त्यानंतर बराच वेळ शांततेंत गेला.

पुन्हा चुलत्यांनी आपण होऊन सुरुवात केली,

'त्याचं असं झालं, आम्ही आधी कळविणारच होतों, पण वेळेवरच सारं ठरलं; आणि पुन्हा असं झालं की...'

असंच ते अधूनमधून बोलत होते. पण कुणी त्यांना उत्तरं देत नव्हते; थोड्या वेळांत थोरल्या सुनेनं आंतून चहा आणून दिला.

धाकट्या सुनेनं दुसरा कप उचलून चुलतीच्या अंथरुणापाशी ठेवला व ती आंत गेली.

चुलते घाईनं आपला कप संपवून उठले आणि आधार देऊन त्यांनी चुलतीला बसती केली व बशींत चहा ओतून तो तिच्यापुढे केला.

'जेवायचं असेल ना ग त्यांना ?' स्वयंपाकघरांत थोरल्या सुनेनं धाकटीस विचारलं.

'मी तरी काय सांगणार ? उशीरा निघाले असतील, तेव्हा जेऊनच आले असतील.'

'पण विचारायला हवंच ना, तूं स्टोव्ह पेटवते का ? मी चटकन पिठलं भात करतें. नाहीतरी तूंहि सकाळीं धड जेवली नाहीस. सासूबाईंनाहि वळेंच चार घास खायला लावले पाहिजे. त्या आज एक घास न खातां खाटेपाशी बसल्या आहेत.'

'मी त्यांना कितीदा म्हटलं, की तुम्ही निजा म्हणून. पण त्या अगदी ऐकायला तयार नाहीत.'

'खरंच यांच्या निजण्याची ग व्यवस्था काय ?'

'मी तरी काय सांगणार बाई ! आपल्या घरांत ही अशी अडचण, यांनी कळवायला नको होतं कां आधी !' धाकटीच्या मनांत अशा कितीतरी अडचणींचा पाढा वाचला जात होता. त्यांपैकी एक अडचण तिनं सांगितली, 'यांना आपल्या खोलींत दुसरं कुणी निजलेलं अगदी आवडत नाही.' रात्रपाळीहून थकून आले, की त्यांना थोडीशीहि गडबड झालेली सहन होत नाही.'

'बरं तें पाहूं आपण. तूं स्टोव्ह पेटवतेस ना ?' थोरलीनं उत्तर दिलं.

त्यानंतरचा वेळ अनेक गोष्टी उरकण्यांत गेला. चुलतीसाठी साबूदाण्याची लापशीहि करण्यांत आली.

पुन्हा बर्फ फोडण्यांत आला.

मध्यंतरीं डॉक्टर येऊन गेले.

चुलतीचा खोकला त्यावेळीं उसळून आला होता. डॉक्टरांनी जरा रोषानंच विचारलं, 'ह्या कोण ? इथंच निजणार आहेत कां ?'

कुणीच कांही उत्तर दिलं नाही.

थोड्या वेळानी डॉक्टर निघून गेले.

बऱ्याच वेळानं चुलत्यांनी सुरुवात केली. 'प्रथम आम्ही विसूभाऊंकडेच उतरणार होतों. पण तिकडे दवाखाना फार दूर पडतो. टांगे–रिक्शाचे धक्के हिला आता अगदी सहन होईनासे झाले आहेत.'

'हूं'—पुतणीशीं ते बोलत होते.

'उद्या सकाळीं जमलं, तर दवाखान्यांत खोली घ्यायचा विचार अहे.'

'हूं—'

पुन्हा कांही काळ शांततेंत गेला.

सगळं आटोपून थोरली सून बाहेर आली होती. तिनं शांतता भंग केली.

'दवाखान्यांत कोण करणार यांचं ?'

'मग करायचं काय ?'

'दोन दिवस राहूं द्या इथंच. आपण बघूं. अशा स्थितींत त्यांना हलवणं अगदी इष्ट नाही.'

'अं ?' चुलत्यांना काय बोलावं, कांही कळेना.

कांही वेळानं थोरली सून धाकटीला आंत स्वयंपाकघरांत समजावून सांगत होती.

'...अग मलाहि कळतं तें. पण त्यांनाच इतकं चोरट्यासारखं झालंय, मग मी तरी दुसरं काय बोलणार ?'

'तेवढंच धरून बसतील ते. आमचं रक्ताचं नातं

आहे. मी ओळखून आहें त्यांना. दुसरा कुणी असता तर ही सगळी अडचण पाहून आल्या पावलीं परतला असता.'

'असं काय बोलावं ग. कांही झालं तरी तुझ्या नात्याचीं माणसं आहेत.'

'माझ्याच आहेत ना ? तुमच्या तर नाही ? मग झालं.'

तेवढ्यांत सावित्रीकाकूंची घावरल्यागत हाक आली.

दोघीहि लगवगीनं खाटेपाशीं गेल्या.

'पहा नं, कसा करतोय ? डॉक्टरांना बोलावणं पाठवायचं कां ?' त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

'डॉक्टर आत्ताच येऊन गेले ना ?' चुलत्यांनी अनवधानानं विचारलं.

'तुम्हाला बोलवायला नाही सांगत आहें. मी सुद्धा जाईन.' पुतणीनं उत्तर दिलं.

चुलते एकदम चुप बसले.

थोरल्या सुनेला राहवलं नाही, 'तुला काय झालंय् तरी काय ?' तिनं जरा दटावून विचारलं.

खाटेवर त्या क्षणीं खुप जोराची हालचाल झाली, आणि मग वरळणं ऐकूं आलं. दिराला वात झाला होता.

यानंतर मग तिघीहि खाटेला बराच काळ खिळून राहिल्या ! ...

...अशांत एकाएकी चुलतीला खूप मोठी खोकल्याची ढास आली.

खाटेवरील जीव त्यामुळं घावरल्यासारखा झाला.
सावित्रीकाकू रडूं लागल्या.
चुलते कावरेवावरे झाले.
थोरल्या सुनेला कांही सुचेना.
धाकटी सून जोरानं किंचाळून ओरडली,

'अहो, त्यांना उठवून बाहेर न्या की. इथं कुणाचा जीव जायची वेळ आली तरी...' आणि ती स्वतः त्यांना उचलून बाहेर न्यायला निघाली.

आणि मग थोरल्या सुनेला स्वस्थ बसवलं नाही. ती उसळून म्हणाली,

'तुला वेड लागलं आहे की काय ? अशा थंडींत त्या बाहेर गेल्या, तर त्यांचा तरी जीव राहील कां ?'

'कोणता तरी एक जाईल, तर तो माझ्या नात्याच्या माणसांचा जाईल.' आपण काय बोलतों आहोंत, त्याचें भान तिला राहिलें नाही.

'दोघांचाहि जाईल.' थोरली सून संतापानं थरथर कापत बोलत होती. 'म्हणे माझ्या नात्याच्या माणसाचा जाईल. तुझी चुलती आहे अन् आमची कुणीच नाही का ती ! खबरदार पुन्हा असं कांही बोलशील तर—'

आणि तिनं हळूहळू चुलतीला पुन्हा निजती केली.

हळूहळू चुलतीची ढास बंद होत गेली.

खाटेवरील वरळणेंहि कमी कमी होत गेलें.

'आपण झोपायला जा नं आता ?' खाटेवर बसलेल्या आईनं इतक्या वेळानं चुलत्याला समभावनेनं सांगितलं.

थोरली सून आता आपलं अंथरूण पसरून निजायच्या तयारीला लागली होती.

अशांत धाकट्या सुनेनं एकाएकी रडायला सुरवात केली.

'माझ्या नात्याच्या माणसांमुळं उगाच मला बोलयायला नको, म्हणून मी म्हणालें, तर त्यावरून......' आणि ती मुसमुसून रडत होती.

थोरलीनं तें बोलणं एकदोनदा ऐकलं. आणि मग ती स्वतःशीं पुटपुटली, 'नातीं रक्तानं जोडलीं जात नाहीत. ती आंतल्या जिव्हाळ्यानं जोडावीं लागतात.'

आणि असं म्हणून तिनं खसकन् आपल्या डोक्यावरून पांघरूण ओढलं, व ती कुशीवर आडवी झाली.

धाकट्या सुनेचें मुसमुसणें रात्रपाळीहून नवरा येईतों संपलें नव्हतें.

कवि, नागरक व सहृदय

प्रा. गणेश त्र्यंबक देशपांडे, अमरावती

काव्यनिर्मितिबरोबर रसिकवृत्तीहि उदयास येते; आणि कवि व रसिक यांची गाठ पडली की काव्य-चर्चेस सुरवात होते. या दृष्टीने काव्यामागोमागच काव्यचर्चाहि यावयास पाहिजे, व तशी ती आलेली आहेहि.

'काव्यक्रिया' ही एक कला आहे म्हणून काव्य-शास्त्र हें एक कलेचें शास्त्र आहे. कलेचें शास्त्र नेहमी प्रयोगप्रधान असतें. त्याप्रमाणेच काव्यशास्त्रहि आरंभीं प्रयोगप्रधान होतें. भरताच्या नाट्यशास्त्रावरून हें स्पष्ट दिसतें. नाट्यशास्त्रांत नाट्याचें केवळ तात्त्विक विवेचन नाही. नाट्य यशस्वी कसें करावें हें त्यांत सांगितलें आहे. नेपथ्य, पाठ्य, रंग, इत्यादींचे विधि (कल्प) त्यांत सांगितले आहेत. या दृष्टीने नाट्य-शास्त्राला क्रियाकल्पाचा ग्रंथ म्हणून निर्देशितां येईल. 'क्रियाकल्प' हें काव्यचर्चेचें प्राचीन नांव आहे. काव्यचर्चेवरील ग्रंथांतसुद्धा कविशिक्षा व काव्यपठन या दृष्टीने विचार केलेला आढळेल. तो विचार या कलेच्या प्रायोगिक भागाला अनुलक्षूनच आहे. संस्कृतां-तील अनेक शिक्षा ग्रंथ आणि राजशेखराचें "पाठगुणाः" हें प्रकरण या प्रयोगशाखेचेंच द्योतक आहे. काव्यपठन व नाट्यप्रयोग दाखविणें या उपक्रमांतून साहित्यचर्चेचा उदय झाला आहे. श्रोते किंवा प्रेक्षक यांच्यावर काव्य-नाट्यांचा अपेक्षित परिणाम झालेला दिसला म्हणजे काव्यसिद्धि किंवा नाट्यसिद्धि झाली असें मानण्यात येई. भरताने लिहिलेला नाट्यसिद्धीचा अध्याय या दृष्टीने वाचण्यासारखा आहे. श्रोते किंवा प्रेक्षक यांच्यावर परिणाम करण्याच्या दृष्टीने काव्य–नाट्यांत काय असलें पाहिजे हा विचार सुरवातीच्या ग्रंथांत दिसून यतो. या दृष्टीने विवेचन करतांना जरूर तेवढी तात्त्विक चर्चा त्यांत येत असे. त्यामुळेच सुरुवातीच्या ग्रंथांत प्रयोग व तात्त्विक चर्चा यांची सरमिसळ आढळते.

काव्यचर्चेची सुरवात रसिक वृत्तींतून होत असते. आज काव्यचर्चा करणें एका प्रकारें सोपें झालें आहे. नवीन काव्य वाचल्यावर आपण त्यावरील चर्चा नियत-कालिकांतून करूं शकतों. त्याकरिता एकत्र जमलेंच पाहिजे असें नाही. पण पूर्वी एकत्र जमल्याशिवाय ही चर्चा होऊं शकत नसे. त्याकरिता एखाद्या सभेंत जमावें लागे. अशा सभेला "**विदग्धगोष्ठी**" असें नांव होतें. गोष्ठी म्हणजे मंडळ किंवा सभा. त्यावेळचें काव्य-गायन किंवा काव्यचर्चा अशा विदग्धगोष्ठींमधून चाले. विदग्धगोष्ठींमध्ये भाग घेतां येणें हें सुसंस्कृतपणाचें एक लक्षण मानलें जाई. विदग्धगोष्ठींच्या द्वारा एखाद्या कवीच्या काव्याचा व कीर्तीचा हळूहळू प्रसार होई. व शेवटीं त्याचा राजसभेंत प्रवेश होई.

विदग्धगोष्ठींतून काव्यस्वाद घेणारा व काव्य-चर्चा करणारा काव्याचा नेहमीचा रसिक म्हणजे "नागरक" होय. नागरकाच्या आयुःक्रमाचा संस्कृत काव्यावर व त्यायोगें काव्यशास्त्रावरसुद्धा ठसा पडलेला आहे. दुसऱ्या वेळीं निवांत मनाने आपल्या मित्रांसम-वेत 'काव्यगोष्ठींत' काव्यस्वाद घेणारा नागरक काय करीत असे हें पाहिलें म्हणजे साहित्यशास्त्रांतील अनेक गोष्टींचा खुलासा होऊं शकतो.

नागरक म्हणजे नगरांतील सुखवस्तु गृहस्थ. मात्र सुखवस्तु म्हणजे निरुद्योगी नव्हे. ज्याचें विद्याध्ययन

अनुक्रमणिका

झालें आहे, व आपल्या वर्णाला उचित अशा उद्योगाचा स्वीकार करून जो अर्थप्राप्ति करीत आहे, अशा माणसाने विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकारला म्हणजे तो नागरक होई. (गृहीतविद्यः प्रतिग्रहजयक्रयनिर्वेशाधिगतैरर्थैरन्वयागतैरुभयैर्वा गार्हस्थ्यमधिगम्य नागरकवृत्तं चरेत्। का. सू. १–४–१). नागरक म्हणजे विदग्ध मनुष्य (नागरको विदग्धजनः–जयमंगला) सारांश आज ज्याला आपण सुशिक्षित, सुसंस्कृत गृहस्थ म्हणतों तो पूर्वीचा नागरक होय. चातुर्वर्ण्यापैकी कोणीहि गृहस्थ नागरक होऊं शके. वात्स्यायनाच्या कामसूत्र अधिकरण १ अध्याय ४ प्रमाणे नागरकाचा दिनक्रम सामान्यतः असा असे–

असा गृहस्थ नगरांत मूळचाच राहणारा असो किंवा उद्योगामुळे आलेला असो, त्याचें राहणें त्या नगरांतील सभ्य वस्तींत (सज्जनाश्रये) असे. घरासमोर छोटीशी बाग असून घराला सोईस्कर खोल्या असत. त्याचें घर सामान्यतः द्विवासगृह असे, म्हणजें एक शय्यागृह व त्याला लागून बाहेरच्या बाजूला एक आराम करण्याची बैठक असे. उंच तक्तपोशीवर गाद्यागिर्द्या घालून ही बैठक केलेली असे. उंच तक्तपोशीवरील बैठकीच्या शिरोभागीं एक छोटीशी वेदी असून तिच्यावर अंगाला लावावयाचीं सुगंधी चूर्णें, तांबूल वगैरे ठेवलेलीं असत. बैठकीच्या खाली 'पतद्गृह' म्हणजे तस्त पिकदाणी वगैरे असत. खोलींत एका बाजूला खुंटीवर वीणा टांगलेली असे. दुसऱ्या बाजूला एक चित्रफलक ठेवलेला असून त्याजवळच चित्रकर्माचें सर्व साहित्य असे. बैठकीच्या शेजारींच सहज हाताला येईल असें एखादें पुस्तक दिसून येई. तें पुस्तक सामान्यतः स्वकृत किंवा परकृत काव्याचें असे. याशिवाय ठिकठिकाणीं कुरंटमाला म्हणजे कुरंटवृक्षाचीं बनविलेलीं नकली फुलें सुशोभित तऱ्हेने ठेवलेलीं असत. खोलीच्या दुसऱ्या बाजूला विस्तीर्ण बैठक टाकलेली असून तेथे खेळण्याकरिता द्यूतफलक सोंगट्या वगैरे साहित्य ठेवलेलें असे. वासगृहाच्या बाहेर शुकसारिका इत्यादींचे पिंजरे टांगलेले दिसत. आंगणांत पाहिलें म्हणजे बागेमध्ये एका बाजूला प्रेंखादोला म्हणजे झोपाळा व जवळच सायंकाळचें बसण्याकरिता एक ओटा दिसे. सायंकाळीं तेथे बसून मित्रमंडळीसमवेत सरबत वगैरे पिण्याचा कार्यक्रम होई. नागरकाच्या घरांतील सर्व वस्तु जेथल्या जेथे ठेवलेल्या असत. त्या अशा की त्यावरून त्याची विदग्धता दिसून येई. "अनुपरूपस्थाननिवेशनमपि वैदग्ध्यजननम्" असें या बाबतींत यशोधर म्हणतो.

अशा गृहांत निवास करणारा नागरक सकाळीं शुचिर्भूत होऊन, नंतर नीट वेषभूषा करून, व सर्व ठाकठीक जमलें आहे हें आरशांत पाहून आपल्या उद्योगाला निघत असे. माध्यान्हकाळीं आपल्या उद्योगाहून परत आल्यावर फिरून स्नान करून जेवीत असे. भोजनानंतर कांही वेळ शुकसारिकाप्रलाप, तांबुलभक्षण इत्यादींत वेळ घालवल्यावर थोडी विश्रांति घेई व अपराण्हकालीं उचित वेषभूषा करून गोष्टीविहाराकरिता जात असे. या गोष्ठीमध्ये त्याच्या काव्यसमस्या आणि कलासमस्या चालत.

नागरकाचा हा सामान्य दैनिक क्रम असे. पण त्याची खरी विदग्धता नैमित्तिक गोष्ठींमध्ये अधिक दिसून येई. या नैमित्तिक गोष्ठी घटानिबंधन, गोष्ठीसमवाय, समापानक, उद्यानगमन, समस्याक्रीडा या प्रकारच्या असत.

घटानिबंधन म्हणजे देवतेच्या यात्रेच्या निमित्ताने एकत्र येणें. पंधरवाड्याने किंवा महिन्यांतून एकदा नागरक सरस्वतीच्या मंदिरांत एकत्र येत. या जमावाला 'समाज' म्हणत. (पक्षस्य मासस्य वा प्रज्ञातेऽहनि सरस्वत्या भवने नियुक्तानां नित्यं समाजः।) सरस्वती ही नागरकांची विद्या व कला या बाबतींत अधिष्ठात्री देवता. ठराविक दिवशीं (सामान्यतः पंचमीला) ठराविक (नियुक्त) नागरक सरस्वतीभवनांत जमून तेथे वेगवेगळ्या कलांचे कार्यक्रम व स्पर्धा करीत. कुशीलव किंवा नटनर्तक तेथे एखादा नाट्यप्रयोग करून दाखवीत. दुसऱ्या दिवशीं बक्षीस समारंभ होत असे.

गोष्ठीसमवाय हा संमेलनाचा दुसरा प्रकार असे. कलानिपुण अशा वेश्येच्या दिवाणखान्यांत, (त्या काळांत, वेश्येला सामाजिक प्रतिष्ठा होती) किंवा एखाद्या नागरकाच्या घरींच ही सभा बोलावली जाई. तेथे समान वयोविद्येचे व समान अभिरुचीचे नागरक

अनुक्रमणिका

जमत. तेथे विशेषेंकरून काव्यसमस्या व कलासमस्या चालत. त्यांत कलानिपुण वेश्या व विदग्धगणिका सुद्धा भाग घेत. या संमेलनांत कलावंतांचा सन्मान करण्यांत येत असे. याशिवाय मधून मधून समापानक, उद्यानक्रीडा इत्यादि कार्यक्रम होत ते निराळेच.

नागरकांच्या या काव्यसमस्या आणि कलासमस्या केवळ पंडितांपुरत्याच मर्यादित नसत. त्यांत सर्व प्रकारचे लोक भाग घेत. कित्येकदा हे समस्यांचे प्रयोग जनपदांतून सुद्धा करण्यांत येत. म्हणूनच या सर्वांचें वर्णन केल्यावर कामसूत्रकार म्हणतो-—

नात्यन्तं संस्कृतेनैव नात्यन्तं देशभाषया ।
कथां गोष्ठीषु कथयन् लोके बहुमतो भवेत् ॥
या गोष्ठी लोकविद्विष्टा या च स्वरविसर्पिणी ।
परहिंसात्मिका या च न तामवतरेद् बुधः ॥
लोकचित्तानुवर्तिन्या क्रीडामात्रं कार्यया ।
गोष्ठ्या सह चरन् विद्वान् लोके सिद्धिं नियच्छति ॥

नागरकाच्या या सामान्य जीवनाचा परिणाम कवीच्या काव्यरचनेवर व अनुषंगाने काव्य चर्चेवरहि होत असे. कविकीर्ति मिळवूं इच्छिणाऱ्या कवीने कोणकोणत्या गोष्टी पाहाव्यात याबद्दल राजशेखर म्हणतो—

''कविः प्रथमम् आत्मानमेव कल्पयेत्, कियान् मे संस्कारः, क्व भाषाविषये शक्तोऽस्मि, किं रुचिर्लोकः परि वृढोवा, **कदिशि गोष्ठ्यां विनीतः**''

कवीचें काव्य, भाषा व संस्कार यांचा मेळ, तो ज्या गोष्ठींत काव्य वाचून दाखविणार आहे त्या गोष्ठींतील लोकांच्या संस्कारांशीं पाहिजे. कवीने भोजनोत्तर कालीं काव्यगोष्ठी प्रवर्तित करावी असें राजशेखर म्हणतो. तेथे प्रश्नोत्तरभेदन, काव्यसमस्या, धारणा, मातृकाभ्यास, आणि चित्रायोग या कला प्रवर्तित कराव्यात; असें तो म्हणतो. या सर्व गोष्टी कामशास्त्रांतील चौसष्ट कलांत समाविष्ट आहेत. कित्येकदा एकटेच किंवा परिमित परिषदेंत (मोजक्या लोकांची बैठक) आपल्या काव्याची शोधनपूर्वक परीक्षा करावी, कारण रसावेशांत अनेकदा विवेक राहात नाही तो अशा परीक्षेने येतो असें राजशेखर सांगतो. (का. मी. ५२) काव्यगोष्ठीमध्ये भाग घेण्याकरिता नागरकाच्या अंगीं कांही योग्यता यावी लागे. ही योग्यता येण्यास इतर लोकांनासुद्धा काव्यशास्त्राच्या अभ्यासाचा मोठा उपयोग होई. दण्डीने काव्यदर्शांत ही गोष्ट स्पष्ट सांगितली आहे. तो म्हणतो—

तदस्ततन्द्रैरनिशं सरस्वती
श्रमादुपास्या खलु कीर्तिमीप्सुभिः ।
कृशे कवित्वेऽपि जनाः कृतश्रमाः
विदग्ध गोष्ठीषु विहर्तुमीशते ॥

"म्हणून ज्यांना कीर्ति मिळवावयाची आहे त्यांनी रात्रं दिवस श्रमपूर्वक काव्यविद्येची उपासना करावी. जे अशाप्रकारें परिश्रम करतील, त्यांना कवित्वशक्ति पाहिजे तशी न लाभली, तरी विदग्ध गोष्टींमध्ये विहार करण्यास ते समर्थ होतील यांत शंका नाही."

कामसूत्रें व काव्यमीमांसा यांत दिलेल्या अनुक्रमें नागरक व कवि यांच्या दिनचर्येवर विद्वानांचा पूर्णपणे विश्वास बसत नाही. त्यांना ती अतिशयोक्त वाटते. तसें मानलें तरी त्या ग्रंथांतील माहिती अगदीच कल्पित आहे असें म्हणतां येत नाहीं. राजशेखरानें कवीसंबंधी सांगितलेली कांही माहिती भामह, दण्डी आणि वामन यांच्या ग्रंथांतहि सापडते. राजशेखरानें सांगितलेल्या प्रश्नोत्तरभेदनासारखा प्रहेलिका हा प्रकार दण्डीने काव्यादर्शांत दिला असून, या प्रहेलिकेचा क्रीडागोष्ठीमध्ये विशेष उपयोग होतो असें सांगितलें आहे. (क्रीडागोष्ठीविनोदेषु तज्ज्ञैराकीर्ण मन्त्रणे । परव्यामोहनेचापि सोपयोगाः प्रहेलिकाः ॥). राजशेखराने सांगितलेल्या 'धारणा' आणि 'मातृका' यांचा निर्देश कामसूत्रांत तर आहेच, पण भामहाच्या कलाविषयक यादींतहि "धारणामातृका यन्त्रमातृका काव्यलक्षणम्' असा निर्देश आहे. चित्रायोगाचे विविध प्रकार दण्डीने काव्यादर्शाच्या तिसऱ्या परिच्छेदांत व रुद्रटाने काव्यालंकाराच्या पांचव्या अध्यायांत दिले आहेत. या सर्वांचा उपयोग काव्यगोष्ठींत होत असे. या काव्यगोष्ठी म्हणजेच 'विदग्द गोष्टी' किंवा नागरकांच्या गोष्ठी. अशा प्रकारें काव्यगोष्टी या कवींच्या काव्यविवेचनाचें व काव्यप्रसाराचें एक महत्त्वाचे स्थान असे.

काव्यगोष्ठींत कवीचें काव्य गेलें म्हणजे त्याची नेहमी स्तुतीच होई असें नाही. अनेकदा त्याची निंदाहि होतअसे. यासंबंधी राजशेखर कवींना उद्देशून म्हणतो—

जनीयाल्लोकसांमत्यं कविः कुत्र ममेति च ।
असंमतं परिहरेत् मतेऽभिनिविशेत च ॥
जनापवादमात्रेण न जुगुप्सेत चात्मनि ।
जानीयात् स्वयमात्मानं यतो लोको निरंकुशः ॥
गीत सूक्तिरतिक्रान्ते स्तोता देशान्तरस्थिते ।
प्रत्यक्षं तु कवौ लोकः सावज्ञाः सुमहत्यपि ॥
प्रत्यक्षकविकाव्यं च रूपं च कुलयोपितः ।
गृहवैद्यस्य विद्या च कस्मैचिद्यदि रोचते ॥

"आपल्या कृतीला लोकांची संमति कोठवर आहे हें पाहावें, व त्यांची असंमति टाळावी. मात्र त्याचबरोबर केवळ जनापवादाला भिऊं नये. आपण आपली शक्ति ओळखावी. कारण लोक निरंकुश असतात. कवीच्या पश्चात् त्याचें काव्य स्तविलें जातें; व तो देशांतरीं गेला म्हणजे त्याची स्तुति होते. पण महाकवींचीसुद्धा त्याला नेहमी पाहणारे लोक अवज्ञाच करतात. प्रत्यक्ष कवीचें काव्य, कुलस्त्रीचें रूप, आणि घरच्या वैद्याची विद्या हीं कोणाला तरी पसंत पडतात का ?"

पण असें असलें तरी कीर्तीच्या प्रसाराचा तोच एक मार्ग आहे. विदग्ध गोष्टींच्या निमित्तानें काव्य लोकांच्या कानावर जातें. सज्जन त्याचें कौतुक करतात. आणि मुलें, स्त्रिया इत्यादिकांकडून तें मुख-परंपरेनें पसरत जातें. राजशेखर म्हणतो—

वचः स्वादु सतां लेह्यं लेशस्वादपि कौतुकात् ।
बालस्त्री हीनजातीनां काव्यं याति मुखान्मुखम् ॥
कार्यावसरसज्जानां परिव्राजां महीभुजाम् ।
काव्यं सद्यः कवीहूनां च भ्रमत्यना मुखान्मुखम् ॥
पितुर्गुरोर्नरेन्द्रस्य सुतशिष्यपदातयः ।
अविविच्यैव काव्यानि स्तुवन्ति च पठान्ति च ॥

मागे समाज नांवाच्या घटानिबंधनेचें वर्णन आलें आहे. खुद्द राजा जर कवि असेल तर त्याने असे कविसमाज (संमेलनें) बोलवावेत असें राजशेखर मुद्दाम सांगतो. इतकेंच नव्हे तर, काव्यपरीक्षा करण्या-करिता मोठमोठ्या नगरांत राजाने "ब्रह्मसभा" बोलवाव्यात, व तेथे जो कवि प्रवीण ठरेल त्याचा ब्रह्मरथयान व पट्टबंध यांनी सन्मान करावा असेंहि तो सांगतो. काव्यगोष्ठी, कविसमाज आणि ब्रह्मसभा यांच्या द्वारें कवीच्या कवित्वाची परीक्षा व त्याच्या कीर्तीचा प्रसार होई, व योग्यतेप्रमाणे त्याला राजाश्रय मिळे.

संस्कृतांतील साहित्यग्रंथांत अनेक शिक्षाग्रंथ कां लिहिले गेले हें लक्षांत यावयास आता वेळ लागणार नाही. आज आपणास शिक्षाग्रंथांचें महत्त्व वाटत नाही. किंबहुना शिक्षाग्रंथांकडे थोडेसें तिरस्काराने पाहण्या-चीच आजच्या पंडितांची वृत्ति दिसते. पण प्राचीन काळीं काव्याचा प्रसार काव्यगोष्ठींतूनच होत असे, व काव्य ही एक कला म्हणून रसिकसभेंत प्रदर्शित करावी लागे, आणि त्याकरिता कवित्वाचें प्रयत्नपूर्वक शिक्षण घ्यावें लागे ही गोष्ट लक्षांत घेतां शिक्षा-ग्रंथांचें महत्त्व पटतें. अशा प्रकारच्या काव्यगोष्ठीं-मधूनच साहित्यचर्चेवरील प्रारंभींच्या ग्रंथांचा माल-मसाला तयार झालेला दिसतो.

प्रारंभीच्या काव्यगोष्ठींत सहजासहजी काव्या-स्वादाचा आनंद उपभोगणारा विदग्ध नागरक, आणि कवीला अखेर आश्रय देणारा राजा यांच्याहून वेगळा आणि विशिष्ट योग्यतेचा असा काव्याचा एक तिसरा रसिक असे. त्याचें नांव 'सहृदय'. हा काव्यगोष्ठी, कविसमाज व ब्रह्मसभा या सर्वांतून असे. काव्यप्रेमी राजा आणि या सभांचे इतर सभासद यांच्याबरोबर सहृदयहि काव्यानंदाचा उपभोग घेई. पण तो तेवढ्या-वरच थांबत नसे. त्या काव्यास्वादाची उपपत्ति लावण्याचा तो प्रयत्न करी. वाचलेल्या काव्याचा गुणदोषदृष्टीनें तो विचार करी व प्रसंगीं त्या काव्यावरील आपलें मत तो व्यक्त करी. सहृदय हा एका दृष्टीने प्रत्यक्ष कवीच्या काव्याचा परीक्षक, तर दुसऱ्या दृष्टीने काव्यचर्चेच्या तत्त्वांचा प्रस्थापक होता. दृष्टां-ताने सांगूं म्हटलें, तर सहृदयाची भूमिका आजच्या न्यायाधीशासारखी असे. आजचा न्यायाधीश त्याच्या-समोर असलेल्या खटल्यांतील वस्तुस्थितिदर्शक पुराव्यांचें मूल्यमापन करतांना जितक्या काटेकोरपणाने त्यांतून प्रतीत होणारें न्यायतत्त्व (Precedent) शोधून काढतो, तितक्याच तत्परतेनें सहृदय समोर असलेल्या वाङ्मयाचें मूल्यमापन करतांना त्यांतील काव्यतत्त्व शोधण्याचा प्रयत्न करी. न्यायाधीश हा एकाचवेळीं दोन कामें करतो. समोर असलेला खटला खरा किंवा खोटा असा निकाल देतो. या दृष्टीने तो त्या खटल्याचा परीक्षक आहे. पण तें करीत असतांना तो एखादें न्याय-तत्त्व (precedent) प्रस्थापित करतो. या दृष्टीने तो

न्यायनिर्णयाचें शास्त्र सांगतो. सहृदयहि कवीच्या दृष्टीनें हेंच काम करी. कविसमाजांतील सदस्य म्हणून समोरच्या काव्यावर बरावाईट अभिप्राय देत असतांच तो काव्यतत्त्वाचें विवेचनहि सांगून जाई. अशा विवेचनाचेंच हळू हळू शास्त्रांत रूपांतर झालें. विदग्धगोष्ठींतील सर्व नागरक रसिक असले तरी प्रत्येकाच्याच ठिकाणीं अशी प्रज्ञा असेच असें म्हणतां येत नाही. हे नागरक काव्याची मजा लुटावयास तयार असत. एखादी प्रहेलिका, एखादा चित्रबंध, एखादी यमक किंवा अनुप्रास, युक्त कविता, एखादा चुटका, सुभाषित किंवा एखाद्या प्रसंगाचें बहारदार वर्णन याने खुश होऊन ते कवीची वाहवा करीत, किंवा काव्य न आवडल्यास क्वचित् ते निन्दाहि करीत. पण 'सारस्वताचें रहस्य' शोधून काढण्याचा प्रयत्न ते करीतच असें नाही. हें रहस्य शोधण्याचें काम सहृदयाने केलें व त्या आपल्या अपूर्व प्रयत्नानेच तो काव्याचा निकष बनला.

हा सहृदयच काव्यास्वादाचा खरा अधिकारी होय. 'अधिकारी चात्र विमल प्रतिभानशाली सहृदयः' असें अभिनवगुप्त म्हणतो. एका बाजूला काव्यनिर्मिति करणारा कवि व दुसऱ्या बाजूला त्या काव्याचा तन्मयतेने आस्वाद घेणारा सहृदय; कवि व रसिक यांचा हृदयसंवाद घडवून आणणारें साधन म्हणजे शब्दार्थमय काव्य; व या रसिकाला आनंदमय करून सोडणाऱ्या शब्दार्थाचें स्वरूप निश्चित करणारें शास्त्र म्हणजे काव्यशास्त्र किंवा साहित्यशास्त्र. साहित्यशास्त्राचे नियम बांधतांना या सहृदयाने इतर अनेक शास्त्रांचा उपयोग करून घेतला. मात्र तें करितांना त्याने प्रत्यक्ष जीवनावरची आपली नजर ढळूं दिली नाही. जीवनानुभवाच्या मजबूत पायावर साहित्यमंदिराची उभारणी करतांना त्याला ज्या शास्त्राचा जेथे उपयोग झाला तेथे तो करून घेतला. किंबहुना, इतर सर्व शास्त्रांचें सार घेऊन त्यांच्या रंगसंगतीने त्याने लोकजीवनाची जी रम्य मूर्ति चित्रित केली ती साहित्यविद्या होय. म्हणून या साहित्यविद्येंत सर्व विद्यांचें सार दिसून येतें. राजशेखर म्हणतो—

"पंचमी साहित्यविद्या। सा तु सर्वासां विद्यानां निष्यन्दः।"

शंख आणि घड्याळ

(पान ४०-वरून)

गत्यंतर नाही. म्हणून म्हणतों. निदान पाऊणशें रुपयें तरी मला द्याच, नाही म्हणूं नका. हे नऊ वाजायला आले. एक्सप्रेस दहा–दहाला निघते. मला ती पकडायलाच पाहिजे—मग? देतां ना? करा माझ्यावर एवढे उपकार! नाही म्हणूं नका."

"अहो, पण झालं काय, जरा खुलासेवार सांगा तरी....."

"आता मला अधिक कांही विचारूं नका तुम्हाला म्हणून सांगतों—मी दौऱ्यावरून आज दुपारीं परत आलों. त्यानंतर, संध्याकाळीं कामाला थोडा बाहेर गेलों होतों, आणि थोड्या वेळापूर्वी घरीं परत आलों. पाहतों तर ती घरीं नाही!–शोधायला लागलों, तों मला तिने लिहून ठेवलेली ही चिठ्ठी सापडली!– ती मला सोडून आपल्या भावाकडे संध्याकाळच्या ग्रँडट्रंकने निघून गेली आहे. पुन्हा ह्या घरांत पाय ठेवायचा नाही, अशा निश्चयाने निघून गेली आहे!– पण, तिच्या वाचून मला जिवंत राहणंहि शक्य नाही!– मी जाणार अन् तिला मनधरणी करून परत आणणार!– आणणारच तिला मी घरीं परत! तिच्यावाचून मी जिवंत राहूं कसा?– म्हणून म्हणतों– मला भाड्यासाठी पैसे हवे आहेत तेवढे कृपा करून द्या. नाही म्हणूं नका!— फार उपकार होतील तुमचे माझ्यावर–देतां ना?"

एकदा मला वाटलं, त्याला सांगून टाकावं, गेली तुझी बायको तुला सोडून तेंच बरं झालं. पुन्हा तिला परत आणून ह्या नरकवासांत लोटायला मी तुला मदत करीत नाही म्हणून. पण त्याच्या त्या केविलवाण्या मुद्रेकडे पाहून तसं मला सांगवेना. मी मुकाट्यानें उठलों, अन् कपाटांतून दहा–दहाच्या दहा नोटा अन् त्याचें तें घड्याळ दोन्ही त्याच्या हातावर ठेवीत म्हणालों, "हें घड्याळ राहूं द्या तुमच्याच जवळ!—".

लघुकथा

झप् झप् पाय उचला!

श्री. शरच्चंद्र टोंगो

जायचा मी निर्णय घेतला तेव्हा माझ्या वडिलांना अतिशय वाईट वाटलं. सात मैलांच्या कच्या रस्त्याची चढउतार माझ्या देहाला परवडण्यासारखी नाही हें बाबांना कळतं, डॉक्टरांना कळतं, अक्काला कळतं; अन् काय मलाच तेवढं कळत नाही ? पण मी काय करूं ! माझ्या शरिराचा कण न् कण जायला उतावीळ आहे···आंतून तसे मला इषारेहि मिळत आहेत. हा देह माझी शेवटपावेतों साथ करीलच की नाही हें मी कसं सांगूं ! 'मी' माझ्या देहाहून वेगळा आहे याची स्पष्ट जाणीव यापूर्वी मला कधीच झाली नाही. माझ्या या दीर्घ आजारांत डॉक्टरांच्या केविलवाण्या झुंजीनंतर मृत्यूच्या भयाची नव्हाळी आता उरली नाही. नागाचे पेटारे दर मुक्कामाला हलवणाऱ्या गारुड्याला नसतं का माहीत : आपला मृत्यु जवळच आहे; पण झाकला आहे !

—नाचणीकर भोयांनो ! किती सावकाश चलतां रे !! झप्झप् पाय उचला···

२

मागं टाकलेल्या चाळीस वर्षांचा कालखंड हा कालाचा एकच बिंदु वाटतो. म्हणूनच नक्की किती वर्षांपूर्वीची ती आठवण आहे तें आठवत नाही. या बिंदुच्या सघनतेकडे, झळाळीकडे शांतपणानं पाहत राहण्यांतच मनाला अतिशय सुख वाटतं. काळावर टाकलेलीं कृत्रिम बंधनं सुटायला आलींत त्याचं तर हें सुख नसेल ना !

···'जीवनाबद्दलच्या माझ्या कल्पना जसजशा आकार घेऊं लागल्या तसतसे मी नि माझ्या वडिलांतील उडणारे खटके गंभीर स्वरूप धारण करूं लागले. त्यांचं न् माझं कधीच फारस पटलं नाही. कारण आज आठवत नाही. पण कांहीतरी खटकलं अन् मी घर सोडलं. माझ्या जवळचे तीनचारशे रुपये खिशांत टाकले, बॅग भरली अन् जवळच्या स्टेशनवर येऊन दाखल झालों. पौर्णिमा परवांचीच होती. वाटलं, आग्र्याला जावं ! ताजमहालचा संगमरवर पुनवेच्या चांदण्यांत न्हाऊन निघतांनाच तें वियोगाचं लावण्य पाहण्यासारखं आहे··'पण तिथं दोन तीन मित्र होते. मनाचा नक्की खेळ काय झाला तें आज आठवत नाही, आठवतं येवढंच की, मी उज्जयनी पक्की केली.

मार्गशीर्ष महिन्याचे दिवस होते. थंडी कडाक्याची पडली होती. कुठल्यातरी एका सराईंत मी उतरलों. सराईच्या दाराशीं मातीच्या झाकणांत फुललेले अंगार विकणारी एक मुलगी बसली होती. त्या मुलीजवळून दोन कुंड्या मी विकत घेतल्या. हाताचे तळवे बराच वेळ मी निखाऱ्यावर धरले. कोट न काढतांच ब्लँकेट डोक्यावरून घेऊन होल्डॉवर मी पोटाशीं पाय घेतले. माझ्या आजूबाजूला उतारू पडले होते. त्यांचे श्वास, बऱ्याच जणांचं खोकलणं अन् कांहींचं बोलणं ऐकायला येत होतं. त्या रात्रीसारखी थंडी मी कधीच अनुभवली नाही···माझे डोळे जड पडूं लागले.

···पण तेवढ्यांत मला वाटलं, माझ्या ब्लँकेटखाली कुणीतरी आपला हात सरकवला.

तोंडावरून मी ब्लँकेट काढलं. आगीनं धगधगलेली छोटी कुंडी मी माझ्या शेजाऱ्याकडें सरकवली. बरेच दिवसांत त्यानं दाढी केलेली दिसत नव्हती. त्याचे रखरखीत केस मस्तकावरून कानाच्याहि खाली ओघळले होते. माझ्याच वयाचा तो असावा असं वाटलं. प्रकाशाच्या मंद लालसर छटांत त्याच्या नजरेंतील छटा मिसळून गेल्यामुळे की काय, त्याच्या डोळ्यांतील कातरतेला धग आली होती···

तो म्हणाला,

"माफ करा···मी आजारी आहें. थंडीची आजची पाळी आहे.···गजवची थंडी वाजत आहे..."

त्यानं अंगावरची चादर कानावर ओढून घेतली.

मी त्याचा कढत हात हातांत घेतला.

"डॉक्टर शोधून आणूं का ?"

"नको···नको··· कांही पांघरायला असेल तर द्या..."

मी ब्लँकेट पायावर फेकलं. उठून बसणार तेवढ्यांत तो म्हणाला,

"जास्तीचं असेल तरच द्या···"

"जास्तीचं तर नाही ··हें घ्या तुम्ही. माझ्या अंगांत गरम कोट आहे."

"नको···मुळीच नको !"

मग स्वतःशींच बोलल्यासारखं तो म्हणाला,

"दुसऱ्याच्या हिवानं स्वतःचं हीव भागवण्याची माझी सवय नाही."

मी निश्चयानं माझ्या अंगांतला कोट काढला अन् त्याला देत म्हटलं,

"हा घ्याच···"

त्यानंहि तो मुकाट्यानं घेतला.

···सकाळीं मी जागा झालों तेव्हा माझ्या रोजच्या सवयीप्रमाणे मी माझं मनगटावरचं घड्याळ पाहिलं. मला मग माझा प्रवास आठवला अन् आपण कुठं आहोंत ह्याची जाणीव झाली. रात्र आठवून मी वळून पाहिलं. माझा शेजारी हसण्याचा प्रयत्न करत होता.

"झोप कशी आली ?"

"ठीक···तुमचं ?" मी विचारलं.

"ताप आत्ता आत्ता उतरला. घाम येऊन. हा तुमचा कोट···"

कोटाची घडी घालून मी तो उशीखाली ठेवत असतां तो म्हणाला,

"थांबा···कोटांतली मनीबॅग पाहून घ्या."

कोटाच्या घडीवर उशी ठेवून मी त्याला म्हटलं,

"कोट देण्यापूर्वींच नसती का काढून ठेवतां आली !"

"असं ! म्हणजे घरचे बरे दिसतां तुम्ही !

निस्संकोचपणानं मी म्हटलं,

"कमावलेलाच पैसा खर्च करायला मिळतो असं नाही···त्या अर्थानं बरा···"

"असं असं ! म्हणूनच हा दिलदारपणा ··"

हसून मी म्हटलं,

"माझा दिलदारपणा दाखवायला कांही मी माझा कोट तुम्हाला दिला नाही···"

"असं कोण म्हणतं !" तो कांहीशा त्वेषानं म्हणाला, "तुमच्या आर्थिक सुस्थितीमुळे तुम्हा लोकांच्या हातून अशाच कृति घडतात की, आमचे आईबाप आमच्यासारख्या कंगालासमोर तुमचाच आदर्श ठेवतात···"

"पडा तुम्ही···तुमच्या कपाळावरचा घाम पुसा ह्या रुमालानं···"

त्या गावांत डॉक्टरचा शोध करून मी त्याला त्यांच्याकडे नेलं. त्याला तपासल्यानंतर त्यांनी सांगितलं की, चार सहा दिवसांचा औपोचोपचार या दुखण्याला पुरेसा होईल···आजार सामान्य आहे, पण वेळींच काळजी घ्यायला हवी !

मी त्याला म्हटलं,

"डॉक्टर म्हणतात, तुम्ही चार सहा दिवस रहायला हवं. तुम्हाला ते ठेवून घेतील···"

"पण माझ्याजवळ पैसे नाहीत".

"त्याची काळजी नको···बराय तर मग ! दुपारच्या गाडीनं निघेन मी !"

त्यानं माझा हात घट्ट धरून ठेवला. त्याच्या पापण्या मला ओलसर वाटल्या. तो मला निरोप देत होता ! पण निरोप देणं त्याला केवढं कष्टाचं वाटत होतं तेंहि मला स्पष्ट दिसलं.

मी म्हटलं,

"नाही''मी जात नाही आज. तुम्ही वरे झाल्या-वरच मी जाईन."

तिथं आम्ही सात आठ दिवस असूं. साधा हिवताप होता. त्याच्या दुखण्यानं लवकरच आटोपतं घेतलं. त्याच्याकडे मी कसा ओढलों गेलों याचं आश्चर्य हळू हळू ओसरलं. तो बोलायचा फारसा नाही; अन् जें बोलायचा त्यांतहि कटुताच फार ! पण त्याच्या नजरेंत निरागस असं आर्जव होतं. अजाण मुग्धतेनं त्याचं शरीरच बोलकं होत असे.

आम्ही एकमेकांना खाजगी जीवनाबद्दल कांही एक विचारलं नाही. त्यानं का विचारलं नाही तें मला सांगतां येत नाही. मला मात्र कोणाच्याहि खाजगी जीवनाबद्दल या क्षणापावेतों कधीच रस वाटला नाही.

मी फक्त एकच विचारलं. नांव.''त्याचं नांव महेंद्र होतं. महेंद्रानं मला तेवढंसुद्धा विचारलं नाही.

निघतांना डॉक्टरांनी सांगितलं की, याला एक दीड महिन्याची विश्रांति द्या. फार अशक्त झाला आहे. मी होय म्हटलं. पण प्रश्न असा की, विश्रांति-साठी जायचं कुठे ?

म्हणून मी महेंद्राला म्हटलं,

"तुला घरीं जायचं कां ? की माझ्यावरोबर चलणार ? "

कपाळावर झेपावलेले केस मागं सारत हसून तो म्हणाला,

"मला घर आहे कुठं ! "

—अरे ! केवढा थंड झोत आला'' पश्चिमेकडे हे ढग कसे खच्चून भरले आहेत. आंब्याच्या राईपली-कडे, नदीच्या वाकणापल्याड, मोहाच्या वनावट क्षिति-जांतून ढग कसे उसळताहेत. क्षितिजाशीं साकळलेल्या काळ्या घनदाट छायेवर ढगांच्या पांढऱ्या रेषा वर सरकूं लागल्या''

नाचणीकर भोयांनो ! किती सावकाश चलतां रे !! झप् झप् पाय उचला...

३

होय ! तर आम्ही मुंबईला आलों. कुठंतरी जायचं म्हणजे मला मुंबईच आवडते. शक्य तों घरीं परतायचं नाही असं मी ठरवलं होतं. फोर्टमधील एकी-कडच्या हॉटेलांत आम्ही उतरलों. दिवसाची सगळी वर्दळ काळोखावरोबर संपायची अन् रात्रीच्या काळोखांत एकाकीपणा अवचितच जाणवूं लागायचा ! एका सायंकाळीं रस्त्याच्या कडेला थांबून आम्ही कांहीतरी बोलत होतों. त्या अंधुक प्रकाशांत तो कुणाला तरी सारखा न्याहाळत होता.

अवचितच त्यानं विचारलं,

"तुला मुली चालतात का ? म्हणजे करमणुकी-साठी ? पैसे देऊन ?"

मी फक्त त्याच्याकडे पाहिलं. किंचित् चाचरत तो म्हणाला,

"येवढ्याचसाठी विचारलं की, ती येत आहे ना; तिच्याजवळ मुली आहेत. निवडक !"

"तुला हवी का एखादी ?"

"छे !"

"मग चल तर''"

महेंद्रानं मला सिगारेट दिली. काडी उजळून पुढें केली तेव्हा माझ्या डोळ्याशीं डोळा भिडवण्याचं त्याला सामर्थ्य नव्हतं. भलताच कटून गेला होता !

त्याच्या पाठीवर हात टाकून मी म्हटलं,

"मी मोठा सोवळा आहे असं नाही. पण हे हाडा-मासाचे सौदे आपल्याला आवडत नाहीत. उपभोगाचं महत्त्व मी गौण मानतों; तें सुख सामान्य आहे असं ढोंग मला करतां यायचं नाही.''पण हें सगळं एका अतीव स्नेहाची परिणति म्हणून मला हवं आहे. समजलास महेंद्र ! आज नाही उद्या ! केव्हाहि अशी गोड मुलगी भेटली तर मला बोलावून घे. किंवा तिलाच पाठव."

निष्काळजीपणानं सिगारेट मागं फेकून देऊन मी हसलों.

अनुक्रमणिका

दुसरे दिवशीं सकाळीं महेंद्रानं मला हलवून जागं केलं. डोळे चोळत चोळत त्यानं पुढे केलेलं वर्तमानपत्र मी पाहिलं. त्यांत माझा फोटो छापून आला होता. माझ्या वडिलांनी ठराविक नमुन्याचं पत्र लिहिलं होतं. आईच्या आजारपणाचा उल्लेख केला व टीपेंत पत्ता देणाऱ्यास १०१ रुपयांचं बक्षीसहि जाहीर केलं होतं.

आमच्या भांडणाचे पेचप्रसंग कसे ना कसे सुटतच. पण वृत्तपत्राचा आसरा घेऊन मिटलेलं भांडण हें एकच !

महेंद्राला मी म्हटलं,

"मग एकशे एक रुपये घ्यायला केव्हा चलणार ?"

तो हसून म्हणाला,

"आता···या क्षणीं. माझ्यासारख्या दरिद्री माणसाला ही रक्कम सामान्य नाही."

···आमच्या गावीं तो महिना दीड महिना होता ! महेंद्राला आमची नाचणी फार आवडली. वाड्यासमोरून मुरडून दक्षिणेकडे जाणारी भद्रा नदी, मागच्या माडीवरून दिसणारं वेळूचं बन; आमच्या गावांतले गवळी, शेतकरी नि दोऱ्या वळणारे—सगळं कांही त्याला मनापासून आवडलं. भद्रेच्या शांत पात्रांत होडग्यांतून आम्ही मच्छीमारी केली. राखीव जंगलांत शिकारी केल्या. घोड्यावरून रपेट मारली. जत्रेंत सर्जेदार पोरींच्या लावण्याच्या छक्कडी ऐकल्या.

अन् एके दिवशीं महेंद्रानं जायचं ठरवलं.

माझ्या खोलींतल्या गौतम बुद्धाच्या संगमरवरी मस्तकासमोर आम्ही उभे होतों.

मी विचारलं,

"पैसे ?"

"होय. शंभर पुरतील.···"

"मग एकशे एकच घेऊन जा.···"

पण महेंद्र हसला नाही.

"पुन्हा केव्हा येशील ?"

"बरोबर एक वर्षानं. आजच्याच तारखेला येतों मी. विसरूं नकोस···" त्यानं मला कडकडून मिठी मारली. मलाहि भडभडून आलं. जातांना त्यानं पत्ता लिहून टेबलावर ठेवला.

टांग्याच्या चाकांचा आवाज विरला. भद्रेच्या पात्रावर चांदणं चमकत होतं. मागच्या माडींतून दिसणारं वांबूचं बन उभ्या उभ्या पेंगूं लागलं. दोऱ्या वळणारे आपलीं हुळहुळीं बोटं खाकेंत घेऊन झोपीं गेले. लवकर उठून रवी लावण्यासाठी गवळणी एव्हाना अर्ध्या झोपेंत असतील···

महेंद्रानं मला पुण्याहून लिहिलं. नंतर मुंबई, कलकत्ता, लखनौ, दिल्ली ? पण या सगळ्या पत्रांना त्यानं दिलेल्या पत्त्यावरच लिहावं लागत असे ! हीं पत्रं त्या त्या ठिकाणच्या कोणत्यातरी हॉटेलांतून येत. पुढे पुढे त्याचीं पत्रं कमी व्हायला लागलीं. शेवटचं त्याचं पत्र मुंबईहून आलं. त्यानंतर मी पत्रं पाठवलीं; पण दोन महिने उत्तर नाही. एके दिवशीं एक वर्तमानपत्र दिल्लीहून पोष्टानं आलं. लाल रेघा मारलेल्या मजकुराकडे माझं लक्ष वेधलं. अरे ! अरे !! महेंद्राच्या मृत्युची ती छोटी बातमी होती.

—अरे ! ह्या पाकोळ्या का उडत आहेत ! कुठं तरी फसण आहे; अन् त्या फसणीच्या ओलाव्याची त्यांना ओढ आहे.

नाचणीकर भोयांनो ! किती सावकाश चलतां रे !! झपझप् पाय उचला···

: : ४

ह्या गोष्टीला बरेच दिवस झाले. शेतीवाडीची सगळी जबाबदारी माझ्यावर टाकून बाबा नि आई तीर्थयात्रेला निघून गेले. पण हें तीर्थयात्रा प्रकरण फार दिवस टिकणं सर्वस्वी अशक्य होतं. बाबांचा स्वभावच असा आहे की, त्यांचा स्वतःखेरीज दुसऱ्या कुणावर कधीच विश्वास बसणं शक्य नाही. हें प्रामुख्यानं आठवलं अशासाठी की, एकदा महेंद्राच्या दिल्लीच्या पत्त्यावर जाऊन महेंद्राबद्दल विचारावं असं फार फार वाटत होतं. पण तें जमलं नाही. तीन चार पत्रं मी पाठवलीं खरीं; पण त्यांचंहि उत्तर आलं नाही···

शेतावरून एकदा मी परतलों. आमच्या सोनारींत कापूस वेचण्याचं काम सुरू होतं.

आमच्या रामरतन स्वयंपाक्यानं पुढें येऊन सांगितलं,

"कुणी मिजवान आले आहेत मालिक..."

"कोण ?"

"नवीनच आहे •• पूर्वी कधी पाहिल्याचं आठवत नाही...."

"नवीच ?"

"हो. लडकी आहे..."

मला त्याचं फारसं आश्चर्य वाटलं नाही. आमच्याकडे अकस्मात् कोणीतरी येई. ती स्नान करत होती. म्हणून तिचं आटोपतांच तिला वर पाठवून द्यायला सांगितलं. मला कोणतीशी कादंबरी संपवायची होती. माडीवर गेलों. कोचावरची उशी डोक्याखाली घेतली अन् क्षणभऱ्यांत त्या पुस्तकी जगांत सगळं कांही विसरलों.

मंद सुगंधाचा दरवळ आला, मी समोर पाहिलं. दारांत एक स्त्री उभी होती. जिच्यावर परोपरीची संकटं आलीं अशी मी वाचत असलेल्या कादंबरीची नायिका शब्दांतून उठून तर समोर उभी राहिली नव्हती ना ! मला मोठी गंमत वाटली. कल्पनेंतून व्यवहारांत येतांना संवेदनेला कल्पनेचे सुवर्णकण नेहमीच चिकटतात.

ती म्हणाली,

"माझं नांव चारू. मला एक थिसिस लिहायचा आहे. स्त्री न् कौटुंबिक आर्थिक जीवन यावर ! कुणीतरी आपल्या या गावाबद्दल मला सुचवलें. आपल्या खेड्यांच्या विशिष्ट भौगोलिक ठेवणीमुळे मी आलें. नागर संस्कृतिपासून आमच्या ज्या स्त्रिया आजहि दूरच आहेत त्यांना जर भेटलें नाही तर विषय अपुरा राहील. म्हणून आलें मी•••"

मी म्हटलं,

"आपण आपलं काम करा. घर समजून रहा माझं सहाय्य लागेल तेव्हा मागा••"

मी नीट तिला त्याच वेळीं पाहून घेतलं. तिनं पंजाबी पद्धतीची वेषभूषा केली होती म्हणून की काय, पण मला ती उंच वाटली. तिनं आपल्या लांब्या केसांना नाजूक वळणं दिलीं होतीं. तिचे डोळे लहान होते खरे; पण दाट पापण्यांमुळे तिच्या नजरेंत फार लखलखत असे...

पहिल्या दिवसापासूनच तिनं परकेपणा मानला नाही. दिवसांतून एक दोन तास ती खेड्यांत हिंडायची; कांही वेळ वाचायची, टिपणं लिहायची.

नाचणींत तिला सगळ्यांत कांही आवडलं असेल तर वाड्यासमोरचं भद्रेचं वाकण ! सायंकाळीं आम्ही होड्यांतून वल्हीं मारत जात असूं. टेकड्या चढाईचीहि तिला मनस्वी हौस ! शिकारीपाठी मी निघालों तेव्हा ती माझ्याबरोबर आली. टोकदार नेम घेऊन तिनं एका चितळाची शिकार केली तेव्हां मला कमी आश्चर्य वाटलं नाही. येतां येतां तिचं कमीज काट्यांत अडकलं तें मी सोडवलं. तिच्या मृदु केसांत घुसलेले केसर मी माझ्याच हातानं स्वच्छ केले. आम्ही परत आलों तेव्हा सायंकाळ व्हायला आली होती. चारू कमालीची थकून गेली होती.

...परंतु भद्रा तिला साद घालत होती. तिनं मग होडी सोडली अन् हातांत वल्हीं घेतलीं. किनाऱ्यावरच्या झाडाच्या फांद्या पात्रावर आल्या होत्या. त्या पालवी-खालच्या गार सावलींत होडी शांत करून ती म्हणाली,

"तुमच्या मांडीवर मी डोकं टेकवतें. दुखतं जरा. चेपून द्याल ?"

मी तिचं डोकं चेपून दिलं; कानशिलाजवळच्या शिरा दाबल्या. तिचे भुरूभुरू उडणारे केस मी कानामागं घेतले. एका मधुर धुंदींत मी वाकलों...

रात्रीं थंडी कडाक्याची पडली होती. पाठीमागच्या बांसाच्या बनांत होणारे येरव्हींचे आवाज आज तरी शांत झाले होते. आम्ही आधीच थकून गेलों होतों. परंतु कितीहि थकलों तरी बिछान्यावर पडल्याबरोबर कांही मला झोप येत नाही. केसाच्या पिना उशीखाली सरकवून चारू गाढ झोपीं गेली. तिच्याकडे कितीतरी वेळ मी पाहत होतों...

अन् चारू जशी अचानक नाचणीला आली तशीच निघून गेली. होय ! जाण्यापूर्वी मी तिला स्पष्टच विचारलं, लग्नाबद्दल ! येरव्ही ती किती धीट ! पण लाजून चूर झाली. तिनं मला कसंबसं सांगितलं की, तिनं आजन्म अविवाहित राहण्याची शपथ घेतली होती.

अनुक्रमणिका

मोठ्या उदासपणें मी तिला निरोप दिला.

आईबाप यात्रेहून परत आले. शेतीचींहि कामं आटोपलीं. यात्रेचा आध्यात्मिक परिणाम पंधरवड्यांत पुसला जाऊन बाबा पुन्हा देण्याघेण्याच्या व्यवहारांत लक्ष घालूं लागले.

मला चारूची आठवण येऊं लागली. जातांना तिनं आपला मुंबईचा पत्ता दिला होता. त्या पत्त्यावर पाठवलेलीं पत्रं परत आलीं होतीं. मी मुंबईला जायचं ठरवलं. तिनं दिलेल्या पत्त्याप्रमाणे शोध केला...

म्हणजे ! तिनं भलताच पत्ता दिला होता! चारूनं मला बनवलं होतं तर ! !

सहजच वाटलं, दिल्लीला जावं. महेंद्राच्या मृत्यू-बद्दल कांही तरी विस्तारानं कळावं असं वाटलं. वहा ! काय गंमत आहे !! ज्याच्यावर आपलं नितांत प्रेम आहे अशी व्यक्ति या जगांतून जाते तेव्हा माणसाला केवढं दुःख वाटतं. परंतु कांही काळानंतर त्याच्या मृत्यूबद्दल बोलण्यांत, विचार करण्यांत त्याला एक प्रकारचं सूक्ष्म समाधान वाटतं !

दिल्लीच्या कॅरोलबाग या वस्तींत मी गेलों. पन्नाशीच्या सीमारेषा ओलांडलेल्या एका स्थूल, ठेंगण्या इसमानं माझं स्वागत केलं. विनकडांच्या जाड भिंगांतून तो कितीतरी वेळ मला न्याहाळत होता. त्याचे कपडे अतिशय भारी होते. एक उंचींपैकीं सिगारेट त्यानं मला दिली...

"बोला..."

मी माझं नांव सांगून त्याला म्हटलं,

"मला महेंद्राबद्दल विचारायचं आहे." आधीचाच त्यांचा गंभीर चेहरा आता अधिकच गंभीर झाला.

तो म्हणाला,

"तुम्हाला मी पाहिल्यावरोबर ओळखलं. महिन् तुमच्याबद्दल फारच बोलला. पण तो जाऊन कितीतरी दिवस झाले...हराळी वाघली !"

"कशानं वारला ?"

"विषमज्वरानं..."

"तुम्ही मला लिहिलंसुद्धा नाही..."

"खरं सांगूं .." त्यानं घसा साफ केला, "महिन्-बद्दल लिहिणं, विचार करणं आजसुद्धा मला जड जातं. त्याच्या आयुष्यांत त्याचा विश्वास फक्त दोघांवर होता. दोघांवरच फक्त : तुम्ही न् मी ! आपण त्याला त्याचे प्राण मागितले असते तरी त्यानं ते दिले असते... अन् प्राणाहून या जगांत दुसरं माणसाला काय प्रिय आहे ?"

"बरं ! तो करत काय होता ?"

तो हसला. खोलीच्या कोपऱ्यांत क्षणभर त्यानं पाहिलं; मग म्हणाला,

"आज तुम्हाला ऐकायला गंमत वाटेल...लखनौ, दिल्ली, पुणं, कलकत्ता, मद्रास अशा मुख्य मुख्य ठिकाणीं परकीय सत्तेला एकाच वेळीं शह देण्याचं कारस्थान आम्ही रचत होतों. ही संघटना उभारत असतां अचानकच महिन् वारला. आमचे पायच लुळे पडले...महीन् नि त्याची बहीण दोघंहि स्वातंत्र्य मिळवायच्या कल्पनेनं वेडीपिशीं झालीं होतीं...जीवनाचीं सगळीं मूल्यं या एका वेदीवर त्यांनी बळी दिलीं होतीं...जाऊं द्या ! जुन्या गोष्टी झाल्या..."

मी त्याला म्हटलं,

"त्याची बहीण कुठं आहे ?"

"कुणास ठाऊक ! मी तिला शोधण्याचा प्रयत्न केला...पण जगाच्या या अफाट महासागरांतून तो मोती वेचून काढण्याची शक्ति आज तरी माझ्यांत उरली नाही..."

मी म्हटलं,

"महेंद्राचा एखादा फोटो असेल तर द्या..."

त्यानं कपाट उघडून एक छायाचित्र काढलं. समोर करून तो म्हणाला,

"महिन् एकटा नाही ह्यांत. त्याच्यावरोबर त्याची बहीण पण आहे."

मी पाहिलं. विस्मयानं. डोळे भरून. थक्क होऊन...

(पुढील मजकूर पान ६४ वर)

नाट्यसृष्टि व नाट्यदृष्टि

अ. म. जोशी, ग्वाल्हेर

सत्याचा आभास निर्माण करणें हें नाटयाचें उद्दिष्ट होय. नाटय निर्माण करण्यासाठी नट एका काल्पनिक सृष्टींत प्रवेश करीत असतो. आपण करीत असलेल्या भूमिकेशीं तादात्म्य पावून त्या व्यक्तीचे विचार, तिच्या भावना, तिचा स्वभाव हीं सर्व आपलींच आहेत अशी वृत्ति तो आपल्या ठिकाणीं बाणवीत असतो; थोडक्यांत त्या व्यक्तीचें जीवन तो तात्पुरतें जगत असतो. रंगभूमीवर प्रवेश करतांच नटाचा नाटयाच्या काल्पनिक सृष्टींत प्रवेश होतो. त्यानंतर तो स्वतःचें व इतर नटांचें व्यक्तित्व विसरतो. आपणास नाटकांत भेटणारी व्यक्ति नाटयदृष्टया आपल्या परिचयाची नसेल आणि आपण तिला प्रथमच पहात असूं, तर रोज तालमीच्या वेळीं त्या व्यक्तीला पाहत असूनहि तिला आपण नव्यानेच पाहत आहों असा आभास निर्माण करणें; रंगभूमीवर आपल्या प्रियेच्या स्पर्शानें अंग पुलकित होत असेल; परंतु रोज तालमीच्या वेळीं स्पर्श होत राहिल्यानें अंग पुलकित होण्याचा संभव जवळ जवळ नष्ट झाला असला तरी रंगभूमीवर तसा आभास निर्माण करणें; रोज तालमीच्या वेळीं तीच बातमी ऐकत असलों तरी रंगभूमीवर ती आपण नव्यानें ऐकत आहों असा आविर्भाव करणें; दुसऱ्याच्या कानांत एखादें रहस्य सांगत असतांना समोर हजारो प्रेक्षक बसले आहेत व ते आपलें बोलणें ऐकत आहेत (आणि त्यांनी तें ऐकलेंच पाहिजे!) हें माहीत असूनहि जणू कांही एकांतांत तें रहस्य आपण दुसऱ्यास सांगत आहोंत असें भासविणें; या व अशा आभासात्मक क्रियांनी नाटय बनत असतें.

नाटयांतर्गत आभास निर्माण करण्यासाठी जशा कांही कृत्रिम युक्त्याप्रयुक्त्या योजाव्या लागतात, त्याप्रमाणे त्यासाठी कांही शारीरिक व मानसिक नियमनांचें पालन करण्याची आवश्यकता असते. या युक्त्याप्रयुक्त्या व नियमनें यांसंबंधी अनुभवानें कांही संकेत बसवितां येण्यासारखे आहेत; व तज्ज्ञांनी ते बसविलेहि आहेत. होतकरू नटानें त्यांचा अभ्यास करून ते अमलांत आणले असतां त्याच्या अभिनयांत अधिक शास्त्रशुद्धता व आकर्षकता निर्माण होते. या संकेतांस अभिनयकलेचें शास्त्र म्हणतां येईल. नाटयशास्त्रांतर्गत सिद्धांतांस नियम न म्हणतां संकेतच म्हणावें. कारण हे सिद्धांत काटेकोर, साचेबंद, निरपवाद कधीच नसतात. कलाविषयक सिद्धांत नेहमीच स्थूल ठोकताळ्याच्या स्वरूपाचे असतात. कालानुसार, प्रसंगानुसार ते बदलतात, नव्हे बदललेच पाहिजेत; नाहीतर ती कला निर्जीव होईल. Art is law unto itself (कलेचे नियम तींतूनच निर्माण होतात) हें तत्त्व याठिकाणीं ध्यानांत धरणें आवश्यक आहे.

हे संकेत होतकरू नटानें डोळ्यासमोर ठेवावे असें म्हटलें तरी प्रत्यक्ष अभिनय करीत असतांना या संकेतांनुसार आपण नाटय करीत आहों असें प्रेक्षकांस कळूं न देण्याची खबरदारी घेणें आवश्यक आहे. कारण त्या योगानें अभिनयांतील स्वाभाविकपणाचा आभास नष्ट

* 'अभिनव नाटयशास्त्र' या लेखकाच्या आगामी ग्रंथांतून उद्धृत.

होण्याचा संभव असतो. हे संकेत नटाच्या अंगांत मुरले पाहिजेत. आपण कांही संकेतानुसार अभिनय करीत आहोंत ही जाणीव नष्ट झाली म्हणजे ते अंगांत पुरते मुरले असें समजावें. लहान मुलें लिहावयास शिकतात त्यावेळीं प्रत्येक अक्षर, प्रत्येक शब्द कसा लिहावा याचें त्यांना शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यावें लागतें. परंतु पुढे पुढे लेखन इतकें अंगवळणीं पडतें की लिहितांना त्यांना नियमांचा विचार करावा लागत नाही; अक्षरें, शब्द आपोआप लेखणींतून बाहेर पडतात. अभिनयकलेचें–किंबहुना सर्व कलांचें असेंच आहे. सतत अभ्यासाने कलेचे संकेत इतके अंगवळणीं पडतात की आपल्याला नियमांची आठवण करावी लागत नाही; नियम आपोआप आपल्यामागे धावत येतात. तथापि नाट्य म्हटलें की त्यांत कृत्रिमता येणारच. कृत्रिमतेचें व स्वाभाविकतेचें योग्य प्रमाण साधण्यांत खरी कला आहे. नाटकांतील कृत्रिमता ही रेषेसारखी असावी. भूमितींत रेषेची व्याख्या अशी करतात की तिला लांबी असते, परंतु रुंदी नसते. याचा अर्थ इतकाच की तिची रुंदी दिसते, पण मापतां येत नाही. नाटकांतील कृत्रिमता दिसावी, परंतु ती मापतां येणार नाही इतक्या बेताची असावी. नाट्यांतील आभास प्रेक्षकांच्या मनावर ठसण्याइतकेंच तिचें अस्तित्व प्रतीत व्हावें. याहून तिची रुंदी वाढली तर आभासाचें सौंदर्य नष्ट होईल. हें प्रमाण सांभाळण्यांत नाट्यकलेचें बीज साठविलेलें आहे.

हा आभास निर्माण करून नाट्य यशस्वी करण्यासाठी जे संकेत सामान्यतः घालून देण्यांत आले आहेत, ते रंगभूमीची सजावट, रंगभूषा, वेषभूषा, प्रकाशयोजना इत्यादि प्रकार, तसेंच प्रत्यक्ष अभिनय करतांना तो परिणामकारक होण्यासाठी योजावयाच्या युक्त्याप्रयुक्त्या, भाषणपद्धति, अंगविक्षेप, इत्यादिसंबंधी म्हणजे नाट्याच्या तंत्रासंबंधी आहेत. परंतु अभिनयकलेचें तंत्र आहे तसा मंत्रहि आहे, व तो तंत्रापेक्षाहि अधिक महत्त्वाचा आहे. दुर्दैवाने मोठ्यामोठ्या नाट्याचार्यांचेंहि या मंत्राकडे दुर्लक्ष झालेलें आढळतें. या मंत्राचा संबंध नटाच्या आध्यात्मिक किंवा मानसिक विनयनाशीं येतो. नाट्य यशस्वी करण्यासाठी निरनिराळ्या युक्त्याप्रयुक्त्या योजणें आवश्यक असलें, तरी नटाच्या अंतरंगाची विशिष्ट प्रकारची घडण निर्माण व्हावी लागते. भूमिकेशीं तादात्म्य पावण्यासाठी त्याला मानसिक तपस्या करावी लागते, ही गोष्ट पुष्कळ नट लक्षांत घेत नाहीत. नाट्याचार्य भरतानेहि नाट्याच्या या अंगाचा परामर्ष घेतला नाही. मराठी रंगभूमीच्या गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासांत अनेक उत्कृष्ट नट व दिग्दर्शक (त्या वेळचे तालीममास्तर) होऊन गेले. परंतु त्यांपैकी कोणीहि नटाच्या जीवनाच्या मानसिक अंगाची फारशी दखल घेतलेली दिसत नाही. त्यामुळे आपल्याकडे अभिनयकलेचें स्वरूप केवळ अनुकरणात्मक झालें आहे. सर्कशींतील हत्तीघोड्यांना शिकवून तयार करावें त्याप्रमाणे नटाची तयारी करून घेण्यांत येते. तालीममास्तरने सांगितल्याप्रमाणे हालचाली व हातवारे करावयाचे आणि भाषण म्हणावयाचें, इतकीच नटांची अभिनयाची कल्पना असते. बहुसंख्य धंदेवाईक नटांचा शैक्षणिक दर्जा निदान परवापरवापर्यंत अगदी सामान्य होता, हें याचें एक कारण असू शकेल; परंतु वस्तुस्थिति ही अशी होती व अद्याप आहे. पाश्चात्य देशांतहि यापेक्षा वेगळा प्रकार आहे असें मानण्याचें कारण नाही. प्रसिद्ध रशियन नट स्टॅनिस्लाव्हस्की याच्यासारखा अपवाद विरळाच. त्याने नटाच्या आध्यात्मिक शिक्षणावर भर देऊन स्वतःचें म्हणून स्वतंत्र तंत्र बनविलें. या तंत्रास तो आध्यात्मिक तंत्र (psycho technique) म्हणत असे.

अभिनयकला ही सर्व कलांप्रमाणे जन्मजात असते व तिचा आविष्कार उत्स्फूर्त असतो असें सामान्यतः मानण्यांत येतें. 'अमका नट आज अगदी मूडमध्ये होता' असे उद्गार आपण कित्येकदा ऐकतों. हें 'मूडमध्ये असणें' यासच उत्स्फूर्तता म्हणावयाचें. उत्कृष्ट नटाच्या बाबतींतहि ही उत्स्फूर्तता नेहमी येईलच असें नाही. तो वेळेचा गुण असतो. म्हणूनच वरीलप्रमाणे उद्गार ऐकूं येतात. ही उत्स्फूर्तता हुकमी निर्माण करतां येईल काय? मनाला विशिष्ट पद्धतीचें शिक्षण दिलें तर तें शक्य आहे असें स्टॅनिस्लाव्हस्की मानीत असे. त्यासाठी मनास दीर्घकालपर्यंत एक प्रकारची तपस्याच करणें भाग आहे. आपल्या भूमिकेशीं तादात्म्य पावण्यासाठी मन त्याच विषयावर केंद्रित

करणें आवश्यक आहे. नाटयाची काल्पनिक सृष्टि सत्यच आहे अशा भावनेने मनास त्या सृष्टींत प्रवेश करावयास शिकवणें, विशिष्ट प्रसंग सत्यसृष्टींत घडला असता तर त्याप्रसंगीं आपण कसे वागलों असतों, हा प्रश्न डोळ्यांसमोर ठेवून त्यासंबंधी सतत चिंतन करणें हें त्या मानसिक तपस्येचें स्थूल स्वरूप आहे. अशा तपस्येने कालांतराने आपल्या भूमिकेशीं तादात्म्य पावण्याची क्रिया सहजसाध्य होऊं लागते. जी अवस्था सामान्यतः उत्स्फूर्त, योगा-योगाने, कधीतरी प्राप्त होणारी म्हणून मानली जाते त्या अवस्थेंत प्रवेश होण्याची क्रिया हळूहळू अंगवळणीं पडूं लागते, म्हणजेच तादात्म्य हुकमी निर्माण करतां येऊं लागतें. अशा नटाच्या अभिनयांत एकप्रकारची सहजता आपोआपच उत्पन्न होते. सामान्य नट हा रंगभूमीवर प्रवेश केल्यानंतर हजारो प्रेक्षकांचें मनोरंजन करण्यासाठी आपणास आपली भूमिका वठवावयाची आहे, या भावनेने अभिनय करीत असतो. उलट वरीलप्रमाणे तपस्येंतून तावूनसुलाखून निघालेल्या नटास रंगभूमीच्या पलीकडील प्रेक्षकांच्या सृष्टीचा विसर पडतो; व 'विगलितवेद्यांतर' अशा अवस्थेंत रंगभूमीच्या सृष्टींत वावरत असतां त्याला 'अभिनय' करावा लागत नाही; तो ती भूमिका जगत असतो.

परंतु ही तपस्या केवळ मानसिक नाही! तींत शारीरिक शिक्षणाचाहि भाग आहे. भावदर्शनासाठी चेहऱ्यावरच्या स्नायूंसच नव्हे, तर खांदे, बाहू, पाठ, इत्यादि अवयवांच्या स्नायूंसहि विशिष्ट प्रकारच्या व्यायामांचें शिक्षण देणें आवश्यक असतें. आपल्या भूमिकेशीं समरस होण्यासाठी तिच्या भावना आपल्या ठिकाणीं उत्पन्न होण्यासाठी या स्नायूंच्या व्यायामाची मदत होते असें तज्ज्ञांचें मत आहे.

या तपस्येच्या योगाने हळूहळू नटाच्या अंगीं सृजनशीलता निर्माण होते. सृजनशील कल्पनाशक्ति हा नटाच्या ठिकाणीं आवश्यक असलेला एक महत्त्वाचा गुण होय. ही कल्पनाशक्तिहि केवळ जन्मजात असते असें नाही. दीर्घकालीन तपस्येने ती अंगीं बाणते असा थोर थोर नटांचा अनुभव आहे. शब्द हें नाटककाराचें माध्यम असतें, तर अभिनय हें नटाचें माध्यम असतें. कित्येक वाटी नाटककाराला शब्द-निविष्ट करतां येत नाहीत, त्या अभिनयाच्या माध्यमाने व्यक्त करून लेखकाच्या आशयास उठावदारपणा आणण्याचें कार्य नटास करावें लागतें. यासाठी सृजनशील कल्पनाशक्तीची आवश्यकता असते. सतत अभ्यासाने नटाच्या ठिकाणीं नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञेचा प्रादुर्भाव होऊं शकतो.

नाट्यकलेच्या या मंत्रतंत्राची साधना कसोशीने करणें हें प्रत्येक नटाचें कर्तव्य आहे; त्याशिवाय आपल्या भूमिकेस न्याय केल्यासारखें होणार नाही. परंतु ही साधना कष्टसाध्य आहे. विशेषतः हौशी नट हे फावल्या वेळांत रंगभूमीची सेवा करीत असल्यामुळे त्यांना त्यांतील तंत्राची साधना करणें दुष्कर वाटणें साहजिक आहे. आपल्या नित्याचा व्यवसाय सांभाळून ही तपस्या करणें दुरापास्तच होय. परंतु हें एक ध्येय म्हणून डोळ्यांसमोर ठेवण्यास प्रत्यवाय नसावा. विशेषतः धंदेवाईक नटांनी अभिनयकलेच्या केवळ तंत्रावर अवलंबून न राहतां तींतील मंत्राच्या साधनेवर अधिक भर देणें उचित होय. तंत्रविषयक शिक्षण कितीहि प्राप्त करून घेतलें तरी मंत्राच्या साधने-शिवाय कलेमध्ये अभिजातता येणार नाही.

लघुनिबंध

पावशा गो ऽ

अमरेन्द्र

कोकणांत लहाणपणीं आमची आई आम्हांला ती गोष्ट सांगायची (आता आपल्या नातवंडांना सांगते).

एक सासू होती. अर्थात् तिची सून पण होती. सुनेला माहेरीं न्यायला माघारी येऊन बसला. तिला माहेरीं निघायची अगदी घाई सुटली. सगळी तयारी झाली. बोचकीं बांधून अंगणांत आलीं. इतक्यांत सासूने म्हटलें, "गो सूनबाई, तेवढी गोठ्यांत जाऊन गुरांना पाणी दाखवून ये बघूं. केव्हांचीं तहानेलीं आहेत बिचारीं."

सुनेला त्याचा राग आला. पण करते काय ? सासूच्या शब्दांबाहेर जायची प्राज्ञा नव्हती तिची.

तिने निमूटपणे हातीं दूड घेतली. दोणींतलें पाणी काढलें. नि गोठ्यांत जाऊन कोठिंव्यांत ओतलें.

"इतकीं मेलीं गुरें–इतक्यांना पाणी पाजायचें म्हंजे किती उशीर होणार माहेरीं निघायला !' तिने विचार केला. आणि झटकन एक मोठा चांगला शेणाचा पोय उचलून त्या कोठिंव्यांत टाकला. चांगला कालवून तो शेणखळाच तिने गुरांच्या पुढे केला. कोण गुरुं नोंड लावणार त्याला ! सुनेला तेंच हवें होतें. कोठिंवा नुसता तिने त्यांच्यापुढून फिरवला. त्याला मुळीच वेळ लागला नाही.

पण सासूला संशय आला. तिने येऊन बघितलें कोठिंव्यांत तर शेणखळा. आधीच सासू; त्यांत फजाग; त्यांतून सून माहेरीं जायला निघालेली अन् तिच्याकडून हा अपराध !

सासूचा राग अनावर व्हायला वेळ लागला नाही. तिने तोच अवजड कोठिंवा उचलला अन् भिरकावला सुनेच्या अंगावर. वर्मी लागला तो तिच्या कपाळावर. आणि माहेर–घरीं जायला निघालेली तरणी सून अचानक देवाघरींच चालती झाली.

पावसाळ्याच्या तोंडाला एक काळसर लहानसें पाखरूं दिसतें. ती हीच मेलेली सून. तहानेल्या गुरांना पाणी प्यायला दिलें नाही म्हणून देवाने तिला शिक्षा केली. तें पांखरूं पावसाची वाट पाहात असतें. तोंडांत पावसाचें पाणी पडावें म्हणून तें तोंड उघडून बसतें. पण पहिल्या पावसाचा केवळ एकच थेंब त्याच्या पोटांत जातो. त्यांहून जास्त त्याला कांही मिळत नाही. कारण नंतर तो जो शेणखळ्याचा कोठिंवा तोच तिच्या तोंडावर येऊन आडवा पडतो.

तें पाखरूं जवळून निरखलें तर तसा कांहीसा आकार दिसतो खरा. चातक नि हा एकाच जातीचे की काय तें मात्र मला माहीत नाही.

पण कोकणांतल्या त्या पाखराला म्हणतात पावशा. आणि तो पावसाळ्याच्या प्रारंभीं जो आवाज काढतो तो असतो—' पावशा गो ऽ' 'पावशा गो ऽ.'

तरीपण कोकणांतला जमाना फारसा पालटलेला नाही. गोठ्यांतल्या गुरांची घरच्या माणसांइतकीच काळजी घेणारीं कुटुंबें तिकडे अजून दिसतात. कोठिंव्यांतून शेणखळा गुरांपुढे ठेवणारी सून अपवाद म्हणून सापडायची नाही असें नव्हे. पण तो अपवादच.

*

देशावरची गोष्ट निराळी. त्यांतून नागपूरची अगदीच वेगळी. या शहरावर खेड्याची दाट छाया पडलेली आहे. (अलीकडच्या प्रतिष्ठित साहित्य

शार्विलकांवर इंग्रजी ग्रंथकारांची 'छाप पडलेली' असते, तशाच अर्थी हें वाक्य घ्यायला माझी आडकाठी नाही!) आणि त्यामुळे शहरांत राहून खेड्याचा आनंद इथे उपभोगतां येतो! आम्ही राहातों त्याच्या दोहों अंगाला गुरें पाळणारे लोक आहेत. (–त्यांपैकी एकाचा वास्तविक व्यवसाय महाविद्यालय नांवाच्या आधुनिक प्रशस्त गोठ्यांत मुलें हाकणें हा असल्याचें समजतें.) इकडे गुरांना उन्हापावसापासून निवारा लागतो याची जाणीव नसावीसें वाटतें. कारण ११६ अंशावरच्या उष्णतेंतहि हीं गुरें भर उन्हांतच तळमळतांना दिसलीं. अन् त्याहिपेक्षा त्यांच्या तहानेबद्दल या मनुष्य मंडळींचा कांहीतरी गैरसमज झाला असल्याची शंकाहि आली.

परवा कचेरीला सुट्टी असल्याने घरींच होतों. तसल्या भयंकर उकाड्यांत झोप कसली येणार? तरी पण वामकुक्षी म्हणून थोडा लवंडलों. जरा डोळा लागला असेल नसेल, इतक्यांत जाग आली. आणि त्याचें कारण कोकिळेचें (कवि–कल्पित मधुर) कूजन नव्हतें, तर डाव्या अंगाच्या घरांतील म्हणजे अंगणांतील म्हशीने काढलेला तो वेडावाकडा आवाज होता. (म्हैस हा प्राणी कवि लोकांना प्रिय नसल्यामुळे त्याच्या आवाजांत माधुरी असल्याचा 'दिव्य साक्षात्कार' अजून तरी कोणा कवीला झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाही. तरीपण म्हशीच्या रेकण्यांत 'पिळवटलेल्या हृदयाची अनुभूति प्रतीत' होत असल्याचा अभिनव शोध एका 'लाल' कधीला लागला असल्याचें अलीकडेच समजतें.)––तेव्हा त्या म्हशीच्या रेकण्याने मी जागा झालों. आणि काय आश्चर्य सांगावें? म्हैस अशी अवेळीं का ओरडते म्हणून तपास केला, तेव्हा कळलें की तिला––दुसऱ्या कशाचीहि नसून—फक्त पाण्याची तहान लागलेली आहे.

मग, पाणी कां पाजीत नाहीत तिला? या प्रश्नाचें उत्तर इतकेंच मिळालें की 'सकाळचं पाजलंय् आता एकदम संध्याकाळीं.'

मला त्याचा अर्थच कळेना. पण वास्तविक कळायला कांही हरकत नव्हती. आपल्यासाठी दुसऱ्याला जिवंत राखायचें हाच त्याचा सरळ अर्थ.

गिरणीमालकाने गिरणी नीट चालावी, म्हणून मजूर पोसावेत. कामगाराचें जीवन सुखी व्हावें ही त्याच्या मनांत कल्पना तरी येईल कां? पण निदान त्यालाहि सुखाने दोन घास खातां यावेत असें तरी त्याला वाटतें काय? त्याचें लक्ष नफातोटा–पत्रकावर असतें. गिरणींतल्या यंत्रांना वंगण द्यायचें, तसेंच कामगाराला वेतन. गिरणीसाठी यंत्र––त्याला वेगळें अस्तित्व नाही, त्याला स्वतंत्र जीवन नाही. कामगारांची स्थिति तरी यापेक्षा वेगळी काय असते? वेगळेपणाच सांगायचा झाला तर तो बंड करून उठतो इतकाच. बाकी त्याला मालकासाठीच जगविलें जातें.

मळ्यावरचा मजूर, शाळेंतला शिक्षक किंवा कचेरींतला कारकून यांचें जगणें तरी काय निराळें असतें? दुसऱ्या कोणाचें तरी जीवन सुखी नि समृद्ध करण्यासाठी यांनी जगायचें.—नोकरीचा रगाडा फिरवीत राहायचें. त्यांतून गळणारा उसाचा गोड रस पिणारे वेगळे नि त्यापासून मिळणाऱ्या पैशाचे धनी होणारे तेहि निराळे. त्यांपैकी कशाशीच याचा संबंध नाही. इक्षुरस पिऊन संतृप्त होणाराला किंवा त्याच्या पैशावर ऐषआराम करणाराला कोणालाच रगाडा फिरवणाऱ्या बैलांची कांही जाणीव होते का? रगाडा ओढण्यापुरतें चिपाड—त्याच रगाड्यांतील निघालेलें—त्याच्यापुढे फेकलें नि जगण्यापुरतें पाणी त्याच्यापुढे केलें की, तो विनतक्रार रगाडा ओढीतच राहातो. उसावरोबरच बिचाऱ्या बैलाची जीवनशक्ति पिळली जात असते— अन् रस पिणाऱ्यांची नि पैसे खाणाऱ्यांचीं पोटें तुडुंब भरत असतात. त्यासाठीच, केवळ त्याकरिताच त्या बैलाला जगविलें जात असतें.

कैदी कशासाठी जगतो? शिक्षा भोगून संपविण्यासाठी. पण त्याची शिक्षा निदान जिवंतपणीं तरी संपायची असते. कामगार–कारकुनांचें तेवढेंहि भाग्य नाही. त्यांची सुटका एकदम अखेरीला.—एकदम शेवटचीच काय ती! ब्रिटिशांच्या राजवटीला आपण शिव्या देतों. साम्राज्य चालविण्यासाठी हिंदी माणसें त्यांनी फक्त जिवंत ठेवलीं असें आपण म्हणतों.

पण मला वाटतें— सनातन नसला तरी—हा फार पुरातन न्याय आहे. गुलाम कामाला उपयोगी पडावेत

म्हणून त्यांना अन्नपाणी द्यायचें. जेमतेम ते जगतील, कामाला उभे राहातील इतकेंच, एवढेंच. कारण गुलाम हा बोलून चालून गुलामच. दास केवळ चाकर. धन्यासाठी जगविला जाणारा एक प्राणी. त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही. वेगळें जीवन नाही. अर्थातच त्याच्या जीवनाला आवश्यक काय व किती हें ठरविण्याचें कामहि त्याचें नव्हे. धन्याला वाटेल तेवढें नि तितकेंच त्यानें खावें, प्यावें, ल्यावें, नेसावें.

'सुधारलेल्या' विसाव्या शतकांत या 'गुलामां'चीं नांवें बदललीं इतकेंच काय तें. पूर्वीच्या 'राजमंडळा'ला आज प्रधानमंडळ नाही का म्हणत आपण? आणि जुलमी अधिकारी 'जनतेचा सेवक' नाही का म्हणवून घेत स्वतःला अलिकडे? केवळ शब्द बदलल्यानें अर्थ थोडेच पालटणार? अन् वृत्तींत सुधारणा घडल्याविना अर्थांत तरी कसा फरक पडणार?

परकीय ब्रिटिश नेत्यांनी जें केलें त्यापेक्षा स्वकीय भारतीय नेत्यांनी आज काय वेगळें घडविलें?

हा प्रश्न मनांत डोकावून जात नाही असें थोडेंच आहे!

"पक्षियाचे घरीं नाही सामग्री।
त्याची चिंता करी नारायण॥"

असें तुकारामबुवा म्हणाले. त्याचा आचार आज अनायासेंच आपल्या हातून घडतो आहे. कारण आम्हां मानवी पक्षांचे घरीं सामग्री कसलीच शिल्लक उरत नाही. (कांही असेलच तर, ती उद्याच्या, नव्हे पुढल्या घटकेच्या चिंतेची!) त्याची चिंता नेहरूंना असली नसली तरी नारायणाला आहे असें आपण समजूं या...

✳

देशासाठी जगायचें हें तर बरोबरच आहे. पण जीवघेण्या उन्हांत तळमळणाऱ्या गुरांना फक्त 'एक सूबे और दूसरे श्यामको' पाणी पाजणारा 'डेअरीवाला' व्यापारी; आणि आपल्या मुक्या जनावरांवर पोटच्या पोरांसारखी माया करणारा जातिवंत शेतकरी यांच्यांत आकाशपाताळाइतकें अंतर नाही का?

झप् झप् पाय उचला! (पान ५८ वरून)

महेंद्राच्या बाजूला माझी चारू होती...

या नंतर वर्षभरांतच मला क्षयाची भावना झाली. क्षय म्हणजे आजकाल मोठा दुःसाध्य रोग नाही...पण मला मात्र कोणत्याच औषधानं गुण येत नाही. आमच्या डॉक्टरांनी हात टेकलेले स्पष्ट दिसतात. या सॅनिटोरियमची बादशाही मिजास या राजयक्ष्म्यासमोर फिक्की पडली आहे ..सगळयांच्या इच्छेविरुद्ध नाचणीला शब्द धाडून हा मेणा मी मागवला...

मला नाचणी मोह घालते. नाचणीची आर्त हाक इतरांना कशी कळणार! मला तिथल्या कपाटांतलं छायाचित्र पाहायचं आहे. भद्रेचं वाकण, बांबूचं वन, माझी खोली, वृद्धाचं मस्तक मला पहायचं आहे. दोऱ्या वळणारे, गवळी, होडगं, टेकड्या फक्त पहायच्या आहेत...फक्त पाहायच्या!

--हा वास कशाचा? नाचणीच्या प्रसिद्ध अशा तिखाडीच्या गवताचाच! त्या रंगीत इवल्याल्या रानचिमण्या नक्कीच बांबूच्या वनांत आपले खोपे शोधायला निघाल्यात. म्हणून म्हणतों...

नाचणीकर भोयांनो! झप्झप् पाय उचला...

आईच्या गोष्टींतल्या त्या बिचाऱ्या पावशाची मला नेहमी आठवण होते. आणि मग मी मनाला प्रश्न करतों— माझ्या या देशांत लक्षावधि पावशे सुखस्वास्थ्याच्या पावसाची वाट पाहात बसले आहेत. त्यांनी मागल्या कोणत्या जन्मीं सूनपणांत गुरांना शेणखळा दाखवला होता देव जाणे. पण या जन्मीं तरी त्यांच्यावर 'पावशे'पणाचा प्रसंग आलेला आहे, एवढें खरें. त्यांच्या तृषार्त मुखांत पावसाचा तो एकेक थेंब तरी कधी पडणार आहे?—कधी पडणार आहे?

"—गाढव कुठला !"

नाना जोग

साठी उलटलेला आमचा जागोबा, बहुधा बागेतलं गवत मंदगतीनं खुरचत कुठेतरी खाली मान घालून बसलेला तुम्हाला दिसेल. त्याला नीटसं दिसत नाही. त्यामुळे कधीकधी चुकून तो बागेंतलीं लहान-सान फुलझाडं नि रोपटीं खुरपून काढतो. रोपांना पाणी घालताना त्यांतलीं कांही तुडवतो, मोडून ठेवतो. त्याची ही चूक त्याच्या ध्यानांत आलीच तर मोडलेलीं रोपटीं तो पुन्हा जमिनींत खोचून ठेवतो! कालान्तराने तीं कोमेजतात, आणि त्यांना उपचार करूं गेलों तर माझ्या हातांत येतात. मग जागोवाला जाब विचारला म्हणजे तो सांगतो की बागेंत शेजारचीं कुत्रीं येऊन धामधूम करतात. हें खरंहि आहे, पण हा कार्यकारणसंबंध नेहमीच पटण्यासारखा नसतो. आणि त्याच्याशीं हुज्जत घालायला गेलों तर तो दुसरीकडे निर्विकारपणें रहात मुक्यासारखा उभा रहातो.

ज्या पडक्या खोपड्यांत राहायला आम्ही त्याला जागा दिली आहे तें स्वच्छ ठेवणं जणूं त्याचं कामच नव्हे. एखाद्या सणावारीं त्याची झाडसारव तो करतो. बागेंतली स्वच्छता, केवळ पोटापाण्याचा धंदा म्हणून, निव्वळ मोलासाठी, माझा हुकूम म्हणून तो पाळतो. स्वच्छतेची हौस अशी त्याला नाही. 'हौसेला मोल नाही' हें एका निराळ्या अर्थानं त्याच्या बाबतींत खरं आहे. त्याच्या अंगांतला एकमेव सदरा तो जेव्हा नळाखाली बसतो तेव्हाच निघत असतो. त्याच्या पोषाखांत बदल झाल्याचं मला तरी आठवत नाही.

त्याच्या साऱ्या नातलगांशीं त्याचं वाकडं आहे. त्यामुळे तो बहुधा एकटाच असतो. एखाद्याच्या संगतींत तो दिसलाच तर चिलीम फुंकण्याकरता.

त्याचं पहिलं दर्शन मला घडलं त्या वेळच्या त्याच्या अवस्थेचं अगदी तपशीलवार वर्णन मी करूं शकेन, पण "उदार साहित्य, उपयुक्त ज्ञान, उन्नत जीवनमार्ग" अशासारख्या 'उ' माळयाच्या प्रासादिक बैठकीवर तें बसायचं नाही. त्या वेळीं चिंध्यांच्या गुंतागुंतींत स्वतःला गुरफटून, उघड उघड अखाद्य असं अन्न मनापासून खात, तो शेजारच्या एका पडक्या व रिकाम्या छपरींत बसला होता. त्याची कीव मला आली ह्यांत नवल नाही, आणि एखादा फुटका पैसा त्याच्या अंगावर भिरकावून मी माझ्या उन्नत जीवनमार्गाला लागलों असतों तर तो माझा धर्मच ठरला असता. परंतु त्याच सुमारास आमच्या साहित्यसंस्थेला एक 'स्वस्त माणूस' हवा होता, म्हणून मी जरा खोलांत शिरलों. तेव्हा कळलं की त्याच्या जातीचे व अगदी जवळचे असे बरेचसे आप्तस्वकीय त्याला आहेत, पण (मला अनाकलनीय अशा कसल्यातरी घटनेंत) त्याचा मानभंग त्यांनी केल्यापासून तो त्यांच्याशी फटकून होता. बिंदुमात्र मानबिंदूची ही नाट्यपूर्ण करामत जशी माझ्या चोखंदळ नजरेंत भरली, तसाच त्याच्यामागे त्याचं लटांबर नाही हा त्याचा सोईस्कर अहम्‌विशेषहि माझ्या चाणाक्ष नजरेंतून सुटला नाही. सारांश, आमचा सौदा ठरला. पगार दरमहा रुपये पंधरा; कार्यालयाची झाडलोट करणें, आवारांत स्वच्छता ठेवणें, गुराढोरांपासून बागेचें

रक्षण करणें, आणि झाडांना पाणी घालणें; हीं हलकीं कामें व कलमें ठरलीं. सर्वच दृष्टींनी इतका जुळणारा माणूस शोधूं जातां मिळाला नसता—फार बरं वाटलं ह्या घटनेचं. मेलेल्या माणसाच्या पिंडाला कावळा शिवला तर दुःखांत सुख होतंच की उत्तराधिकाऱ्याला!

अशा रीतीने हा माणूस 'आमचा' झाला. पण आमच्या पहिल्या मुलाखतींत आपुलकीचा जो उत्कृष्ट अभिनय मला सावला होता त्यावर विश्वास ठेवून, एकाच महिन्याच्या आंत त्यानं मला अगदी सोप्या भाषेंत कळवलं की त्याचा पगार त्याला पुरणार नाही. एका महिन्याच्या आंत पगारवाढ? कुठेतरी कोणी पाहिली आहे का? तरीहि जागोबाची समजूत काढणं मला साघलं नाहीच. त्याचा तो पगारवाढीचा अर्ज, जेव्हा जेव्हा मी त्याच्याकडे पाहीं तेव्हा तेव्हा मला वाचावा लागे. कार्यकारी मंडळाची संमति, नंतर अध्यक्षांना अधिकारदान, त्याबरहुकूम चिटणिसांना आदेश, तेव्हाच त्या पगारवाढीला ऑडिटरची मान्यता, अशा 'रीतसर मार्गांनीच त्या अर्जाची वाट लागणार होती. पण एक दिवस मला युक्ति सुचली—(त्या युक्तीबद्दल जागोबा माझा सदाचा ऋणी आहे!) "येत्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीच्या वेळीं तूं स्वतःच जाऊन आपली कैफियत त्यांच्यापुढे मांड" असा कुशल सल्ला मी त्याला दिला तेव्हा कुठे आम्ही दोघे एकमेकाशीं मोकळेपणाने वागूं लागलों. ठरल्या दिवशीं त्याची नक्कल त्याच्याकडून दोनचार वेळा म्हणून घेतली. हरीभाऊ नेन्यांना मी माझ्या व्यूहाची आगाऊ कल्पना देऊन ठेवली होती म्हणूनच बरं झालं. कारण जागोबाचा मेक-अप् आणि मुद्राभिनय चांगला 'वठला' असला तरी रंगभूमीवर प्रवेश करतांच तो आपली नक्कल विसरला आणि नुसता हस्तपादांदोलन करीत उभा राहिला. अखेर हरिभाऊंनीच त्याचीं वाक्यं म्हटलीं, आणि तियं जमलेल्या, सारे गुंतागुंतीचे शास्त्रार्थ निश्चित करणाऱ्या, शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी जागोबाच्या अनिश्चित अर्थशास्त्राची गुंतागुंत तीन रुपयांनी उकलली. आभार प्रदर्शनाचं भाषण न करतां, वाढलेल्या दाढीमिशांच्या जंगलांतून स्मिताचा एक बारीकसा किरण झळकवीत जागोबाने बहिर्गमन केलं. त्याला दरमहा तीन रुपयांचं "प्रमोचन" मिळालं होतं—

तरीहि त्याचं पोट भरूं शकत नाही हें कुणाला माहित नाही? ज्याच्याशिवाय आपलं भागत नाही त्यालाच आपण पोटभर देत नाही ह्या विसंगतीवर मी चडफडतों. पण माझ्या संतापाला वाचा फुटते ती मात्र जागोबाच्या हातून घडलेल्या लहानशा अपराधाच्या निमित्तानंच. मागाहून ह्याहि विसंगतीचं वाईट वाटतं, आणि "पश्चातापेन शुद्धता" ह्या शास्त्रवचनाला जेव्हा मन टेकतं तेव्हाच त्याला थोडा आराम वाटतो.

अशा प्रसंगीं मला खजील करण्याचे त्याचे मार्ग मोठे विनतोड असतात. अतिशय विनयानं खाली मान घालून तो माझ्याजवळ येऊन उभा होतो आणि माझा एखादा जुना फाटका सदराच मला मागतो. "बाईनं तो बोहारणीला दिला" असा मोठा चलाख युक्तिवाद करून मी त्या प्रसंगांतून निसटतों हें जितकं खरं तितकंच, आपला फाटका सदरा त्याला फिट्ट होईल या कल्पनेची शिसारी वाटते हेंहि खरं. मग, त्याला सांगितलेल्या असत्या अर्धसत्याचं प्रायश्चित्त म्हणून मी आमच्या बागेंत क्वचित उगवणारे एक दोन दोडके, अळूं किंवा वांगीं त्याला बहाल करतों. पण तेवढ्यावर माझं नष्टचर्य संपत नाही. तो त्या भाज्या घेण्याचं नाकारतो. साहजिकच मी त्याला कारण विचारतों. त्यावर तो म्हणतो—अगदी संतुष्ट मनानं म्हणतो—"पुढल्या पगारीं मी दारे अन् चीच आनल तव्हा द्याजा."

पुढच्या पगारीं! पण तोंपर्यंत हा उपाशी का राहाणार आहे? आजहि कांहीतरी खातच असेल ना तो? काय खांत असेल? असले प्रश्न मला पडतात. मात्र ते मी त्याला विचारीत नाही. त्याच्या उत्तराची भीति वाटते--त्याच्या रसिकतेचा मत्सर वाटतो, त्याच्या संतोषावर मी संतप्त होतों. आणि त्याच्या हातून एखादी नजरचूक घडतांच--

एकदा असंच झालं. पहाटे कुणीतरी आवाराचं फाटक उघडं टाकलं होतं. जवळपासच्या बकऱ्या सरळ आंत शिरल्या आणि मोठ्या खटाटोपानी मिळवलेलीं व जपून वाढवलेलीं आमचीं कांही झाडं त्यांनी न्याहारीखातर चवरचबर फस्त केलीं. मी कामावर येऊन पाहातों तो हा प्रकार! माझा संताप अनावर झाला. गुराढोरांपासून झाडांचं रक्षण करणं हें त्याचं कर्तव्यकर्म

हीतं—"तुझे डोळे फुटले होते कां ?" असा तिरकट सवाल मी त्याला केला. पण परिणाम ? देवांच्या अंगावरचे दागिने चोरानं काढून नेले म्हणून त्यांच्यावरच संतापणाऱ्या यजमानाच्या वाग्बाणांचा देवांवर जितका परिणाम होऊं शकेल तितकाच ! तेव्हा माझ्या ध्यानांत आलं की जागोबाचे डोळे फुटले नसले तरी मिटल्यागतच आहेत. पण ती समस्या पुरी केल्याशिवाय कविवर्य तिथून हटणार होता थोडाच ! "–गाढव कुठला !" असा शेवटचा 'चरण' हाणून पाय आपटत आमची स्वारी तिथून चालती झाली.

पण जागोबा कसला !—त्यानं ह्या प्रकारानंतर फार वेळ जाऊं दिला नाही. मी कामाचे कागद पाहात बसलों असतांना, खाली मान घालून संथ पावलांनी तो 'गाढव' माझ्या शेजारीं येऊन उभा झाला नि म्हणाला, "मालक, मी हजामत कराथले जरा चौकावर जाऊन येऊं का जी ?" मान वर न करतां मघाच्या रागाशीं सुसंगत अशा तुसडया आवाजांत 'मालक' खेकसला "जा !"

आणि आश्चर्य हें की मी त्याला "जा ! " म्हटलं तरी तो गेला. खेकसून 'जा' म्हणणं आणि सौम्य आवाजांत 'जा' म्हणणं ह्यांतला ध्वन्यर्थहि त्या गाढवाला कळूं नये ! जाण्यापूर्वी सकाळच्या त्या घटनेबद्दल निदान औपचारिक क्षमायाचना तरी ? ती तर राहोच, पण परवानगी मागायला आला तीसुद्धा कशाची ?—हजामत करायची ! गाढवाची हजामत ! कधीतरी कुणी केली आहे काय—पाहिली आहे काय ?

नाही ना ? मग मी तरी त्याला गाढव कसं म्हटलं ? कुणी पाडली ही माणसाला गाढव म्हणण्याची प्रथा ? गाढवाच्या अशा कोणच्या लक्षणामुळे पाडली ? हा दीडशहाणा कोण होता ?—झालं, 'गाढवा'ने माझंच डोकं खुरपायलं सुरुवात केली ! गाढवाच्या रूपकाची उपपत्ति लावण्याची अपात्ति मी स्वतःवर ओढवून घेतली. पण त्या आपत्तीचं कारण होतं. मी गाढवाबद्दल आपल्याच मनाशीं विचार करत बसलों नव्हतों—प्रत्यक्ष गाढवच माझ्या दृष्टिपथांत उभा होता. खिडकीच्या बाहेर तो मला दिसत होता. जागोबा नव्हे—खरोखरचाच एक गाढव सडकेच्या बाजूस उकिरडयावर उभा होता. मी त्याचाच अभ्यास करीत होतों—

त्याचे उजवीकडचे दोन्ही पाय एकमेकाच्या जवळ ओढून दोरीने बांधलेले होते. त्याला मोकळं मटकतां येऊं नये म्हणून माणसाच्या डोक्यानं गाढवाच्या पायावर ही अशी मात केली होती. आणि तो–तो बहुतकरून, उकिरडयावर पडलेला आमचा काव्य–शास्त्र–विनोद, कोळशाच्या फोडी तोंडीं लावून चघळत-चघळत, रसनिर्मिति करीत, माणसाचं ऋण फेडीत होता. त्याच्या अंगावरचे केस ऊर्फ जटा कोणीहि कधीहि कापण्याची तसदी घेतली नव्हती. त्याला खरारा करणं, त्याच्या मांडयांना लोणी लावणं, किंवा कोणत्याहि अर्थी त्याच्यावर 'पैसे लावणं' कोणीहि कधीहि केलं नव्हतं. त्याच्या शेजारीं त्याची मालकीण—म्हणजे कुंभारीण—कंटाळल्यासारखी उभी होती. तिच्या हातांत फावडं होतं, त्याच्या पाठीवरच्या गोणींत रिकामं घमेलं होतं. गाढवाची कामावर जाण्याची वेळ झाल्यासारखं तिच्याच तोंडावर दिसत होतं. पण त्याच्या पोटापाण्याची सोय परभारें करणारी ती मालकीण एकीकडे तो विनखर्चाचा शिधा त्याला खाऊं देत होती तरी दुसरीकडे तो गिळायला किती वेळ लावतो आहे म्हणून मनांतल्या मनांत चडफडतहि होती. अखेर आपल्या हातांतलं फावडं त्याच्या पाठीच्या कण्यावर सहज आपटून ती त्याला म्हणाली, "चल ना वे ! माटीमिला कितना खाता है ! "

माटीमिला ! मला एकदम लख्ख प्रकाश दिसला. अच्छा !— म्हणजे गाढवाला शिवी द्यायची झाली तर त्याला 'गाढव' म्हणतां येत नाही एकूण ! बरोबर आहे— हजामाला 'हज्जाम' म्हणणं किंवा माणसाला 'आदमी' म्हणणं शिवी देण्याच्या क्रियेंत सोईचं नसतंच. 'गाढवा'ची संगति इथपर्यंत लागली, पण माणसांतल्या कोणत्याहि अवगुणाबद्दल त्याला गाढव म्हणण्याचा प्रघात, इतर सगळे प्राणी सोडून, कोणी पाडला ? कां पाडला ? गाढवानं त्याचं असं कोणतं घोडं मारलं होतं ?

मग असं सुचलं की कोणताहि नियम त्याच्या अपवादामुळे सिद्ध होतो. म्हणून ह्या नियमाला अपवाद धुंडाळूं लागलों. सारं जग गाढवाला हिणवत आलं आहे, आणि माणसाचा धिक्कार करण्यासाठी गाढवाला हाताशीं धरत आलं आहे. ह्या जागतिक नियमाला कोणीच का अपवाद नाही ? विचार करतांकरतां दोन

अपवाद आठवले— एकोणीस शतकांपूर्वीचा येशूख्रिस्त एक, आणि आजचे विनोबाजी दुसरे. ह्या दोघांनाहि गाढवाचं भारी कौतुक !

साऱ्या भूतमात्रांवर प्रेम करायचं म्हणून 'सब घोडे बारा टक्के' या न्यायानं गाढवालाहि त्यांनी जवळ केलं असं नसून, गाढवावर त्यांचं विशेष प्रेम असल्याची आख्यायिका आहे. असं करायचं कारण किंवा धोरण काय असेल तें त्यांचं त्यांना ठाउक, पण गाढवाच्या अंगचीं जीं 'संताचीं लक्षणें' नागपुरांतला पहिला गाढव पाहिल्यापासून आजतागायत माझ्या नजरेला येत गेलीं, तीं सुद्धा ह्या द्रष्ट्यांच्या दृष्टींतून निसटलीं असणं शक्य नाही असं मला वाटतं. आता, 'सवय ज्ञानाला भ्रष्ट करते' म्हणतात त्याप्रमाणे केवळ सवयीमुळे मीहि शिवीसाठी गाढवाचा 'शिष्ट' संमत उपयोग करीत असतों हें खरं आहे. तरी सुद्धा एखाद्या माणसाचा 'गाढव' म्हणून धिक्कार करीत असतांना खुद्द गाढवाचा मी धिक्कार करीत नसतों हेंहि तितकंच खरं आहे—आणि म्हणूनच तर मला प्रश्न पडला की गाढवासारख्या सुलक्षणी प्राण्याचा तिरस्कार ज्या कोण्या महाजनाने पहिल्या प्रथम केला असेल तो कां? तंबाकूची सुरळी करून तिच्या एका टोकाला ओठ लावायचे व दुसऱ्या टोकाला आग लावायची आणि नंतर तिचा धूर सरळ बाहेर सोडण्याऐवजी प्रथम आंत ओढून मग बाहेर सोडायचा, ह्या, विचारान्तीं पोरकट वाटणाऱ्या प्रकाराला आज समाजांत प्रतिष्ठा प्राप्त झाली असली तरी ज्या कोणी ही शक्कल प्रथम काढली असेल त्याची अक्कल नेमकी ह्याच प्रकाराकडे कां वळली हें कोडं शिल्लक राहातंच !

गाढवाचा तिरस्कार-धिक्कार करणाऱ्यांत पहिला नंबर कोणाचा, ह्या कोड्याचं उत्तर मला जागोवाकडूनच विचारान्तीं मिळालं. आपली शीव संपली म्हणजेच आपण शिवीवर येतों. ज्याच्यापुढे आपला निरुपाय होतो, ज्याच्यापुढे आपल्याला हात टेकावे लागतात, हार खावी लागते, किंवा एखादी सिद्धि आपल्याला प्राप्त व्हावी म्हणून तपश्चर्या करूनहि पराभूत झाल्यानंतर तिचं अकृत्रिम, नैसर्गिक अस्तित्व ज्याच्या ठिकाणीं आपल्या प्रत्ययाला येतं, त्याचा आपण हटकून मत्सर करतों; आणि त्याचा सामाजिक दर्जा ज्या प्रमाणांत आपल्या दर्जापेक्षा कमी असेल त्याच्याशीं व्यस्त प्रमाणांत आपण मत्सर-ग्रस्त होऊन, शेपम् कोपेन पूरयेत् ह्या पराभूतनीतीचा अवलंब करतों. नियम हाच आहे. आणि येशूख्रिस्तासारख्या अपवादामुळे ह्या नियमाला बळकटी येते.

गाढवासारख्या शांत, गरीब, सभ्य, प्रांजल, तटस्थ, उदासीन वृत्तीच्या खाण्यापिण्याच्या खोडी नसलेल्या, कोणाच्याहि ना अध्यांत ना मध्यांत अशा स्वभावाच्या, कसल्याहि फळाची आशा न धरतां काम करणाऱ्या, कसलंहि ढोंग, लांगूलचालन किंवा लाघवीपणा न करणाऱ्या, खाली मान घालून कुठेहि आपल्याच तंद्रींत रमणाऱ्या विदेही फकीराचा तिरस्कार करणारा पहिला माणूस विश्वामित्रासारखा तपोभ्रष्ट, तापट हटवादीच असला पाहिजे. गाढवासारख्या कनिष्ठ श्रेणींतल्या प्राण्याच्या ठिकाणीं वसत असलेले, हे नैसर्गिक सद्गुण पाहून मत्सराने त्याच्या अंगाची लाहीच झाली असली पाहिजे, आणि एखाद्या भ्रमिष्टा-सारखा तो त्याला नुसताच वेडावीत सुटला असला पाहिजे. एरव्ही गाढवाच्या निसर्गदत्त लांब कानाबद्दल त्याला टोमणे देण्याचं कारणच काय? गांधींसारख्या 'काला आदमी'पुढे हात टेकल्यानंतर सार्वभौम चर्चिलने त्यांना 'अर्धनग्न फकीर' म्हणून नुसती शिवी देणं क्रमप्राप्तच होतं. जो ध्येयवादी मार्क्स, सावकारी करणं तर राहोच पण स्वतःचे कपडे गहाण ठेवूनच कसाबसा जगत होता, त्याच्या तेजानं दिपलेला पराक्रमी हिटलर त्याला त्याच्या 'ज्यू' जातीवरूनच शिव्या देत सुटला हें तरी कशाचं लक्षण !

श्रेष्ठ पदावरच्या माणसाची कनिष्ठ श्रेणींतल्या फकीरी वृत्तीच्या माणसापुढे जर ही गत, तर मुक्या गाढवापुढे काय होत असेल ! एकीकडे त्याला स्वखर्चानें कांहीहि खायला द्यायचं नाही, आणि तो निरुपायानें कागद, कोळसे, चिंध्या खाऊन उदरनिर्वाह करूं लागला तर 'गाढवाला काय गुळाची चव' म्हणून त्याचं हसं करायचं— एकीकडे त्याच्या पाठीवर गोण्या लादून स्वतःचं घर भरायचं, आणि दुसरीकडे 'यथा खरश्चंदन-भारवाही भारस्य वेत्ता न तु चंदनस्य' म्हणून त्याच्या

पाठींत लाकूड घालायचं आणि त्यांतच आपल्या 'संस्कृती'ची धन्यता मानायची ! आणि अशा श्रेष्ठ पदावरच्या महाजनांनी हा लगुड-गर्दभ-न्याय आखून दिल्यानंतर त्या मार्गाचा इतरेजनांनी पंथ म्हणून स्वीकार करायचा !— ह्याच्यासारखं हास्यास्पद दुसरं काय असूं शकेल !

एकूण साऱ्या विचारमंथनाचा निष्कर्ष हाच की आपण शिवीवर आलों म्हणजे आपल्याला एखाद्या गाढवाची बाधा झाली आहे हें निश्चित समजावं; आपल्या बुद्धिभ्रंशाचं, डोक्याच्या पांगळेपणाचं, रिकेट्सचं लक्षण समजावं; आणि ह्या रोगावर रामबाण उपाय म्हणून गाढविणीचंच दूध प्यावं. कोणताहि सूज्ञ डॉक्टर ह्याच औषधाची शिफारस करील. एका गाढविणीपासून एका वेळीं एक-दोन बोंडल्यांपेक्षा जास्त दूध मिळणार नाही, पण त्यावद्दल तिला नांवं ठेवूं नयेत. याशिवाय, कोणत्याहि वस्तूचा अर्क एकाच वेळीं पोटभर पिणं धोक्याचं असतं हें काय आपल्याला कळत नाही ?

* * *

जागोवा दाढी करून परत आला. त्याच्या दाढीचं त्याच दिवशीं काय प्रयोजन होतं तें मला कळलं. तो आपल्या खुरपी-कोयत्याची पूजा करीत असलेला मला दिसला. लागलीच माझ्या हिशेबी मनांत धूर्त संशय उद्भवला की हा लवकरच आपल्याला इनाम मागणार ! पण, जागोबानं पाजलेल्या अर्काचा परिणाम म्हणा, कांहीहि म्हणा, लगेच मी माझ्या त्या धूर्त मनाला एक थप्पड देऊन विचारलं, "काय चुकलं रे त्याचं इनाम मागण्यांत ? तुला वर्षाच्या वर्षी हक्काची पगारवाढ नको ? कुठं एखाद्या परगावीं कामानिमित्त जाण्याचा प्रसंग आला तर तुला नको का भत्ता ? त्या भत्त्यांतले पैसे वाचवून आपल्या छकड्यासाठी खेळणीं-खाऊ आणायचीं स्वप्नं तुला नाही का पडत ? शिवाय चार आणे जागोबाला दिलेस तर त्याच्या चेहऱ्यावर जें समाधान पाहण्याचं भाग्य तुला लाभेल तें बॅंकेतल्या तुझ्या शिल्लकीकडे पाहून तुझ्या चेहऱ्यावर कधीच झळकायचं नाही—बघ तरी !"

शेवटीं मन बेचैन होतं तें ह्या विचारानी की जागोबा निरक्षर आहे, त्याच्यावरचा हा लेख तो ह्या जन्मांत वाचणार नाही ह्या खात्रीमुळेच मला तो लिहायचं धैर्य झालं असेल, आणि तरीहि कोणी जर त्याला सांगितलं की मी असा असा लेख त्याला उल्लेखून लिहिला आहे तर तो हेंच म्हणेल—"मालकाची गोष्ट मले तुम्ही सांगता का जी ? मालकासारखा लाख माणूस नाही ! "

स्वस्त माणसाकडून लाख माणसाविषयी हे उद्गार ! किती लज्जास्पद !

अनुक्रमणिका

संघवार्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

कार्यकारी मंडळाची सभा, रविवार दि. ४-१०-१९५३ रोजीं सकाळीं ८-३० वाजता प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली. सभेंत महत्त्वाचें खालील कामकाज झालें.

१. दि. १९-७-१९५३ रोजीं भरलेल्या का. का. मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविण्यांत आला व तो मंजूर झाला.

२. सरचिटणिसांनी गेल्या तीन महिन्यांत झालेल्या कार्याचें निवेदन केलें. (अ) म. प्र. प्रिमियर कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटींत सेव्हिंग बँक अकाऊंट खातें उघडण्यांत आलें असून पांच हजार रुपये जमा करण्यांत आले आहेत असें त्यांनी सांगितलें. त्यास एकमताने मान्यता देण्यांत येऊन, वि. सा. संघाने या म. प्र. प्रि. को. हाऊसिंग सोसायटीचा एक शेअर घेऊन सभासद व्हावें असें ठरलें. (ब) पूर्वी स्थापना झालेल्या आगरकर समितीच्या कार्याची माहिती मिळवून, पुढील कामाचा निर्णय घेण्यांत यावा, असें ठरलें. (क) डॉ. वासुदेवराव गणेश शिंगणापूरकर यांनी साहित्यपारंगत या परिक्षेंत पहिल्या वर्गांत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांस दरवर्षी २५ रुपयांपर्यंत पारितोषिक देण्यांत यावें म्हणून वि. सा. संघाला ५०० रु. दिले. त्याबद्दल डॉ. शिंगणापूरकरांचे आभार मानण्यांत आले. ही रक्कम म. प्र. प्रि. को. हाऊसिंग सोसायटीमध्ये पांच वर्षांसाठी फिक्स्ड डिपॉझिट म्हणून ठेवण्यांत यावीं असें ठरलें. (ड) महाराष्ट्रसाहित्य परिषदेच्या वाङ्मयेतिहास योजनेसंबंधी, संघाध्यक्षांनी सूचना सुचविण्याबद्दल जी उपसमिति नियुक्त केली, तिला का. का. ने अधिकार देऊन तशा सूचना म. सा. परिषदेकडे पाठविण्यास संमति दिली. (इ) प्रकाशन समितीने आगरकरकृत 'विकारविलासित' हें नाटक शक्यतितक्या लवकर छापण्याचें काम हातीं घ्यावें असें ठरलें.

३. परीक्षा समितीचे संचालक प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी वर्षाअखेरपर्यंत रु. ४५० जादा खर्च येणार असल्याचें सांगून, या जादा रकमेच्या मंजूरीसाठी काय योजना करावयाची याची पृच्छा केली. परीक्षा समितीच्या कार्याचा विस्तार लक्षांत घेऊन तूर्त ही रक्कम किरकोळ खात्यांत मंजूर झालेल्या रकमेंतून खर्च करण्यांत यावी, याला कार्यकारी मंडळाने एकमताने संमति दिली: पण तसेंच या रकमेस साधारण सभेचीहि मंजुरी घेण्यांत यावी, असा निर्णय सभेने घेतला.

श्री. द. शं. फडके यांनी पहिल्या तीन परीक्षांच्या पुस्तकांचा संग्रह परीक्षाकेंद्राला पुरविण्यांत यावा असें सुचविलें. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत याची तरतूद करण्यांत यावी असें ठरलें.

४. उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांनी राजभाषा अधिनियमासंबंधी करण्यांत येत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. राजभाषा अधिनियमासंबंधीच्या सरकारी पत्रकावरहि विचार करण्यांत आला. शेड्युल दोन, सेक्शन ३ व ४ amend करण्यांत यावेत व त्यासाठी योग्य ते प्रयत्न करून दखल घेण्यांत यावी असें ठरलें.

मध्यप्रदेश सरकारने जो 'प्रशासन शब्दकोश' प्रसिद्ध केला, त्याची छाननी करून, सूचना व दुरुस्त्या करण्यासाठी खालील उपसमिति नेमण्यांत आली.

आमंत्रक : श्री. ह. ना. नेने.

सभासद : डॉ. शं. दा. पेंडसे; प्रा. ग. त्र्यं. देशपांडे; डॉ. मा. गो. देशमुख; प्रा. पां. कृ. सावळापूरकर व श्री. द. शं. फडके.

या उपसमितीला जादा सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार देण्यांत आला.

५. चिटणीस, इंडियन नॅशनल कमिशन, भारत सरकार यांजकडून अभिजात ग्रंथांच्या भाषांतराविषयी दोन ग्रंथांची शिफारस करण्याबद्दल दि. ४-८-१९५३ चें जें पत्र आलें, त्याचा विचार होऊन 'पण लक्षांत कोण घेतो !' आणि कीचकवध' या दोन पुस्तकांच्या शिफारशीस का. का. ने मान्यता दिली.

* *

संघशाखा उपनियम समितीची सभा

संघशाखा उपनियम समितीची सभा दि. ४-१०-५३ रोजीं केन्द्रीय कार्यालयांत भरून, संघशाखा नियमांचें स्वरूप कसें असावें ह्याबाबत सर्वसामान्य चर्चा झाली. त्यानुरोधाने पुढील सभेंत निश्चित नियम ठरवावेत असें ठरलें.

* *

घटनाविषयक प्रश्न समितीची सभा

घटनाविषयक प्रश्न समितीची सभा दि. ४-१०-५३ रोजीं केन्द्रीय कार्यालयांत भरली. वि. सा. संघाच्या घटनेंत बदल वा दुरुस्त्या करण्याबाबत ज्या सूचना आल्या त्यांचा विचार करण्यांत आला. घटनेंत दुरुस्ती होण्यासंबंधी सभासदांना आणखी कांही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या नोव्हेंबर १९५३ अखेरपर्यंत कार्यालयाकडे पाठवाव्या, म्हणजे सर्व सूचनांचा एकत्रित विचार करणें सोयीचें होईल, असें ठरलें.

* *

प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांची भेट

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध मराठी भाषापंडित यांनी दि. २२-१०-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. त्यावेळीं वि. सा. संघातर्फे श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं प्रा. कुळकर्णी यांचे 'कांही प्रचलित वाङ्मयीन प्रश्न' या विषयावर उद्बोधक भाषण झालें.

* *

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति, नागपूर
परीक्षक सूचि, ऑगस्ट १९५३

पुढील व्यक्तींनी केवळ सेवाभावाने ऑगस्ट ५३ मध्ये झालेल्या परीक्षांकरिता परीक्षक म्हणून कार्य केल्याचें कृतज्ञतापूर्वक निवेदन केलें जात आहे.

१ साहित्य पारंगत प्र. प. १ श्री. प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, नागपूर
२ ,, ,, २ श्री. प्रिं. श्री. ल. पांढरीपांडे, नागपूर
३ ,, ,, ३ श्री. प्रा. श्री. ना. बनहट्टी, नागपूर
४ ,, ,, ४ श्री. प्रा. डॉ. म. अ. करंदीकर, मुंबई.
५ ,, ,, ५ श्री. प्रा. द. के. केळकर, मुंबई
६ साहित्य स्नातक प्र. प. १ श्री. प्रा भ. श्री. पंडित, अमरावती
७ ,, ,, २ श्री. प्रा. डॉ. वि. भि. कोलते, नागपूर
८ ,, ,, ३ श्री. प्रा. डॉ. के. ना. वाटवे, पुणें
९ साहित्य परिचत प्र. प. १ श्री. प्रा. दा. ल. अडोणी, सागर
१० ,, ,, २ श्री. प्रा. रा. ब. माढेकर, हैद्राबाद
११ साहित्यविनीत प्राश्निक व परीक्षक–श्री. दि. य. पंडित, नागपूर
१२ ,, सहपरीक्षक–श्री. वि. कृ. देशपांडे, जबलपूर
१३ मराठी प्रारंभ—श्री. शिंगवेकर, डिस्ट्रीक्ट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स, अमरावती
१४ मराठी प्रवेश—प्राश्निक व परीक्षक–सौ. उषा कोलते, नागपूर
सहमौखिक परीक्षक—(१) श्री. त्रिं. नि. आंभोरकर, वरोडा
(२) श्री. श्रीरंग पसारकर, दारव्हा.

माणिक बैतुले,
कार्यवाह, परीक्षा–समिति, वि. सा. संघ.

* *

अमरावती केंद्रवृत्त

(१) **डॉ. दप्तरी ह्यांची शाखेला भेट**—दि. ५ ऑक्टोबर रोजीं विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी ह्यांनी वि. सा. संघाच्या अमरावती शाखेला भेट दिली. सुरवातीला प्रा. सुरेश डोळके व प्रा. ग. त्र्यं. देशपांडे ह्यांचीं परिचयात्मक भाषणें झालीं. डॉ. दप्तरी ह्यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणांत अपौरुषेय वादामुळे भारताचें आजवर सर्वच क्षेत्रांत कसें नुकसान झालें हें सप्रमाण स्पष्ट केलें. अध्यक्ष-स्थानीं श्री. नानासाहेब बामणगांवकर, शाखाध्यक्ष, हे होते.

(२) **नवरात्र व्याख्यानमाला**—दरवर्षीप्रमाणे शाखेतर्फे यंदाहि दि. ८ ते १६ ऑक्टोबर पर्यंत नवरात्र व्याख्यानमाला पार पडली. मराठी साहित्यासंबंधी विविध विषयांवर व्यासंगी व विद्वान वक्त्यांचीं भाषणें खालीलप्रमाणे झालीं. (१) प्रा. ग. त्र्यं. देशपांडे–भागवत पुराण (२) श्री. हरिहरराव देशपांडे–महाकवि भारवी (३) श्री. द. ह. अग्निहोत्री–मराठीची ध्वनिशिक्षा (४) प्रा. भ. श्री. पंडित–कलेचा आस्वाद व आनंद (५) प्रा. सुरेश डोळके साहित्यनिर्मितीची भूमिका (६) कविभूषण अण्णासाहेब खापर्डे–शेक्सपिअरने हॅम्लेट कां व कसें लिहिलें ! (७) श्री. तात्यासाहेब कदम–तुकाराम (८) श्री. श्रीनिवास पुरुषोत्तम हिर्लेकर–काव्यानंदाची मीमांसा (९) प्रा. मधुकर आष्टीकर–नाटकें पाहिजेत.

(३) प्रमाणपत्र वितरण — दि. १६ ऑक्टोबर रोजीं शाखाध्यक्ष श्री. नानासाहेब वामणगांवकर ह्यांच्या हस्तें येथील केंद्रांतून वि. सा. संघाच्या वेगवेगळ्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रें देण्यांत आलीं. केन्द्राधिकारी श्री. दादासाहेब फडके ह्यांनी केन्द्राच्या कार्याचा अहवाल वाचून दाखविला.

म. बा. देवघरे
चिटणीस, वि. सा. संघ, अमरावती

* *

गोंदिया शाखा-वृत्त

साहित्यविषयक समितीची स्थापना

शाखेच्या कार्यकारिणीची ता. २६-९-५३ रोजीं शाखाध्यक्ष श्रीमान छोटुभाई यांचे अध्यक्षतेखाली सभा भरून त्यांत विदर्भ साहित्य संघाच्या गोंदिया शाखेकरिता दैनंदिन कार्यक्रम असावा, ह्या विषयावर विचार होऊन महिन्यांतून कमींत कमी एकवेळ सर्वांनी एकत्रित येऊन साहित्यविषयक कार्यक्रम घडवून आणावेत व त्याकरिता खालील सभासदांची समिति असावी असा ठराव सर्वानुमतें स्वीकृत करण्यांत आला.

(१) श्री. र. वि. पंडित—आमंत्रक
(२) श्री. आनंद देशपांडे—सभासद
(३) श्री. व. बा. शब्दे ,,
(४) श्री. रमेश कोतवाल ,,
(५) श्री. निमोणकर ,,
(६) श्री. ल. भ. टेंभेकर ,,

श्री. डवीर यांनी चिटणीसपदाचा राजीनामा परत घेतला.

श्री. रा. रा. वाईकर, वकील गोंदिया यांनी जागेबाबदच्या कार्यकारिणीच्या ठरावाबाबत "तरुण भारतांत" लेख लिहला होता, त्यावरून श्री. डवीर यांनी चिटणीसपदाचा राजीनामा अध्यक्षांकडे दिला होता. त्या राजीनाम्याचा या सभेंत विचार श्री. वाईकर यांचे उपस्थितींत होऊन पुढीलप्रमाणे ठराव सर्वानुमतें स्वीकृत झाला.

"श्री. डवीर यांना उपस्थित सभासदांनी राजीनामा परत घेण्यासंबंधी विनंति केली. श्री. डवीर यांनी सभासदांच्या विनंतीला मान देऊन आपला राजीनामा परत घेतला व कार्याची धुरा पूर्ववत् वाहण्याचें आश्वासन दिलें. उपस्थित सभासदांनी श्रीमती सौ. वाईकर यांस आजीव सभासद या नात्याने कार्यकारिणीवर येण्याकरिता विनंति केली. त्यांनी विनंतीस मान्यता देऊन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यास सर्वतोपरी सहाय्य करण्याचें कबूल केलें."

शाखेची गांधीजयंती व चर्चा मंडळाचें उद्घाटन

शाखेतर्फे ता० २-१०-५३ ला गांधीजयंतीच्या कार्यक्रमांत श्रीमान केशवरावजी इंगळे, तालुका काँग्रेस अध्यक्ष व शाखेच्या कार्यकारिणीचे ज्येष्ठ सभासद यांचें भाषण झालें. व श्री. काटे, विक्रीकर अधिकारी यांच्या हस्तें शाखेच्या चर्चामंडळाचें उद्घाटन करण्यांत आलें. वरील प्रसंगीं श्री. कुळकर्णी

अनुक्रमणिका

वकील, श्री. शन्दे, काटे, इंगळे यांचीं भाषणें झालीं व श्री. पंचभाई व मातुरकर यांचें गीतगायन झालें. चर्चामंडळाच्या समितीवर श्री. जकाते व वसंतराव मातुरकर यांना घेण्यांत आलें.

सभासदांची संख्या शंभरावर गेली

ता० १४-१०-५३ पर्यंत यावर्षी सभासदांची संख्या ११७ झाली आहे व त्याशिवाय आजीव सदस्य आहेत. सभासदांची संख्या आणखी वाढविण्याबाबत श्री. दातीर, टेंभेकर, देशपांडे व बन्सोड प्रभृती चिटणीसांस सहाय्य करीत आहेत.

गोंदिया
१५-१०-५३

ना. ग. डबीर, चिटणीस
विदर्भ साहित्य संघ, शाखा गोंदिया

आभार आणि अभीष्टचिंतन

ज्या ज्या लेखकांनी आपले लेख पाठवून हा दिवाळी अंक सजविण्यास सहाय्य केलें त्या सर्वांचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभारी आहोंत. जागेच्या अभावीं कांही लेख या अंकांत आम्ही देऊं शकलों नाही त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोंत.

तसेंच 'नारायण मुद्रणालयां'तील कामगारवर्गानेहि हा दिवाळी अंक वेळेवर निघण्याच्या कामीं हातभार लावल्याबद्दल त्यांना धन्यवाद.

'युगवाणी'चे लेखक, वाचक, विदर्भ साहित्यसंघाचे सभासद आणि हितचिंतक, या सर्वांची दिवाळी आनंदांत जावो !

—संपादक

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररयांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं.च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.